डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ. औरंगाबाद.

विद्यार्थी कल्याण विभाग

# युवारंग

२०१३-१४





# - विद्यापीठ गीत -

गीत आमुचे आकाशाचे गीत आमुचे सागराचे
इतिहासाचे जनामनाचे गीत आमुचे जागराचे

अभंगाचे ओवीचेही
मायबोलीचे माहेर
वाऱ्यातही मराठीचे
दिवे लखलख घरोघर

संत-महंताचे विरागी गीत आमुचे वादळाचे

तंतु तंतु संघर्षाचा
पैठणीत विणलेला
नक्षीतच पक्षी पक्षी
विजयाचा विणलेला
सोनपहाटेचे उदयाचे गीत आमुचे उजेडाचे

प्रज्ञेचा सूर्य नवा
शब्द शब्द उजळून गेला
समतेचा संगराचा
अर्थ ढाळून गेला

विराट विशाल संस्कृतीचे गीत आमुचे जीवनाचे

- फ. मुं. शिंदे

युवा रंग २०१३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## विद्यार्थी कल्याण विभाग

# युवा रंग

२०१३-१४

## विविध योजना व उपक्रम - मार्गदर्शिका


✻ संपादक ✻

**डॉ. चेतना सोनकांबळे**

संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद - ४३१ ००२.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.


✻ प्रकाशक :

**प्रा. डॉ. धनराज माने**

कुलसचिव

✻ मुख्य संपादक :

**डॉ. चेतना सोनकांबळे**

संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

✻ छायाचित्र : श्री. पंकज बेडसे





## ✻ संपादक मंडळ ✻


डॉ. सतिश बडवे


डॉ. दासु वैद्य


डॉ. संजय नवले


डॉ. मुस्तजीत खान


डॉ. दिनकर माने


श्री. शिरिष आंबेकर



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर



मा. महामहीम श्री. के. शंकरनारायणन्
कुलपती तथा राज्यपाल, महाराष्ट्र राज्य

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद.

युवारंग २०१३



**मा. प्रोफेसर बी.ए.चोपडे**

**कुलगुरू**

# संदेश

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ''युवारंग'' या वार्षिक अंकाविषयी लिहिताना मला मनापासून आनंद होत आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना हक्काचे विचारपीठ निर्माण करण्यासाठी असणारा आपल्या विद्यापीठाचा सांस्कृतिक दस्तऐवज म्हणजे ''युवारंग''!. सांस्कृतिक क्षेत्रातील मुकूटमणी कसा असायला हवा याचे प्रतिबिंब युवारंग या वार्षिकातून मला दिसून येते. विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला उर्जा देण्याचे काम प्रतिबिंब  युवारंग करते आणि यातून सांस्कृतिक वारसा दृढ व्हायला आपण सज्ज होतो.

बौध्द लेण्यांच्या पायथ्याशी असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठच्या सुंदर नैसर्गिक सृष्टीच्या शांततेच्या वाऱ्याने समता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या विचाराने मनाच्या कप्प्या-कप्प्यात घर निर्माण करते. त्यातूनच भारत देशाला अपेक्षित असणारा, देशाच हित जोपासणारा निर्भिड नागरिक निर्माण झाल्या शिवाय राहत नाही. याचा मला सार्थ अभिमान वाटतो.

परिवर्तन स्वीकारणारेच परिवर्तन करू शकतात. ज्यांनी-ज्यांनी परिवर्तन स्वीकारले त्यांच्यात बदल झाल्याशिवाय राहत नाही. असा परिवर्तनशील विचारांचा विद्यार्थी आपल्या विद्यापीठात घडत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने नॅक चे 'अ' दर्जाचे मानांकन मिळवून महाराष्ट्रात शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. येणाऱ्या काळात नाविन्याचा शोध व संशोधनाच्या माध्यमातून आपल्या विद्यापीठाला देशातील पहिल्या दहा विद्यापीठांच्या यादीत स्थान मिळवून देण्यासाठी आपण सामुदायिक प्रयत्न करूया.

विद्यार्थ्यांचा सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील सहभाग व पारितोषिके याचा लेखाजोखा बघितल्यावर निश्चितच आनंद व अभिमान वाटतो. ग्रामीण पार्श्वभूमी असलेले आपले एकमेव विद्यापीठ कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी कार्य करते. म्हणून उत्कृष्ट संशोधन व नविन्याचा शोध यांच्या आधारे आपण या विद्यापीठाचे नाव आणखी उंचावू शकतो. विद्यार्थ्यांच्या मनात सामिजिक राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक साहित्यिक, आणि देशाविषयी प्रेम या विचारांची समता बीजे पेरता यावी, यासाठी विद्यार्थ्यांसह सहकाऱ्यांनी प्रयत्न करावेत व आपला विद्यार्थी अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा बनावा ही अपेक्षा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवकांसाठी नवी आशा, नवी दिशा, नवा जोश,  नवा जल्लोष निर्माण होउन विचाराला आकार येण्यासाठी संशोधानात्मक प्रज्ञावंतांची नवी पिढी निर्माण करण्यासाठी नवी दिशा मिळेल असे मला वाटते.

प्रोफेसर बी. ए. चोपडे

कुलगुरू

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद.

## मनोगत

युवारंग २०१३-१४साठी मनोगत लिहिताना मनस्वी आंनद होत आहे. त्याचे कारणही तेवढेच महत्त्वाचे आहे. विद्यापीठातील 'विद्यार्थी कल्याण विभाग' हा प्रत्य
युवकापर्यंत पोहचण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असतो. युवकांचे मत प्रशासनापर्यंत पोहचवायचा 'ब्रिज' हा विभाग असतो, सतत क्रियाशील राहुन विद्यार्थ्यांशी हा विभाग संवा
साधत असतो. त्यांच्या मनाच्या भूमिका माहीत झाल्या की मग प्रशासन त्यांच्यासाठी सकारात्मक पध्दतीने निर्णय घेत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
सर्वच बाबतीमध्ये अग्रेसर आहे. विद्यार्थ्यांच्या रास्त भूमिकांचा सन्मान करत त्यांना वेगवेगळी व्यासपीठे उपलब्ध करून देत आले आहे. देशोदेशीचे विद्‌वान विद्यापीठाच्य
अंगणात-प्रांगणात आमंत्रित करून जगण्याचे व जीवनाचे सुंदर शिल्प विद्यार्थ्यांच्या समोर आम्ही ठेवत आलो आहेत. विद्यार्थी कल्याण विभागातर्फेतर व्याख्यानमालेचे आयोज
असतेच परंतु प्रत्येक विभागात मान्यवरांची पाऊले उमलावीत व त्याच पाऊलखुणा वाचत आमचे विद्यार्थी पुढं पुढं जावेत हीच रास्त अपेक्षा असते. जगभरातलं ज्ञान आपल्य
झोळीत टाकण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असतो तो पुढेही राहणार आहे. मला हे नमूद करताना विशेष आनंद होतो आहे की, प्रत्येक व्याख्यानमालेला विद्यार्थ्यांची प्रचंड गर्दी असते
कानांच्या ओंजळी करून, भान, हरपून तो ऐकत असताना पाहताना त्यांचा एक पालक म्हणून अभिमान वाटतो. मित्रहो, हेच संचित उद्याची नवीन सकाळ तुम्हाला देणार आहे. ह
ज्ञानराशीचा ठेवा तुमची दौलत आहे, यामुळेच अपण गरीब असताना सुध्दा श्रीमंत आहोत ही तुमची श्रीमंती विद्यापीठाची कमाई आहे.

विद्यापीठ हे ज्ञानभूमीच नाही तर आपली मायभूमी आहे. ही भावना मनात ठेवून विद्यार्थ्यांने ज्ञानार्जन केले तर नक्कीच ती यशाची शिखरे कणखरतेने पदाक्रांत करतील
मानवी आयुष्याच्या जडण घडणीनेत प्रत्येकाचे सहकार्य हे तेवढेच तोला मोलाचे असते. विद्यापीठाचे वसतिगृह म्हणाजे निव्वळ वस्ती नसते. तिथं रोज अक्षरांची आराधना हो
असते. विज्ञानाचा विद्यार्थी शोधाचे नव-नविन आविष्कार शोधण्याचे चिंतन करत असतो. ग्रंथांच्या पानापानावर चितारलेलं अक्षरं, प्रमेय सिध्दांत तो आपल्या मध्ये उतरव
असतो. निश्चित उणीवा असतील त्या आपण कमी करूयात अध्ययनात विद्यार्थी समाजाच्या, देशाच्या प्रश्नांची उत्तरं शोधत असतो. विद्यार्थी कल्याण म्हणजे फक्त 'यु
महोत्सव' नव्हें विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवून श्रमाघामातून अक्षर गिरवायला शिकवणारी ही योजना आहे. चारशेच्यावर विद्यार्थी-विद्यार्थीनी आज श्रमातून शिक्षण घेत आहेत.
'कै. वसंतराव काळे कमवा आणि शिका' योजनेतले विद्यार्थी भावी काळात प्रत्येक क्षेत्रात ठळक दिसतील याचा मला विश्वास आहे.

विद्यार्थी संसद, युवा नेतूत्व शिबिर यातुन उद्याचे नेतृत्व उदयाला येत असतं राजकारणाबरोबरच, समाजिक, सांस्कृतिक, आर्थिक-चिकित्सा करणारे नेतृत्व यातून निर्मा
व्हावं ही अपेक्षा असते. त्या अपेक्षा पूर्ण होताना समोर दिसत आहेत. आपल्या विद्यापीठाच्या संसदेत काम करणारे विद्यार्थी समाजाच्या अनेक क्षेत्रात कुशल नेतृत्व करताना दिस
आहेत. ही विद्यापीठाची निर्मिती आहे याचा आनंद तर आहेच पण अभिमानही आहे.

'युवा महोत्सव' विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे खूप चांगले व्यासपीठ आहे. नृत्य, संगीत, नाटय, चित्र, वाङ्:मय या क्षेत्रात भाविष्य घालून पाहणारी धडपडणारी मुल
महोत्सवामध्ये सहभागी होतात. त्यांचे आविष्कार पाहून थक्क व्हायला होते. विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाने कित्येक वर्षापासून राष्ट्रीय पातळीवर आपली पताका
फडकवत ठेवली आहे. वक्तृत्वाची, वादविवादांची मांडणी, विषयाचे सखोल ज्ञान याला महत्व असते. कथा-कविता ऐकल्यानंतर हेच उद्याचे कवी, लेखक आहेत याचा विश्वार
वाटतो. अप्रतिम नाटय संहिताचे सादरीकरण, महाराष्ट्राच्या लोककला, संगीताचा रियाज हे सर्व उद्याचे भाविष्य निश्चित करतं. त्यामुळे मी खूप आशावादी आहे. आपल्य
विद्यापीठाचा विद्यार्थी ज्ञानवंत तर आहेच त्याचबरोबर तो विज्ञानवादी आहे. शेवटी शुभेच्छा व्यक्त करताना एवढीच अपेक्षा करतो की या आंगणातून, प्रांगणातून, इथल्य
कर्तृत्ववान, मातीतून आपल्याला सखोल दृष्टी मिळावी. पायात बळ मिळावं, ध्येयापर्यंत पोहचण्याची वाट याच अंगणातून जाणारी आहे. तुम्हाला तुमचे ध्येय गाठता यावे. तुमच्य
ज्ञानाचा, कर्तृत्वाचा समाजाला, देशाला फायदा व्हावा. सर्वजण ज्ञानवंत व्हा, कीर्तीवंत व्हा, या शुभेच्छासह थांबतो. धन्यवाद.

डॉ.धनराज मा
कुलसचिव

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद.

युवारंग २०१३

## संपादकीय

**।। हें ज्ञानिची पवित्रता । ज्ञानीचि आथि ।।**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे कष्टकऱ्यांच्या मुलांसाठी कार्य करते. म्हणूनच गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचेमाहेर घर म्हणून आपल्या विद्यापीठाची ओळख आहे. अध्ययन, अध्यापन आणि संशोधन या क्षेत्रातसुध्दा आपले विद्यापीठ अग्रेसर आहे. या विद्यापीठातील विद्यार्थी देशाच्या हितासाठी प्रथम चांगला नागरिक निर्माण व्हावा, तसेच अध्ययन, अध्यापन व संशोधना बरोबरच विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव देऊन एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून घडावे यासाठी सुध्दा विद्यापीठ व विद्यापीठातील मा. कुलगुरू महोदय, मा. कुलसचिव तसेच शिक्षक व कर्मचारी वर्ग नेहमीच प्रयत्नशील असतात.

आपल्या विद्यापीठामध्ये दलित, बहुजन, अल्पसंख्यांक व होतकरू विद्यार्थ्यांचे हित जोपासले जाते. वाडी, तांडयावरील, तळागाळातील विद्यार्थी हा उच्च शिक्षणापासून वंचित राहु नये म्हणून विद्यापीठाने कै. वसंतराव काळे कमवा आणि शिका स्वाभिमान शिक्षण योजना ही विद्यार्थ्यांला आर्थिक बळ देणारी आणि स्वाभिमानी विद्यार्थी घडविणारी योजना अशी तिची ओळख आहे. दर वर्षी हजारो विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी सज्ज होतात व स्वाभिमानाने जीवन जगतात.

आजचे युग हे विज्ञान युग असल्यामुळे आपल्या समाजात अनेक प्रकारची नवनवी स्थित्यंतरे घडत असतात. अशा या धावपळीच्या युगात विद्यार्थी टिकून राहावा यासाठी विद्यापीठाच्या वतीने तत्वचिंतन, विचारवंताच्या व्याख्यानाचे आयोजन केले जाते. याचा लाभही आपले विद्यार्थी घेतात. व यशाच्या भराऱ्या मारायला मोकळे हातात. ''जागतिकीकरणामुळे सातासमुद्रा पलीकडचा माणूस जवळ वाटू लागला आहे. परंतु जवळचा माणूस दूर जाता कामा नये '' हे विद्यार्थ्यांना शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतीक, कार्यक्रमातुन शिकविले जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाला नैसर्गिक वातावरणाचा वारसा आहे. इथल्या वातावरणातील विद्यार्थी मुक्तपणे श्वास आणि आस्वाद घेताना दिसून येतो. यामुळे येथील विद्यार्थी समता, स्वातंत्र्य, यांना वाव मिळवावा म्हणून केंद्रीय युवक महोत्सव आयोजित करणे, तसेच एन.एस.एस. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास घडावा यासाठी विद्यार्थ्यांना राज्य व देश पातळीवर विविध शिबीरांच्या माध्यमातून प्रतिनिधित्व दिले जाते. वर्षभरात विद्यार्थ्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वासाठी विविध कार्यक्रम आयोजित करणे हे विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रमुख कार्य ठरते. या सर्व योजना व उपक्रमाची अमलबजावणी शिस्तबध्द व योग्यरीतीने सुव्यवस्थित होण्यासाठी 'युवारंग'ही पुस्तिका विद्यार्थी कल्याण विभागाने प्रसिध्द केली आहे. येणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवतीला हे युवारंग आपल्या हाती देताना मनापासून आनंद होत आहे.

डॉ. चेतना सोनकांबळे
संचालक,
विद्यार्थी कल्याण विभाग

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## * विद्यापीठातील अधिकारी वर्ग *



**डॉ. एस.पी. झांबरे**
संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ



**डॉ. धनराज माने**
कुलसचिव



**डॉ. शिवाजी सांगळे**
वित्त व लेखाधिकारी



**डॉ. अशोक चव्हाण**
परिक्षा नियंत्रक



**डॉ. चेतना सोनकांबळे**
संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

# युवक महोत्सव सल्लागार व संयोजन समिती (२०१३-१४)

युवारंग २०१३



डॉ. धनराज माने
मा. कुलसचिव



प्रा. दिलीप बडे



प्रा. संभाजी भोसले
स्थायी समिती (अध्यक्ष)



डॉ. दासू वैद्य
मराठी विभाग



डॉ. लक्ष्मीकांत शिंदे
अधिसभा सदस्य



डॉ. संजय नवले
हिंदी विभाग



डॉ. सुभाष राऊत
अधिसभा सभासद




डॉ. हनुमंत भूमकर



डॉ. मिलिंद माने



डॉ. बिना सेन्गर
इतिहास विभाग



डॉ.मुस्तजीब खान
इंग्रजी विभाग



डॉ. चेतना प्र. सोनकांबळे
विद्यार्थी कल्याण विभाग



प्रा.डॉ. राजेश करपे
कार्यक्रम समन्वयक-रा.से.योजना



श्रीमती करुणा का.जाधव
विद्यापीठ विभाग विद्यार्थी परीषद



श्री. सानप गजानन
अधिसभा सदस्य

## वसतीगृह नियंत्रण व व्यवस्थापन समिती सदस्य



डॉ. रत्नदीप देशमुख
अध्यक्ष



डॉ. प्रतिभा पाटील
सदस्य



डॉ. मेहेर दत्ता पाथ्रीकर
सदस्य



डॉ. प्रमिला जाधव
सदस्य



डॉ. चेतना सोनकांबळे
सदस्य-सचिव

## कैं.वसंतरावजी काळे कमवा आणि शिका, स्वाभिमान शिक्षण योजना सल्लागार समित



डॉ. स्मिता अवचार



प्रा. आनंद देशमुख



श्री. एस.पालकर

## एन.एस.एस. विद्यापीठ व पदव्युत्तर विभाग कार्यक्रमाधिकारी



डॉ. आर.एन. करपे
कार्यक्रम समन्वयक



डॉ. संजय मुन



डॉ. विलास इप्पर



प्रा. सोनाली क्षिरसागर



डॉ. पुरुषोत्तम देशमुख

# वसतिगृह अधिक्षक


प्रा.डॉ. नारायण पंडुरे


डॉ. प्रभाकर उंदरे


डॉ. पुरुषोत्तम देशमुख


श्री. बी.जे. जाधव

# वसतिगृह अधिक्षिका


प्रा.डॉ. भारती गवळी


श्रीमती सोनाली क्षिरसागर


श्रीमती सुचिता यंबल


श्रीमती करुणा जाधव
सचिव विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद

# विद्यार्थी कल्याण विभाग कर्मचारी वृंद


श्री. प्रकाश आकडे


श्री. एच.के. साठे


श्री. पंकज बेडसे


श्री. आर.टी. साबळे


श्री. राहुल जावळे


श्री. आर.एस. पवार


श्री. सय्यद जमील


श्री. शेख खैराती शेख चाँद

# केंद्रीय युवक महोत्सव २०१३-१४

















# Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

## Vice-Chancellors & their Tenure

| Sr.No. | Name of the Vice Chancellor | Year | | |
|---|---|---|---|---|
| 1 | Shri S. R. Dongerkery | 19/06/1958 | To | 18/06/1964 |
| 2 | Dr. N. R. Tawde | 19/06/1964 | To | 15/10/1971 |
| 3 | Prin. R. P. Nath | 16/10/1971 | To | 15/01/1975 |
| 4 | Dr. V. G. Ganla | 26/07/1973 | To | 30/09/1973 |
| 5 | Shri S. R. Kharat | 16/01/1975 | To | 13/12/1976 |
| 6 | Shri. B.A. Kulkarni (IAS) (Incharge) | 24/12/1975 | To | 24/03/1976 |
| 7 | Shri. D. N. Kappor (IAS) (Incharge) | 14/12/1976 | To | 06/06/1977 |
| 8 | Dr. B. R. Bhosle(IAS) (Incharge) | 07/06/1977 | To | 03/05/1982 |
| 9 | Dr. B. H. Rajurkar | 13/05/1978 | To | 06/06/1978 |
| 10 | Dr. A. M. Vare | 27/02/1981 | To | 13/03/1981 |
| 11 | Shri.S. G. Gokhale (IPS) | 04/05/1982 | To | 07/07/1982 |
| 12 | Prin. G. R. Mhaisekar | 08/07/1982 | To | 20/08/1983 |
| 13 | Shri. S.G. Gokhale (IPS) | 21/03/1983 | To | 01/05/1983 |
| 14 | Shri. Y. L. Rajwade (IAS) (Incharge) | 21/08/1983 | To | 04/10/1983 |
| 15 | Justice M. P. Kanade | 05/10/1983 | To | 15/06/1985 |
| 16 | Shri. A. N. Batabyal (IAS) (Incharge) | 18/06/1985 | To | 28/06/1985 |
| 17 | Shri. B.A. Kulkarni (IAS) (Incharge) | 29/06/1985 | To | 31/10/1985 |
| 18 | Dr. B. H. Rajurkar | 01/11/1985 | To | 06/03/1988 |
| 19 | Shri. A. L. Bongirwar (IAS) (Incharge) | 07/03/1988 | To | 21/08/1988 |
| 20 | Shri. Govind Swarup (IAS) (Incharge) | 22/08/1988 | To | 05/09/1988 |

| Sr.No. | Name of the Vice Chancellor | Year | | |
|---|---|---|---|---|
| 21 | Prin. S. A. Bhosale | 06/09/1988 | To | 16/09/1991 |
| 22 | Prof, V.B.Ghuge | 16/09/1991 | To | 14/01/1994 |
| 23 | Prin K. T. Thale (Incharge) | 17/04/1993 | To | 23/04/1993 |
| | | 10/08/1993 | To | 22/08/1993 |
| 24 | Shri. V. N. Karandikar (IAS) (Incharge) | 16/09/1994 | To | 03/11/1994 |
| 25 | Prin. Dr. Shivraj B. Nakade | 04/11/1994 | To | 03/11/1999 |
| 26 | Prof. Dr. B. G. Pachpatte (Incharge) | 11/08/1998 | To | 27/08/1998 |
| 27 | Dr. V. S. Lomte (Incharge) | 04/11/1999 | To | 20/12/1999 |
| 28 | Mr. K. P. Sonawane | 21/12/1999 | To | 20/12/2004 |
| 29 | Dr. D. G. Dhuley (Incharge) | 20/04/2001 | To | 30/04/2001 |
| | | 14/05/2001 | To | 27/05/2001 |
| | | 18/07/2002 | To | 08/08/2002 |
| 30 | Dr. H. A. Gani (Incharge) | 04/10/2004 | To | 21/10/2004 |
| | | 29/11/2004 | To | 10/12/2004 |
| 31 | Shri. K. B. Bhoge (IAS) (Incharge) | 21/12/2004 | To | 04/06/2005 |
| 32 | Prof. Nagnath Kottapalle | 05/06/2005 | To | 04/06/2010 |
| 33 | DR. A. G. Khan (Incharge) | 11/02/2009 | To | 28/02/2009 |
| 34 | Shri Bhaskar Mundhe (IAS) (Incharge) | 05/06/2010 | To | 22/09/2010 |
| 35 | Prin. Dr. K. B. Patil | 23/09/2010 | To | 04/01/2011 |
| 36 | Prof. Dr. V. M. Pandharipande | 05/01/2011 | To | |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## मा. कुलसचिव व कार्यकाळ

| अ.क्र. | नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | श्री. एम.बी. चिटणीस | १९/०६/१९५८ ते ३०/०६/१९६८ |
| २ | श्री. व्ही.के. धामनकर | ०१/०७/१९६८ ते २०/०४/१९७५ |
| ३ | डॉ. व्ही.व्ही. बोरकर (प्रभारी) | २१/०४/१९७५ ते १९/०४/१९७६ |
| ४ | श्री. एच.एस. मानविकर (प्रभारी) | ०८/०५/१९७५ ते १९/०४/१९७६ |
| ५ | श्री. एस.बी. चव्हाण (प्रभारी) | २०/०४/१९७६ ते १९/१०/१९७६ |
| ६ | श्री. एम.पी. लवाने | २०/१०/१९७७ ते २०/०४/१९७९ |
| ७ | श्री. व्ही.के. धामनकर (प्रभारी) | ०२/०२/१९७७ ते २०/०४/१९७९ |
| ८ | डॉ. जी.एस. अुर (प्रभारी) | २१/०४/१९७९ ते ०२/०७/१९७९ |
| ९ | डॉ. बी.एच. राजुरकर (प्रभारी) | ०३/०७/१९७९ ते १२/११/१९७९ |
| १० | डॉ. एम.जी. कुलकर्णी | १३/११/१९७९ ते १३/०१/१९८० |
| ११ | डॉ. बी.एच. राजुरकर | १४/०१/१९८० ते ०८/०९/१९८० |
| १२ | श्री. एस.बी. पाटील (प्रभारी) | ०९/०९/१९८० ते ३१/०५/१९८१ |
| १३ | डॉ. बी.एम. पाटोदेकर | ०१/०६/१९८१ ते ११/०९/१९८९ |
| १४ | श्री. एस.बी.पाटील | २७/११/१९८८ ते ११/०९/१९८९ |
| १५ | प्रा. जी.वाय.पाथ्रीकर | १२/०९/१९८९ ते २३/०४/१९९१ |
| १६ | प्राचार्य, बी.आर. आरबाड | २४/०४/१९९१ ते २५/०८/१९९२ |
| १७ | डॉ. पी.पी. कार्यकर्ते | २६/०८/१९९२ ते २३/०२/१९९३ |
| १८ | डॉ. एम.एन. फरुकी | २४/०२/१९९३ ते ०२/०२/१९९४ |
| १९ | डॉ. एस.डी. पगारे (प्रभारी) | २५/१०/१९९३ ते ३०/१२/१९९३ |
| २० | डॉ. जी.बी.शिंदे | ०३/०२/१९९४ ते ०६/१०/१९९६ |
| २१ | प्रा.डॉ. एस.डी. पगारे (प्रभारी) | ०७/१०/१९९६ ते ३१/०१/१९९७ |
| २२ | डॉ. श्रीमती पी.बी. सोमवंशी (प्रभारी) | ०१/०२/१९९७ ते ०४/०२/१९९७ |
| २३ | डॉ. पी.एम. बोरा | ०५/०२/१९९७ ते १९/११/१९९७ |
| २४ | डॉ. एल.आर. नागरगोजे | २०/११/१९९७ ते १९/०१/२००२ |
| २५ | डॉ. पी.एम. बोरा (प्रभारी) | २०/११/२००२ ते १९/१२/२००२ |
| २६ | डॉ. जी.जी. सुरासे | ३०/१२/२००२ ते ३०/११/२००७ |
| २७ | डॉ. ए.एम. चव्हाण (प्रभारी) | ०१/१२/२००७ ते २७/०३/२००८ |
| २८ | डॉ. डी.व्ही. मुळे | २५/०३/२००८ ते २४/०३/२००८ |
| २९ | प्रा. डॉ. एम.एस. काचोळे (प्रभारी) | २५/०३/२००८ ते २५/०७/२०११ |
| ३० | डॉ. एस.टी. सांगळे (प्रभारी) | २६/०७/२०११ ते १९/१२/२०११ |
| ३१ | डॉ. डी.आर. माने | २०/१२/२०११ ते |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## विद्यार्थी कल्याण विभाग

### संचालक व कार्यकाळ

| अ.क्र. | नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | डॉ. नागनाथ कोतापल्ले | ०१/०९/१९८९ ते ०२/०७/१९९२ |
| २ | डॉ. डी.जी. धुळे | ०३/०७/१९९२ ते ०७/०५/१९९३ |
| ३ | डॉ. सुदाम जाधव | १७/०६/१९९३ ते १७/०६/१९९६ |
| ४ | डॉ. सुधीर गव्हाणे | १८/०६/१९९६ ते ०३/१२/१९९९ |
| ५ | डॉ. अशोक हजारे (अतिरिक्त कार्यभार) | ०४/१२/१९९९ ते ०६/०८/२००० |
| ६ | डॉ. वाय.के. खिल्लारे | ०७/०८/२००० ते ०६/०८/२००२ |
| ७ | डॉ. एस.टी. सांगळे | ०७/०८/२००२ ते १६/१२/२००४ |
| ८ | डॉ. के.बी. शेजुळे | १६/१२/२००४ ते १३/०३/२००७ |
| ९ | डॉ. व्ही.एल. सिरसाट | १३/०३/२००७ ते १३/०३/२००९ |
| १० | कॅप्टन डॉ. एस.टी. गायकवाड | १३/०३/२००९ ते २४/०७/२०११ |
| ११ | प्रा.डॉ. वाल्मिक सरवदे | २५/०७/२०११ ते ३१/०९/२०१३ |
| १२ | डॉ. चेतना प्र. सोनकांबळे | ०१/१०/२०१३ ते |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## वसतिगृहे नियंत्रण व व्यवस्थापन समिती

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रा.डॉ. रत्नदिप देशमुख (अध्यक्ष)<br>संगणकशास्त्र विभाग,<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | प्रा.डॉ. प्रतिभा पाटील (सदस्य)<br>लोकप्रशासन विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | प्रा.डॉ.सौ. मेहेर दत्ता पाथ्रीकर (सदस्य)<br>प्लॉट नं. ४९०, एन-३,<br>सिडको, औरंगाबाद | प्रा.डॉ.सौ. प्रमिला जाधव<br>(सदस्य)<br>बलभीम महाविद्यालय, बीड | डॉ. चेतना प्र. सोनकांबळे (सदस्य-सचिव)<br>संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद |

## व्याख्यानमाला/शिबीरे मार्गदर्शन समिती

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. एस.पी. झांबरे (अध्यक्ष)<br>माजी संचालक,<br>महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | ३. | प्रा.डॉ. सय्यद अझरुद्दीन (सदस्य)<br>वाणिज्य विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | ५. | प्रा. नंदिता पाटील (सदस्य)<br>विधी विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | ७. | डॉ. चेतना. प्र. सोनकांबळे<br>संचालक,<br>विद्यार्थी कल्याण विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद |
| २. | प्रा.डॉ. प्रतिभा पाटील (सदस्य)<br>लोकप्रशासन विभाग प्रमुख<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | ४. | प्रा.डॉ. सतिश दांडगे (सदस्य)<br>लोकप्रशासन विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | ६. | प्रा.डॉ. संजय मून (सदस्य)<br>आजीवन शिक्षण व विस्तार विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | | |

## राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ व पदव्युत्तर विभाग कार्यक्रम अधिकारी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रा.डॉ. राजेश करपे<br>कार्यक्रम समन्वयक<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | प्रा.डॉ. संजय मून<br>आजीवन शिक्षण व विस्तार विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | प्रा.डॉ. विलास इप्पर<br>वाणिज्य विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | प्रा. सोनाली क्षिरसागर<br>व्यवस्थापन विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद | डॉ. पुरुषोत्तम देशमुख<br>अर्थशास्त्र विभाग<br>डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## विद्यार्थी कल्याण विभाग

# युवा रंग

## अनुक्रमणीका


| अ. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १. | कविता | १ ते ५ |
| २. | विद्यार्थी लेख | ६ ते २७ |
| ३. | प्राध्यापक लेख | २७ ते ३१ |
| अ. | "महोत्सवमय जीवन" - डॉ.अशोक गुराप्पा बंडगर | |
| ब. | "वसतिगृह नव्हे दुसरे घरच" - डॉ. भारती गवळी. | |
| क. | "वसतिगृह संस्कार केंद्र" - प्रा. सोनाली क्षीरसागर | |
| ड. | "आविष्कार" च्या निमित्ताने - डॉ.प्रकाश खिराडे | |
| ४. | अहवाल | ३१ ते ३६ |
| अ. | विद्यापीठ उद्यान | |
| ब. | स्व. वसंतराव काळे "कमवा आणि शिका" | |
| क. | विद्यार्थी वसतिगृहे | |

## जगायचं आहे

आज मला ओरडून सांगायच आहे
दुःख वेशीला उलटे टांगायचे आहे
धर्म व्यवस्थेने दिलेले जीवन काटेरी आहे
पण.....
मला त्या वाटेने पुढील जीवन
चालायचे नाही
जीवनाशी झगडायचे आहे
व्यवस्था मोडायची आहे
विषमतेचे मूळ मुळासकट उपटायचे आहे
हलु मिळवायचा आहे
मोडलेला पट पुन्हा मांडायचा आहे
अन नव उमेदीने हे जीवन
मला पुनःजगायच आहे

**- क्रांती मारुती गायकवाड**
**मराठी भाषा व वाड्.मय विभाग**
**M.A.II th**

## घोटभर पाण्यासाठी

शायनिंग इंडिया
शायनिंग इंडियाचा नारा सर्वदूर पसरतोय
भारत महासत्ता बनण्याकडे वाटचाल करतोय
पण आज ही...
माय-बाप,बहीण भाऊ
सारा गाव
घोटभर पाण्यासाठी
दाहीदिशा दिनरात भटकतोय
याचं काय
का, हेच शायनिंग इंडिया हाय!

## ।। आधार ।।

निस्वार्थ भावना असणारी ती,
आयुष्यात फक्त देवासारखे देत राहते,
कमवलेला पैसा गमवतो आम्ही महिन्यातच,
मात्र कमवलेला स्वाभिमान, राहील आमच्या सोबत कायमच,
शिक्षणात होते तिची, पावलोपावलावर मदत,
ऋणी आहोत आम्ही तिचे आयुष्यभर,
टिकू शकलो आम्ही या विद्यापीठात, हिच्यामुळेच खरे तर.
घरी असताना, सकाळी लवकर उठवते ती आई,
विद्यापीठात असताना, सकाळी लवकर उठण्याची असते, हिच्यामुळेच घाई.
सांभाळले आई वडिलांनी शाळेत असेपर्यंत,
आता ही सांभाळेल विद्यापीठात असेपर्यंत,
कुठेतरी गावी असणाऱ्या, कष्टकरी शेतकऱ्यांच्या, मजुरांच्या,
एक नव्हे अशा अनेक मुला मुलींच्या,
वडिलांच्या खिशाला देते ती आधार.
दुसरी तिसरी कोणी नसून, एकमेव आहे ती योजना आमची,
'कमवा आणि शिका' नावाने ओळख आहे तिची,
नावाप्रमाणे आहे ती, कमवायला, कमवून शिकायला मी,
देते कमवून स्वाभिमान, कष्ट करण्याची खरी जाण,
भागवते ती आमची भूक आणि तहान.
म्हणून गर्वाने म्हणतो आम्ही, आमचे विद्यापीठ,
आमची 'कमवा आणि शिका'
मुळातच आहे, सर्वात महान.



**- दीक्षित प्रेरणा दिलीप**
**एम.ए.द्वितीय वर्ष - समाजशास्त्र**

## मुलीचे अस्तित्व

जेव्हा जेव्हा जन्म घेते मुलगी,
सुख समृद्धी सोबत आणते मुलगी
आईची सावली तर वडिलांचे रुप आहे मुलगी,
निसर्गाची अनमोल भेट आहे मुलगी,
सूर्याचं पहिली किरण आहे मुलगी,
चंद्राची शीतल सावली आहे मुलगी,
अंगणातील बहार आहे मुलगी,
त्याग आणि समर्पणाचे दुसरे नाव आहे मुलगी,
नवीन नवीन नाते बनवत असते मुलगी,
ज्या घरी जाईल त्या घरी प्रकाश आणते मुलगी,
पुन्हा-पुन्हा आठवते मुलगी,
मुलीची किंमत त्यांना विचारा ज्यांच्या घरी नाही मुलगी

- कदम मुक्ता श्रीधर

## महाराष्ट्र माझा

महाराष्ट्राला आहे अन्यायाची चीड
महाराष्ट्राला नाही कुणाची नीड,
महाराष्ट्रावर करत असाल तुम्ही चीड चीड
तर लागेल तुम्हाला वाईट गुणाची कीड,
महाराष्ट्र इज शान ऑफ नेशन
येथे काढू नये कोणीही रेशन,
नाहीतर थेट माझ्याशी संभाषण
अथवा होईल अण्णा हजारेंचे उपोषण,
इट इज नॉट अ जोक,
महाराष्ट्राचे आहेत असे लोक
चांगल्या-चांगल्यांना दाखवतात शेवटचे टोक
येथे करु नका कोणीही वाद
म्हणूनच म्हणते मित्र आणि मैत्रिणींनो करु
नका महाराष्ट्राचा नाद,
महाराष्ट्राला कोणीही देऊ शकत नाही दाद.

## चोरोळी

' यश म्हणजे काय तर,
वास्तव व ध्येयामधील अंतर असतं,
प्रयत्न व संधीची जुळवणी केली
म्हणजे तर तेही समांतर असतं.'

## भान

रक्तरंजित नाम विस्तार दिन
आनंदाचा सोहळा कसा होऊ शकतो
अन आपण तो आनंदाने साजरा करतो
पोचीराम कांबळे, गौतम वाघमारे सम
अनेक जण कामास आले
बाबाने आपणाला आत्मपरीक्षण करायला शिकवले
ते आपण केले आहोत का ?
बाबांनी आपले आत्मभान जागृत केले
मग आपण आहोत का भानावर ?
म्हणून म्हणतो की,
नामविस्तार दिन हा रक्तरंजित दिन आहे
तो आनंदाचा सोहळा कसा काय?
नामविस्तारासाठी ज्यांनी बलिदान दिले
त्यांना मनःपूर्वक श्रध्दा सुमन अर्पण करुया
आणि नाम विस्तार दिनाचे भान ठेवूया !

**- सूर्यवंशी बाळासाहेब मधुकरराव**
एम.ए.द्वितीय वर्ष मराठी विभाग
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ औरंगाबाद.
मो.9881174148

## आधार

तुमच्या मायेची छाया
सतत मला हवी आहे
माझ्या वृक्षरुपी आयुष्याला
खत पाणी तुम्हीच दिले आहे

चांगल्यात चांगले देण्यासाठी
कायम तुम्ही धडपडत असता
तुमचे प्रेम कळतं मला
तुम्ही काहीही न सांगता

दुर्दैव म्हणुन जन्मली मुलगी
अस लोक म्हणतात
पण माझे बाबा माझ कौतुक
मोठ्या अभिमानाने सांगतात

या जगात सुखावणाऱ्या
अनेक गोष्टी आहेत.
मलाही आनंद देणारी एक गोष्ट आहे
खूप छान वाटतं मला
मी तुमची मुलगी आहे

कितीही मोठी झाले तरी
तुमच्यासाठी लहानच राहणार
पण तुमच्या म्हातारपणी
मीच तुमचा आधार होणार

**- शिवानी जाधव**
11 वी विज्ञान

## कॉलेज मधून जाताना

रंग रंगात रंगून गेले
जसे श्रावणात मेघ भिजून गेले
मात्र कॉलेजमधून जाताना वाटे
मनाला इंद्रधनू छेदून गेले

कॉलेजमध्ये मन हरवून गेले
जसे बीज मातीत रोवून गेले
मात्र कॉलेजमधून जाताना वाटे
लाजाळूचे झाड मिटून गेले

कॉलेजची भाषा समजली वाटे
मनात स्वप्नांची गर्दी दाटे
मात्र कॉलेजमधून जाताना वाटे
मन कॉलेजमध्ये राहून गेले
कॉलेजमध्ये राहून गेले

**- राऊत कल्पना श्रीमंत**
बी.एस.सी., एस.वाय

## युवा

रक्त सळ सळणारे
मनगट पोलादी कुणालाही नमवणारे
अन्याय अत्याचारा विरुध्द
बंड पुकारणारे म्हणजे युवा होय.
सिंहाची गर्जना करणारे
वाघाची डरकाळी फोडणारे
हृदय वज्रासारखे
अंगात विद्युत संचारणारे
म्हणजे युवा होय......
पर्वत हलविणारे
समुद्राला छेद देणारे
आकाशाला भिडणारे
नवा इतिहास घडविणारे
म्हणजे युवा होय....
तंत्रात बदल घडविणारे
अशक्य ते शक्य करणारे
वादळातले धाडसी वीर
म्हणजे युवा होय....

## पोरा तु तरी शाळा शिक

हाडाचं काडां
रक्ताचं पाणी केलं
शेतात सोनं पिकवलं
एक सालातच मालकाचं घर भरलं
पण....
कष्टाचा मोबदला
बापाला मातेरेच मिळालं
मातेरे ओंजळीन घेत
दुःखीत सुरात बाप मला म्हणाला
आयुष्यभर भाकरीसाठी चाकरी केली
तरी.....
जिंदगी ठोकराचीच मिळाली
नको ही मातेऱ्याची  लाचारी
पोरा तू तरी शाळा शिक
बाबासाहेबासम शाळा शिक.

## गळफास

आज ना उद्या पाऊस पडेल
असा रोजचा होतूया भास
उगाच कोरडया शेताकडं कोरडीच लागली आस
कधीच घेता आला नाही मोकळा श्वास
माझं मीच बरळतो क्षणाक्षणास
किती केला शेतावर विश्वास
पण....
सालाला घरी येईना शेराची रास
अशा चिंतेन सुख कधी ना मनास
रिनामुळे सावकाराचा रोजचा घरी प्रवास
आशेचा मनातून झाला नाश
दाही दिशा डोळयाला दिसतात भकास
आत बस
वैतागून जीवनास कायमचा घेतला
मी गळफास
सर्व संकटातून मोकळा झाला
हा देह अनू ध्यास
तेव्हा गळयाभोवती होता आवळलेला फास

## मुलगी आहे म्हणून

जन्माला येण्यापूर्वी मुलीला मारु नकारे
मुलीला मारु नका.
घरा-घरात मुलीला मारुन काय कमावणार आहे
याचे भान तुम्हा-आम्हा कधी येणार आहे
मुलीचे अस्तित्व नष्ट झाल्यावर का?
अहो! मुलीकडे बघाण्याचा दृष्टिकोन बदला
मग बघा.....
तुम्हा दिसेल मुलीचे खरे रुप
मुलगी ही मायेचा दुवा आहे
मुलगी ही जीवचा विसावा आहे
मुलगी ही गोड खवा आहे
मुलगी ही ह्रदयाशी जपून ठेवणारा
अनमोल ठेवा आहे
मुलगी ही मोती आहे
मुलगी ही दोन घरं उजळणारी ज्योती आहे
मुलगी ही सतत पारायण घालणारी पोथी आहे
मुलगी आहे म्हणून तर सर्व नाती गोती आहेत

**- क्रांती मारुती गायकवा**
डॉ बा.आं.म.विद्यापी
मराठी विभाग, एम.ए. व्दितीय व

## आजकालचे कवी

भूकेलेल्याला तृप्त करीत असेल
तर ती कविता नाही तर
नुसतेच ढेरपोटे शब्द
ढेरपोटे शब्दांना नसते इन्सानियत
दुबळ्याचा दाबलेला आवाज असते कविता
असे म्हणतात कवितेशी बांधिलकीवाले
शब्दातून प्रसवणारी बांधिलकी थांबेल का?
गोलपीठातील वास्तव
साहित्याने नसते होत क्रांती
फक्त होतो वांझोटा समाज
शब्द करतात संभोग कवितेशी
शब्दानी जात नाहीत दिवस
शब्द असतात नपुंसक छक्के
आजकालचे कवी नुसतेच ढेरपोटे
कवितेशी संभोग करणारे
हु बी आणि चु बी न कळणारे
नुसतीच वांझ साल्याची संवेदशीलता.

**- वाल्मिक विष्णु वाघमारे**
एम.ए. व्दितीय वर्ष, मराठी

## मी मात्र गप्प....

जे मला टोचते, ढसते
रक्ताळून सोडते
ते गप्प बघत बसतो
आणि उद्या एक श्रेष्ठ
कविता जन्माला येते
एकदा मी आणि ती
फिरत असताना
समोरुन येणा-या उनाड
टोळक्याने तिची छेड काढली
मी गप्प बघत बसलो
पुन्हा एक श्रेष्ठ कविता
जन्माला आली.
माझी खूपच वा.वा झाली
प्रखर समाज सन्मुख कवी म्हणून
समीक्षकाने गौरविले
एक समयी तर प्रत्यक्ष
बलात्काराचा प्रसंग
नजरेस पडला
पुन्हा श्रेष्ठ कविता लिहायला बसलो
बाहेर कोणीतरी म्हटलं
अरे! त्या श्रेष्ठ कवीच्या
प्रेयसीवर बलात्कार झाला
मी मात्र गप्प.....

**- वाल्मिक विष्णु वाघमारे**
मराठी भाषा व वाङ्मय विभाग.
एम.ए. व्दितीय वर्ष



''(महाराष्ट्राच्या राजकारणात मराठवाड्याला मोठे महत्त्व आहे. आणि मराठवाड्याचे राजकारण डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या भोवती केंद्रीत आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नासंबंधीची विद्यापीठाच्या विद्यार्थी संसद सचिवांची असलेली जागरुकता नेहमीच नवीन नेतृत्व उदयास आणत असते. विद्यापीठ नामांतर आंदोलनाचे सरसेनानी माजी राज्यमंत्री गंगाधर गाडे, कला वंशिका या प्रख्यात योजनेचे प्रणेते स्व.वसंतरावजी काळे अशी समृद्ध परंपरा लाभलेल्या या विद्यापीठबद्दल आणि येथील विद्यार्थी चळवळी बद्दल सांगत आहेत, विद्यार्थी संसद सचिव करुणा जाधव...!''

हे ज्ञानिची पवित्रता । ज्ञानिची अथि ।।

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे हे घोष वाक्य आहे. येथील विद्यार्थी नक्कीच हेच काम मोठ्या निष्ठेने करताना दिसतील. या विद्यापीठातील प्रत्येक विभागात नामवंत शिक्षकवृंद आहेत आणि यांच्या पाठबळामुळेच येथील विद्यार्थी आज देश पातळीवर नाव गाजवत आहेत. महाराष्ट्रातून बाहेरच्या देशात संशोधनासाठी जाणारे बहुसंख्य विद्यार्थी हे या विद्यापीठातील आहेत. नेट-सेट-गेट या तिन्ही नामांकित परिक्षांमध्ये इथला विद्यार्थी चमकत आहे. परीक्षेतील घवघवीत यशाने या विद्यापीठाचे नाणे किती खणखणीत आहे हे देशाला समजले आहे. शिक्षणात कुठेही कमी नसणारा इथला विद्यार्थी सामाजिक जबाबदाऱ्या, सांस्कृतिक कार्यक्रम आणि राजकीय जाण असणारा आहे.

विद्यार्थी संसद सचिवाचे कार्य काय असते? त्याच्या जबाबदाऱ्या कोणत्या? हे प्रश्न मला सुद्धा पडले होते; पण विद्यार्थी कल्याण विभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाने आणि वेळोवेळीच्या सल्ल्याने मला काय करता येईल हे समजले. सामान्यतः विद्यापीठात विद्यार्थ्यांना काय अडचणी आहेत हे जाणले असता विद्यापीठ आवारात झेरॉक्स, इन्टरनेट कॅफे आणि एक सेंट्रल मेस याची खरी आवश्यकता आहे हे मला समजले. यासंबंधी पाठपुरावा केला असता पहिल्यां दोन्ही अडचणी तात्काळ दुर झाल्या आणि सेंट्रल मेसचे सुद्धा काम सुरु झाले आहे.

माझ्या दृष्टीने विद्यापीठाने माझ्या कार्यकाळात केलेली उल्लेखनीय बाब म्हणजे केंद्रीय युवक महोत्सवाचे आयोजन विद्यापीठात करणे. मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड आणि उस्मानाबाद या चारही ठिकाणचे संघ या ठिकाणी आले. पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले विद्यापीठ पाहिले.केवळ छायाचित्रात दिसणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कसे आहे हे त्यांनी या अनुषंगाने पाहिले. येथील शैक्षणिक वातावरण त्यांनी अनुभवले यामुळे निश्चितच त्यांच्या उच्च शिक्षणासाठी विद्यापीठात येण्यास कल निर्माण होईल. दुसरी गोष्ट म्हणजे ''ओपन डे'' यात विद्यापीठाच्या सर्व विभागाची ओळख नागरिकाना झाली. येथे काय-काय संशोधन सुरु आहे? कोणते विभाग आहेत? त्यात कोणते नवीन शैक्षणिक उपक्रम चालतात? अभ्यासक्रम काय आहे ? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे एरव्ही प्रसार माध्यमातून न घेता त्यांनी प्रत्यक्ष मिळवली. यामुळे विद्यापीठ अधिक लेखाभिमुख झाले.

केंद्रीय युवक महोत्सवात विद्यापीठात संघाने प्रथम क्रमांक मिळवला ही जशी विद्यापीठाची सांस्कृतिक घौडदौड दाखवते तशीच ''आविष्कार'' आंतर विद्यापीठीय स्पर्धेत ३० संघाचा सहभाग शैक्षणिक घौडदौड दाखवते या ३० संघात विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आपली सृजनशीलतेच कस? लावून नवीन संशोधनाचे प्रात्याक्षिक दाखवले यात आपल्या विद्यापीठात जल-नियोजनासंबंधी विषयावर बक्षिसही मिळाले. विद्यापीठ संशोधन वृत्तीस नेहमीच प्राधान्य देत आहे. मा. कुलगुरु, कुलसचिव आणि विद्यार्थी कल्याण विभागाच्या प्रयत्नातूनच बाहेर राज्यात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्ससाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्व खर्च विद्यापीठ करते. यामुळे संशोधन करणारा विद्यार्थी केवळ आपल्या संशोधनावर आणि अभ्यासावर भर देत असतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिव जयंती, महात्मा फुले जयंती आणि अन्य महापुरुषांच्या जयंती निमित्त विद्यापीठ जो सोहळा आयोजित केलजातो अवर्णनीय आहे. तसेच विद्यापीठ नामविस्तार दिनाचा सोहळासुद्धा डोळे दीपवणारा आहे. सर्वच महोत्सवात - सोहळयात नामवंतांची हजेरी असणे आणि त्यांच्या व्याख्यानाचा आस्वाद घेणे ही एक मोठी पर्वणीच असते. विद्यार्थींसाठी योगा, ज्युडो, जिम्नॅस्टीक यांचे प्रशिक्षण वर्ग येथे सुरु असतात यामुळे मानसिक आणि शारीरिक दोन्ही बाबीत या विद्यापीठाचा विद्यार्थी तयार होत असतो.

''कमवा आणि शिका'' या अभूतपूर्व अशा योजनेची अंमलबजावणी हे विद्यापीठ इतक्या कुशलतेने करते की, सामान्यातला सामान्य परिस्थिती असणारा होतकरू विद्यार्थी इथे आरामात शिक्षण घेऊ शकतो. मागच्या वर्षी पडलेल्या दुष्काळामुळे यावर्षी वसतिगृह शुल्क माफ करणारे हे विद्यापीठ नक्कीच सर्व विद्यापीठांपेक्षा वेगळे आहे. नुकतेच नॅक नामांकनात विद्यापीठास ''अ'' दर्जा मिळाला आणि गुणानुक्रमे आपले विद्यापीठ पुणे आणि मुंबई या इतर दोन ''अ'' दर्जा प्राप्त विद्यापीठाच्या पुढे आहे. या नामांकनामुळे इथल्या विद्यार्थ्यांच्या दर्जाबाबत असलेल्या शंका, शिक्षणाबाबत घेतले जाणारे आक्षेप बाजूला पडले आहेत आणि केवळ इथे असलेल्या ''अ'' दर्जाच्या शिक्षणावरच शिक्का मोर्तब झाला आहे.

**कु. करुणा जाधव**

**विद्यार्थी संसद सचिव**

## "अष्टपैलू प्रधान व्यक्तिमत्त्व घडविणारा निरंतर झरा-राष्ट्रीय सेवा योजना"

"राष्ट्रीय सेवा योजना" नावातच सर्व काही व्यापलेले, समाजहित, राष्ट्रहित, युवकांच्या शक्तींचा सहकार्यासाठी एक नियोजन बद्ध संघटन म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. भारत हा देश काही वर्षातच जगातील सर्वात तरुण युवकांचा देश बनणार आहे. ज्या देशाचा युवक हा प्रगती मार्गवर जाण्यासाठी आपल्या सर्व कौशल्याचा वापर करतो त्या देशाचा विकास हा निश्चितच होतो. विशेष करुन युवकच हा राष्ट्रीय सेवा योजनेचा केंद्र बिंदू असल्याने त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हे एक ध्येयच आहे. म्हणून युवकांच्या सर्व गरजा लक्षात घेऊन त्यांच्यात प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि श्रम कौशल्याचे गुण हे अंगीकारण्याची कला ही रा.से.यो. मध्ये शिकविल्या जाते. याच बरोबर विशेष शिबिरे, पथनाट्य, रॅली विविध चर्चासत्रे बैठका, भित्तीचित्र, प्रदर्शन यांच्या माध्यमातून समाजातील ज्वलंत प्रश्नावर प्रकाश टाकून त्यांचे निराकरण करण्याचे कार्य या ठिकाणी निरंतर चालते ते खरच नाव घेण्यासारखे आहे.

विशेष म्हणजे माझ्या दृष्टिकोनाने सात ते आठ वर्षांच्या अनुभवावरुन मी असे ठामपणे सांगतो की, राष्ट्रीय सेवा योजना हे "अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडविणारा निरंतर झरा आहे" आणि ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे

१) नेतृत्व गुण २) स्पष्टवक्तेपणा ३) वक्तशीरपणा ४) समय सुचकता ५) राष्ट्रीय एकात्मता ६) चरित्र्य संवर्धन ७) संवाद कौशल्य ८) निरोगी आरोग्य हे आहेत.

आज घडीला राष्ट्रीय सेवा योजनेने मला जीवन भर न सरणारी शिदोरी दिली आहे. ती आयुष्यभर विसरणार नाही. कारण आज मी घडलो ते फक्त आणि फक्त राष्ट्रीय सेवा योजनेमुळेच ! खऱ्या अर्थाने जर युवकाला भारताचा चरित्रवान नागरिक व्हायचे असेल तर माझ्या दृष्टिकोनाने राष्ट्रीय सेवा योजनेशिवाय दुसरा पर्याय वाटत नाही.

आजही मला तो दिवस स्मरणात आहे. **Pre NRD** गुजरात दमन - २००५ शिबिर ज्या पासून माझ्या आयुष्याला एक नवे वळण मिळाले. मग प्रगती आणि निवड, मार्गदर्शन, सत्कार, पुरस्कार ह्या गोष्टीचा राजयोग माझ्या जीवनात येत गेला त्याचे सर्व श्रेय रा.से.यो. लाच देईन.

माझ्या आयुष्यातील सगळयात मोठी उंच भरारी म्हणजे दिल्ली **NIC-2007** यमुना पुस्ता येथील शिबिरात सांस्कृतिक कला प्रकार "स्किट" स्पर्धेमध्ये राष्ट्रीय पातळीवर ३५ राज्यातून तिसरा क्रमांक मिळवून ब्रॉन्झ मेडल मिळवले तेही केंद्रीय मंत्री मणिशंकर अय्यर (युवा कार्य एवं खेल मंत्री भारत सरकार) यांच्या हस्ते एका ग्रामीण आणि नक्षलग्रस्त भागातून व सामान्य कुटुंबातील व्यक्ती सुद्धा आपल्या कला गुणांना योग्य कला सांस्कृतिक मंच मिळाले तर त्यांचे संधीचे सोने हे परिश्रमाने करु शकतो ते या राष्ट्रीय पातळीवरील मिळवलेल्या मेडलने मला सिद्ध करुन दाखवले आणि त्या वेळी मी धन्य झालो, ते फक्त रा.से.यो. मुळेच।

अशाच प्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेत महाविद्यालय आणि विद्यापीठाचे नाव राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर चमकावल्याबद्दल आणि सामाजिक योगदानाबद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यापीठ प्रशासनाने सन २००६-२००७ चा उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना औरंगाबाद जिल्हा पुरस्कार डॉ.दयानंद डोणगावकर (अध्यक्ष, अखिल भारतीय विद्यापीठ आयोग, दिल्ली) यांच्या हस्ते विद्यापीठाच्या ४९ व्या सुवर्ण जयंती निमित्त प्रदान करण्यात आला.

यावेळी असे वाटले की खरच निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या स्वयंसेवकाची दखल सुद्धा प्रशासन घेते हे पाहून माझे डोळे पुरस्कार स्वीकारतांना भरुन आले होते. कंठ दाटला होता तोंडातून एक अक्षर सुद्धा बाहेर पडत नव्हते तेव्हा डॉ.दयानंद डोनगांवकरांनी सांगितले की "बेटा ही तर तुझी सुरुवात आहे, आणि पुरस्कारापेक्षा जास्त तुझे कार्य आहे निरंतर कार्य सुरु ठेव यश तुझ्या जवळ स्वतः येईल" हे ऐकताच एक स्वतः मध्ये नवचेतना निर्माण झाली.

**P.G.** ला सोशल वर्क म्हणजे समाजकार्य विषय असल्यामुळे मी राष्ट्रीय सेवा योजनेला पुस्तकरुपी सुमन म्हणून "राष्ट्रीय सेवा योजनेतील सामाजिक उपक्रमातील युवकांचे योगदान एक अभ्यास" हे शोधनिबंध सादर केले. माझ्या संपूर्ण कार्य काळाचा लेखा-जोखा म्हणजे हे प्रबंध होय.

राष्ट्रीय सेवा योजनेची महती फार मोठी आहे, जस-जशी प्रमाणे व्यक्तिमत्त्व विकासाची प्रगतीही होत गेली तस-तसा माझ्यात सर्वांगिण विकास हे घडत गेले. ज्या प्रमाणे शिष्याला गुरु शिवाय तरणोपाय नसतो. त्याच प्रमाणे माझ्या आयुष्याला कलाटणी देणारे आणि अखंडपणे मार्गदर्शन करणारे कार्यक्रम समन्वयक डॉ.डि.बी. धायगुडे, डॉ.व्ही.एच.बजाज, डॉ.डी.व्ही.माने, डॉ.राम चव्हाण आणि सद्याचे उत्साही आणि नेहमी आम्हाला मदत करणारे डॉ. राजेश करपे (कार्यक्रम समन्वयक) आणि त्यातल्या त्यात डॉ.चेतना सोनकांबळे (संचालक विद्यार्थी कल्याण) डॉ.रामकृष्ण धायगुडे, डॉ. संजय मुन, प्रा.सोनाली क्षीरसागर ह्या सर्व कार्यक्रमाधिकाऱ्यांनी सदैव मदत करीत आम्हाला मार्गदर्शन केले.

आम्हाला सदा-सदैव प्रत्येक अडचणीत मदत करणारे आमचे "आय डॉल" प्रा.शैलेंद्र भनगे (गट समन्वयक), गुरु बंधु श्री प्रेम सलामपुरे, श्री. श्याम बन्सवाल आणि श्री नागनाथ सदाफुले यांचा मी सदैव ऋणी राहील. त्याचप्रमाणे कल्पना वाकिकर आणि शैलेश केदारे, अश्विन मेश्राम यांच्या सदैव सुख दुःखात सात दिल्याबद्दल मि आज राष्ट्रीय सेवा योजनेच्या सल्लागार समितीवर सदस्य म्हणून निवडल्या गेलो, याचे सर्व श्रेय हे गुरुजन वर्ग, मित्रपररिवारास जाते. आणि मी अभीमानाने सांगेन की, **NOT BE BUT YOU** !

जय हिंद!

**श्री.अजय विश्वनाथ देवकत्ते**
**(राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समिती सदस्य)**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.**

## युवक - महोत्सव - जल्लोष युवकांचा

केंद्रीय युवक महोत्सवातील विद्यापीठाच्या
विद्यार्थ्यांचे घवघवीत यश...!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात संपन्न झालेल्या केंद्रीय युवक महोत्सव २०१३-१४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघाने अनेक वैयक्तिक पारितोषिकांबरोबरच सांघिक विजेतेपद-देखील पटकावले. विद्यार्थ्यांनी स्पर्धेपूर्वी अनेक दिवस सातत्याने सराव केला. या सर्व विद्यार्थ्यांचे कुलगुरु डॉ.विजय पांढरीपांडे, कुलसचिव डॉ.धनराज माने, विद्यार्थी कल्याण विभागाच्या संचालिका डॉ.चेतना सोनकांबळे यांनी अभिनंदन केले.

केंद्रीय युवक महोत्सवादरम्यान अनेक स्पर्धा संपन्न झाल्या. यात सर्वच सहभागींनी आपले कौशला पणाला लावले. यामध्ये लोक / आदिवासी नृत्य, क्रिएटिव्ह नृत्य, उत्कृष्ट अभिनय (पुरुष), कोलाज, इस्टॉलेशन, पोवाडा, भजन, या कलाप्रकारात विद्यापीठाच्या स्पर्धकांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच समूह गायन, एकांकिका, प्रहसन, स्पॉट फोटोग्राफी, वाद-विवाद या स्पर्धांमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तर उपशास्त्रीय गायन, सुगम गायन, मुकाभिनय, व्यंगचित्रकला, प्रश्नमंजुषा, लोकनाट्य या स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केला. सर्वाधिक पारितोषिके मिळवून उत्कृष्ट संघ म्हणून प्रथम क्रमांक प्राप्त केला.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे झालेल्या पश्चिम विभागीय युवक महोत्सवात एकांकिका, मिमिक्री ऑन दि स्पॉट, शास्त्रीय गायन या कलाप्रकारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. मिमिक्री या कलाप्रकारात पाच वर्षानंतर विद्यापीठाच्या कलाकाराने प्रथम क्रमांक प्राप्त केला. सतरा **वर्षानंतर राष्ट्रीय युवक महोत्सवासाठी विद्यापीठाची निवड झाली.**

बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे इथे झालेल्या "इंद्रधनुष्य - २०१३-१४" मध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी अनेक कलाप्रकारात वर्चस्व गाजवले. यामध्ये स्पॉट पेंटिंग, क्ले, कोलाज यात प्रथम क्रमांक तर मिमिक्री, शास्त्रीय गायन यात द्वितीय तसेच स्फोट, सुरवाद्य, फोटोग्राफी यामध्ये तृतीय क्रमांक मिळवला. "इंद्रधनुष्य" मध्ये फाईन आर्ट चॅम्पीयनशीप मिळवली.

राष्ट्रीय युवक महोत्सव २०१३-१४ कुरुक्षेत्र हरियाणा येथे झालेल्या स्पर्धेमध्ये स्पॉट पेंटिंग, मिमिक्री, एकांकिका या स्पर्धेत सहभागी होऊन पारितोषिके मिळवली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये सर्वच विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कलागुणांना वाव दिला जातो. अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या इतर गुणांना विद्यापीठात कायमच प्रोत्साहन दिले जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सर्वच विभागांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन दिले जाते. विद्यार्थ्यांना सरावासाठी वेळ दिला जातो. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना त्यांना हव्या असणाऱ्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

केंद्रीय युवक महोत्सव, पश्चिम विभागीय युवक महोत्सव, इंद्रधनुष्य आणि हरियाणा येथील राष्ट्रीय युवक महोत्सव यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून लक्षणीय यश मिळवले. त्यांचे यश हे पुढील वर्षांमध्ये विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणदायी ठरेल यात शंका नाही.

## 'माझा पहिला प्रयत्न.....!'

लहानपणापासून निसर्गाच्या कुशीत राहून निसर्ग आता माझ्या जीवनाचा एक भाग झाला. निसर्ग माझ्या डोळयासमोरच पक्षी, झाड,कीटक ह्या गोष्टी माझ्या डोळयासमोर नेहमी त्या मला खुनावतात.

लहानपणापासुन निसर्ग पाहण्याचा व चित्र काढण्याच्या आवडीने मी निसर्गाच्या खूप जवळ जाण्याचा प्रयत्न करत आहे. नंतर थोड्या कालावधित मला ज्ञात होऊ लागले की, मी मोबाईल घेतला त्याला कॅमेरा असलेल्या त्या मोबईलने मी खुप सारे निसर्गाचे फोटो काढण्यास सुरुवात केली. कुठे ही असलो, वा फिरायला बाहेर पडल्या वर त्या ठिकाणीची आवडलेली जागा, चांगली वस्तू-वास्तू या साऱ्या गोष्टींचे छायाचित्रण माझ्या मोबाईल मध्ये त्यांना टिपत.

वडिलांनी मला खूप वेळेस मोबाईल ने छायाचित्रण काढत असताना पाहिले. नंतर मला वडिलांनी चांगल्यातला नवीन कॅमेरा दिला आणि माझी नजर ही एकशे अंशाच्या कोनातून अजून विशाल होण्यास मदत झाली. इथून माझ्या Photographi साठी अजून नवा कॅनव्हास निर्माण झाला. मी कुठल्याही फोटोग्राफीचे रचनात्मक संयोजने तयार होत होती. नवीन कॅमेरा समजून घ्यायला खूप वेळ गेला नव्हता; परंतु त्यात माझ्या मित्रांनी माझ्या नव्या दृष्टीच्या कॅनव्हाससाठी मला तयार केले व फोटोग्राफी शिकलो. मी त्यांच्या कडे जाऊन कॅमऱ्याबद्दल विचारत असे आणि ते पण मला चांगल्या पद्धतीने गाईडस करत असत Net वर अजून काही माहिती मिळवत असतो. म्हणजेच आजही मी नव्या निर्मितीचा भुकेला आहे. त्यासाठी माझी फोटोग्राफी सतत सुरु आहे. आजही कधी मी स्पर्धांमध्ये उतरलो नाही.नंतर मी शिक्षणासाठी औरंगाबादला डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात आलो विद्यापीठाच्या आवारात मला फोटोग्राफी करताना शिक्षकांनी पाहिले. लगेच सरांनी मला विद्यापीठातील युथ फेस्टीव्हलसाठी विचारणा केली आणि म्हणाले संधी सोडू नका. औरंगाबादच्या युथ फेस्टीवल मध्ये नाव नोंदविले, या युथफेस्टीवल मध्ये पहिल्यांदाच मला फोटोग्राफी बद्दल पुरस्कार मिळाला. त्या वेळी मला खूपच आनंद झाला होता. कारण मी शोधत असतानांची माझी अवस्था होती नंतर विद्यापीठाने पुढच्या फेरीसाठी मला इंद्रधनुष्यासाठी रायगडला पाठविले; पण तिथे मला अपयश मिळाले पण तिथे आलेल्या विद्यार्थ्याकडून अनेक चांगल्या गोष्टी पाहायला मिळाल्या.

विद्यापीठाने एक वेळ मला दिली, झोनलसाठी मी झोनलच्या तयारीला लागलो. दिवस-रात्र जसा वेळ मिळेल तसा मी माझी फोटोग्राफी चालू असायची इंद्रधनुष्यला ज्या काही माझ्या चुका झाल्या होत्या त्या मी सुधारण्याचा प्रयत्न केला.मग मला झोनल साठी कोल्हापुरला पाठविले, त्या फेस्टिवल मध्ये पुरस्कार मिळवला. या साऱ्या पुरस्काराने माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला. माझा आवडता विषय म्हणजे छायाचित्रण. मला असं वाटतंय की या मुळे माझ्या जीवनाला खूप-खूप फायदा होइल व माझे जिवन अधिक सुंदर होईल.

मी यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ कुलगुरु, कुलसचिव व आमच्या विभागाचे विभागप्रमुख आंबेकर सर यांच्या सर्वांच्या प्रयत्नांनी मी विद्यापीठासाठी माझं थोडसंच योगदान देऊ शकलो आणि आपण मला जी संधी दिली त्यासाठी आपला आभारी.

माझ्या आयुष्यात मोलाची निर्मिती, मला माझ्यातच गवसण्याची आपण संधी दिली व मी एकटा आलो होतो. पण वापस एकटा जात नाही तर खूप साऱ्या छायाचित्रणाच्या आठवणी घेऊन जात आहे, ते आदरणीय विद्यापीठ कुलगुरु सर, कुलसचिव, व फाईन आर्ट विभागाचे विभागप्रमुख आपल्या सर्वांच्या मुळे. आधार



**- किरण विनायक गोरवाला**
**B.F.A. (Bridge Course Painting)**
**Fine Art Department**

## आठवणी युवक महोत्सवाच्या

२१ वे शतक हे स्पर्धेचे शतक मानले जाते. प्रत्येक गोष्टींमध्ये आज स्पर्धा निर्माण झाली असून, जो कठीण परिश्रम करेल त्याला यश नक्कीच मिळेल. महाविद्यालयीन जीवनामध्ये विद्यापीठ पातळीवर घेण्यात येणाऱ्या स्पर्धेमध्ये भाग घेऊन प्रामाणिकपणे मेहनत केल्याने यश हे आपल्याकडे चालून येते असा माझा अनुभव आहे. या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी स्वतःच्या सर्वगुण संपन्न करत असताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अडचण निर्माण झाली म्हणून आपण स्वीकारलेले आव्हान मध्येच सोडून पळून न जाता रात्रंदिवस मेहनत करुन अडचणींवर मात करता येते. कलेच्या क्षेत्रामध्ये मी गेल्या पाच ते सहा वर्षापासून वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन अनेक पारितोषिके पटकाविली आहे. हा प्रवास करत असताना मला अनेक अडचणी निर्माण झाल्या, परंतु कुठल्याही प्रकारची भीती न बाळगता मी माझा कलेच्या क्षेत्रातील प्रवास अखंडपणे सुरुच ठेवला.

विद्यापीठाच्या जिल्हा युवक महोत्सव, केंद्रीय युवक महोत्सव या मध्ये मी उत्कृष्ट कामगिरी करुन नाट्यविभागामध्ये अनेक पारितोषिके मिळवली. त्यातील मिमिक्री या कलाप्रकारावर माझी चांगली पकड असल्यामुळे माझी निवड विद्यापीठाच्या संघात निवड झाली. विद्यापीठ पातळीवर होणाऱ्या 'इंद्रधनुष्य' या युवक महोत्सवात मला मिमिक्री सादर करण्याची संधी मिळाली. ज्या मध्ये महाराष्ट्रातील संपूर्ण विद्यापीठाचे संघ सहभागी होतात आणि महाराष्ट्रातून आलेल्या निवडक संघांशी स्पर्धा होऊन मला प्रथम पारितोषिक मिळाले.

या नंतर पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सवामध्ये मी आपल्या विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. त्यात महाराष्ट्र राज्यासह, गुजरात, राजस्थान, छत्तिसगढ अशा राज्यातील निवडक विद्यापीठाचे संघ या स्पर्धेमध्ये भाग घेतात.

यामध्ये मला प्रथम पारितोषिक मिळाले. व माझी निवड राष्ट्रीय पातळीवर झाली. यासाठी मी सलग चार वर्षापासून संघर्ष करत होतो. प्रत्येक वेळी मला संधी हुलकावणी देत होती तरी पण खचून न जाता हे यशाचे शिखर गाठण्याची तळमळ माझ्या अंतकरणामध्ये धगधगत होती. म्हणून मी माझ्या परिस्थतीचा विचार न करता फक्त आपली नॅशनल ला निवड होईल व त्या ठिकाणी आपली कला सादर करण्याची संधी मिळेल आणि आपले स्वप्न पूर्ण होईल या ध्येयाने रात्रंदिवस मेहनत करुन कामकरण्याची जिद्द ठेवल्यामुळे माझ्या जीवनात हा आनंदाचा क्षण सन २०१३-२०१४ याच वर्षी मिळाले.

राष्ट्रीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव हा हरियाणा राज्यातील कुरुक्षेत्र या ठिकाणी संपन्न झाला. या मोहोत्सवामध्ये संपूर्ण भारतातून फक्त १० (दहा) विद्यार्थी कलावंतांना मिमिक्री हा कलाप्रकार सादर करण्याची संधी मिळते. जे की भारतातील पाच वेगवेगळ्या विभागातून झालेल्या आंतरविद्यापीठ युवक महोत्सवातुन निवड झालेले उत्कृष्ठ असे कलावंत असतात. २०१ दहा स्पर्धकांतुन मला द्वितीय पारितोषिक मिळाले. हे पारितोषिक म्हणजे संपुर्ण भारतातुन मिळालेले दुसरे पारितोषिक आहे. हे पारितोषिक मिळाल्यानंतर मला माझ्या मेहनतीचे फळ मिळाले व मी ज्या विद्यापीठामध्ये शिक्षण घेतले त्या विद्यापीठाचे नाव कला क्षेत्रामध्ये राष्ट्रीय पातळीवर झळकवले त्याचा मला आत्मिक आनंद झाला आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याने कठीण परिश्रम केल्यास यश मिळतेच म्हणून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मनामध्ये कुठल्याही प्रकारचा न्यूनगंड न बाळगता आपल्या कलागुणांना सादरीकरण करुन स्पर्धेमध्ये भाग घेऊन राष्ट्रीय पातळीवर यश संपादन करावे हीच अपेक्षा आहे

मला मिळालेल्या यशामध्ये माझ्या गुरुजनांचा देखील सिंहाचा वाटा आहे. सध्या मी कथा खैरलांजी ह्या व्यावसायिक नाटकामध्ये काम करत आहे.



**सद्दाम अमिन शेख**

**देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद.**

माझ्या आयुष्यातील दिपस्तंभ - ''कमवा आणि शिका''

सर्व प्रथम मी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि ज्या ज्या महापुरुषांनी आपल्यासाठी शिक्षणाची दारे खुली करुन दिली अशा सर्व महामानवास मी प्रथम अभिवादन करते. आणि खालील प्रमाणे माझे मनोगत व्यक्त करते.

कमवा आणि शिका या योजनेबद्दल माझे स्वतःचे कु.वैशाली विलास घोडेराव मनोगत व्यक्त करत आहे.

मी मूळची राहणारी लाखणी मांडकी, ता.वैजापूर, जि. औरंगाबाद सदरील विषयास अनुसरुन मी माझे मनोगत व्यक्त करत आहे. मी विधी विभागाची विद्यार्थीनी असून सध्या माझ्या नावासमोर जे ॲडव्होकेट हे नाव येते ते फक्त 'कमवा आणि शिका' या योजनेमुळेच, मला वैयक्तिक या विद्यापीठाचे म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विद्यापीठाचे आणि कमवा शिकवाचे मनापासून आभार मानावसे वाटते. कारण की, मला 'कमवा आणि शिका' या योजनेबद्दल असे म्हणावेसे वाटते की, कमवा आणि शिका ही योजना माझ्यासाठी एक प्रकारचे पालक आहेत. मी तर ह्या योजनेबद्दल आणखी वेगळ्या प्रकारचे मत व्यक्त करेल ते असे की एखादा मुलगा किंवा मुलगी ज्यांना शिक्षणाची आवड आणि इच्छा आकांक्षा आहे. अशा मुलामुलींनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विद्यापीठात एक छोटंस कुटुंब आहे. ते म्हणजे कमवा आणि शिका कुठल्याही प्रकारची जात पाहिली जात नाही. उच्चनिचता पाहिली जात नाही. श्रीमंती आणि गरिबी पाहिली जात नाही. आणि जेमुलं आणि मुली आर्थिकदृष्ट्या दूबळे आहेत अशा सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थीनींनी या 'कमवा आणि शिका' या योजनेत सहभागी व्हावे. कारण की या योजनेच्या माध्यमातून जे काही आपले स्वतःचे आणि कामाच्या स्वरुपाचे मानधन मिळते ते म्हणजे आपले आर्थिक साह्य या योजनेतून पूर्ण होते.

मला माझ्या स्वतःच्या बद्दल जे काही मत या
योजनेबद्दल व्यक्त करावयाचे आहे ते म्हणजे मी जर
आयुष्यात विद्यापीठाच्या आणि या शहराच्या शे
टोकाला जरी गेले तरी 'कमवा आणि शिका' या यो
शिदोरी नेहमी माझ्या सोबतच राहील अगदी माझ्या स
बहिणी सारखी. मी जेव्हा माझी एल.एल.बी. ची परीक्ष
झाले तेव्हा मी माझ्या स्वप्नातही विचार केला नव्हता
माझे पदवीचे म्हणजे P.G. चे म्हणजेच एल.एल.एम. चे
पूर्ण करेल की नाही. पण मी माझे पदवीचा दोन
अभ्यासक्रम फक्त 'कमवा आणि शिका' या योजनेमु
करु शकले. सर्वसामान्यपणे बोलायचे झाले तर वसति
राहणारा प्रत्येक मुलगा आणि मुलगी मेसचा खर्च हा प
योजनेद्वारेच पूर्ण करु शकतात. जे की खेड्यापा
आणि बाहेर गावावरुन आलेले असतात ते या विद्य
काहीच दिवसात स्वावलंबी बनतात. ही
कामाच्याबद्दल मानधन देते आणि सर्व मूले आणि मूली
गरज भागवतात.

मी एका छोट्याशा उदाहरणाद्वारे या योजनेचे
स्पष्ट करु इच्छिते. ''आपण सर्वसामान्यपणे पाह
प्रत्येक मनूष्याला त्याचा पाठीचा जो मणका किंव
महत्वाचा आहे त्याच प्रमाणे 'कमवा आणि शिका' ही
आपल्यासाठी अविभाज्य अंग आहे. कारण की म
जर ताठ राहायचे असेल किंवा ताठ चालायचे अ
पाठीचा कणा तर आवश्यक आहेच, परंतु शि
बाबतीत 'कमवा आणि शिका' ही योजना गरजू मुल
मोठा कणाच आहे असे मी समजते. कारण की
मानापानाने आणि सन्मानाने आपण आपली गरज
शकतो ही योजना स्वतःच्या पायावर कसे उभे राह
दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वावलंबी बनवण्याचे
आणि वक्तशीर पणा काय आहे, योजनेत येण्याच्या
बऱ्याच मूलांना वक्तशीरपणाचे आणि

शिस्तीचे महत्त्व कळत नसते, परंतु या योजनेत

झाल्यावर विद्यार्थ्यांच्या जीवनात वेगळेच नियम येतात. आणि आपण शिस्तीच्या आणि स्वावलंबाच्या वर्तुळात येतो.

खरे बोलायचे झाले तर मी जे काही आज इथे आहे ते केवळ माझ्या दोन्ही आजोबांमुळे जे की एक माझ्या वडिलांचे चुलते आहेत. आणि दूसरे माझ्या वडिलांचे वडील आहेत. आणि तिसरी म्हणजे माझी जवळची मैत्रीण म्हणजे 'कमवा आणि शिका' आणि या विद्यापीठातील आदरणीय प्राध्यापक वर्ग जसे की प्रा.वाल्मिक सरोदे सर आणि आदरणीय डॉ.चेतना सोनकांबळे मॅडम, प्रा.पान्डे मॅडम, विधी विभाग हे सर्व आदरणीय प्राध्यापक वर्ग माझ्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे. माझ्या आदरणीय आई-वडिलानंतर या वरील सर्व आदरणीय व्यक्तींची मी फार ऋणी आहे, ज्यांनी की मला वेळोवेळी मला योग्य ती शिक्षण घेण्याची दिशा दाखवली.

आणि मी माझ्या सर्वात पहिली आणि महत्त्वाची परीक्षा पास झाले ती म्हणजे Bar Council ची परीक्षा. ती परीक्षा देखील मी या योजनेतील जे काही पैसे मला दरमहा मिळत गेले ते मी साचून या परीक्षेत पास होऊन मी एक वकील आहे. आणि त्याच बरोबर मी एक प्राध्यापकदेखील आहे. कारण की या परीक्षेसाठी जी काही रजिस्ट्रेशन फिस असते ती मी कुणाकडूनही न घेता स्वतःच्या मेहनतीचे पैसे कोर्टात (हाय कोर्टात भरले) आणि मग मी या परीक्षेस बसण्यास पात्र झाले. मी माझ्या आयुष्यात माझ्या या सगळयात जवळच्या मैत्रिणीला कधीही विसरु शकत नाही, जिने कि मला खूप मोठा आधार आणि आर्थिक आधार दिला.

मला माझ्या मनोगतातून एवढेच सांगावयाचे आहे कि हि आमुची योजना ताठ मानेने आणि प्रमाणिक पणाने वागावयाचे शिकवते. थोडक्यात आपल्याला आपले आई-वडील देखील हेच शिकवतात. जे की आई-वडिलांचे काम आमची योजनाच आम्हाला शिकवते.



- कु. वैशाली विलासराव घोडेराव

एल.एल.एम.

## "हॉस्टेल लाईफ"

"आज रुम झाडण्याचा दिवस कोणाचा आहे..? केवढा केर करतात सर्व... आणि हो केर रुमच्या बाहेर लोटून द्यायचा नाही. मावशी काल ओरडत होत्या..."

"आज पण बटाटा... अरे रे रे...! काल रात्री तर दिलात ना...! हे मेसवाले पण किती किलो बटाटे खाऊ घालणार देव जाणो...!"

हे संवाद कोणत्याही चित्रपटातील नाहीत तर आमच्या हॉस्टेलमधले आहेत. मातोश्री जिजाऊ मुलींचे वसतिगृह क्र. २ या हॉस्टेलमधले हे माझे तिसरे वर्ष खरं तर, विद्यापीठ म्हणाले की, पदव्युत्तर पदवी घेणारे विद्यार्थीच इथे असतात, पण काही कोर्सेस १२ वी नंतरचे असल्यामुळे १२ वीनंतर पदवी घेण्यासाठी आलेले विद्यार्थी सुद्धा येथे शिकतात. प्रथम वर्षाला असताना आमच्या रुम नंबर १४ मध्ये आम्ही पाच मुली १२ वी पास होऊन आलेल्या होतो. इतर खोल्यांमधील मुली पोस्ट ग्रॅज्युएशनच्या असल्याने त्या आमच्यापेक्षा ३-४ वर्षे वयाने मोठ्या होत्या. आम्ही इतरांच्या तुलनेत शिक्षण आणि वय या दोन्हींमध्ये कमी होतो. खर तर, जेव्हा प्रथम वर्षाला होतो तेव्हा कधी संपतील हे तीन वर्ष....? असं सतत वाटायचं. एका महिन्यात दोन-तीन वेळा आम्ही घरी जाऊन यायचो. घरुन आलो तरी घरची आठवण यायची. कॉमन बेसिन्स, बाथरुम्स आणि आरसा या सर्वांसाठी रांगेत उभे राहावे लागायचे. आजही या गोष्टी बदलल्या नसल्या तरी सवयीच्या झाल्या आहेत. त्यामुळे आरशात दहा मिनिटे उशिराने पाहायला मिळाले तरी काहीच वाटत नाही.. A Home -- Away from Home ....! असं हॉस्टेलबाबत म्हटलं जातं, ते हळूहळू आता पहायला मिळतंय. हॉस्टेल हे खरोखरच दुसरं घरच झालंय.

हॉस्टेलमध्ये न राहता बाहेर रुम किरायाने करुन राहणाऱ्या विद्यार्थ्यांना कायमच हॉस्टेलबाबत एक विलक्षण कुतूहल वाटते. बऱ्याचदा तुम्ही हॉस्टेलचे ना...! असं म्हणत चेष्टादेखील करण्यात येते. पण खरंच, हॉस्टेल हे एक प्रकरणच वेगळं आहे. जिथे एक मोठं कुटुंब सामावलेलं आहे. जिथं मैत्री आहे, भांडणे, रुसवे-फुगवे, प्रेम अशा सगळयाच गोष्टींच मिश्रण आहे. अगदी लहान-सहान गोष्टींमध्ये सुद्धा आनंद आहे.

हॉस्टेलमध्ये रात्रीच्या १२ वाजता सकाळ होते आणि दुसऱ्या दिवशी १०-११ वाजेपर्यंत दिवस उजाडत नाही. कधी-कधी गप्पा रंगल्या तर रात्रीचे १-२ कसे वाजतात हे देखील कळत नाही. त्या गप्पांना विषयाचं बंधन नाही. त्यात गॉसिप्स, हसणं-खिदळणं, कोणाच्यातरी नकला करणं या सर्वांचा समावेश होतो. दिवसा सगळे आपापल्या सोयीनुसार जेवण करतात. रात्री मात्र एकत्र जेवण करतो. पण आमच्या खोलीत सात पलंग, पाच टेबले आणि सहा खुर्च्या असल्याने खाली बसून जेवता येईल अशी जागाच शिल्लक नाही. त्यामुळे सर्व आपापल्या पलंगावर बसतात आणि जेवतात. तरीही ते एकत्रच, एका वेळी असतं. भलेही मग मेस वेगवेगळ्या असोत.

हॉस्टेलमध्ये प्रत्येकीचंच एक रुटीन असतं. अगदी सकाळपासूनच....चहा-नाष्टा-अंघोळ-जेवण-कॉलेजला जाणे - परत येणे .... एकाच वेळी अवतीभोवती खूप सगळे असतात आणि त्याचवेळी खूप एकटेपणा पण असतो. एखादा दिवस खूप आनंदी जातो तर एखादा दिवस खूपच उदास... पण जे हॉस्टेल मध्ये राहतात खरच त्यांना सगळयाच गोष्टींमध्ये "ॲडजस्ट" करावं लागतं. ज्यामुळे आयुष्यभर मैत्री करणं - ती निभावणं अशा गोष्टी सहज साध्य होतात. अशी ही "हॉस्टेल लाईफ" मी तरी कधीच विसरणार नाही.



**- क्षितिजा भुमकर**

**जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग**

## कमवा आणि शिका कष्टकऱ्यांचे दैवत

कष्टकऱ्याचे विद्यापीठ अशी ओळख असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मराठवाड्यातील गोरगरीब, आर्थिक नाजूक परिस्थिती असलेल्या शेतकरी, मजुरांच्या मुलामुलींना कमी खर्चात शिक्षण घेता यावे, त्यांचा शैक्षणिक, आर्थिक खर्च हा स्वकष्टातून भागवला जावा आणि त्याच बरोबर त्यांच्यात स्वाभिमान, गुणकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास हे गुण यावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून 'कर्मवीर भाऊराव पाटील' यांच्या प्रेरणेतून वसंतराव काळे यांनी इ.स. १९७४ साली विद्यापीठाच्या अधिसभेत 'कमवा आणि शिका' योजनेचा प्रस्ताव मांडला आणि तो मंजूर ही झाला त्यानंतर, १९७४-१९७९ पासून ही योजना आज २०१४ पर्यंत निरंतर निस्वार्थपणे कार्यरत आहे

या योजनेत पहिल्या वर्षी विद्यार्थी संख्या १५ होती व मानधन ३० रु महा होते. परंतु आज परिस्थिती बदलली आहे ती अशी की, विद्यार्थी संख्या आज ५५० तर मानधन प्रतिदिन ३६.६६ रु म्हणजे १०९९/- प्रतिमहा आहे. तसेच मुलींनाही योजनेत प्रवेश असावा असा प्रस्ताव डॉ. सुधीर गव्हाणे यांनी संचालकपदी असताना मांडला. तो मंजूर ही झाला आणि त्यावेळेस पासून आम्हा मुलींना योजनेत प्रवेश मिळण्यास सुरुवात झाली. तसेच, डॉ.के.बी.शेजूळ यांनी त्यांच्या काळात जातीभेद न करता फक्त गरिबांना प्रवेश हा उद्देश समोर ठेवून कार्य केले. यांसारखेच डॉ.नागनाथ कोतापल्ले, डॉ.धुळे, डॉ. सुदाम जाधव इ.,नी योजनेच्या विकासासाठी मोलाची कामगिरी बजावली आहे.

पूर्वी योजनेत साफ-सफाई, शेतीची कामेच केली जायची, परंतु आता योजनेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झालेला आहे. स्टेशनरी, फाईल मेकिंग युनिट, विंडो व साधे लिफाफे, पॅड मेकिंग युनिट, कार्यालयीन साहित्य इ., योजनेत आम्ही विद्यार्थी स्वतः तयार करतो व हे सर्व साहित्य विद्यापीठात पुरवले जाते. प्रिंटींग प्रेस मधील सर्वकामे आम्हाला या योजनेतून शिकण्यास मिळाली. ज्यांना शेती नाही अशा काही मुलींना आज शेतातील सर्व कामे चांगल्या प्रकारे करता येतात. आम्ही सर्वजण एकमताने, सहकार्याची भावना ठेवून मनापासून योजनेत काम करतो. त्याचा आम्हाला अभिमान ही आहे येथे फळझाडे, फूल-झाडे, भाजीपाला इ. लागवड केली जाते.

२०१३ साली फळझाडांपासून योजनेस वार्षिक उत्पन्न १,३३,०००/- मिळाले तसेच भाजीपाला - ६०,०००/- खत उत्पन्न - ९०,०००/- असे एकंदरीत वार्षिक उत्पन्न जे पूर्वी ३०००/- होते ते आता ३ लाखापर्यंत पोचले आहे.

''कमवा आणि शिका '' ही योजना एक अमूल्य योजना आहे. योजनेतून मिळालेल्या मानधनाचे एकवेळेस मुल्य करता येईल. परंतु तिने लावलेल्या संस्काराचे मोल कदापि होऊ शकणार नाही. ह्यावरुन मला एक श्लोक आठवतो तो असा-

''क्षणशः कणश्चैव विद्याम अर्थ च साधयेत ।

क्षणे कष्टे कुतो विद्या, कणे णष्टे कुतो धनम ।।

योजनेतून विद्यार्थ्यांमध्ये परिवर्तन घडून येते. वेळेचे नियोजन, पैशाची काटकसर, मेहनत, व्यक्तिमत्त्व विकास चांगले अनुभव व विविध विभागातील मुला-मुलींच्या ओळखीतून तयार झालेले चांगले मित्र आम्हाला मिळत आहेत. रोज सकाळी कामाची सुरुवात आम्ही राष्ट्रगीताने करतो. योजनेत सतत विविध कार्यक्रम राबवले जातात. त्यात योग, प्राणायाम, आरोग्य तपासणी शिबिर, व्याख्यान माला इ. कार्यक्रम आयोजित केली जातात. आम्हाला भेट देण्यासाठी आमचे कुलगुरु डॉ.विजय पांढरीपांडे, संचालक - डॉ.चेतना सोनकांबळे तसेच, कमिटी सदस्य तसेच मिडीया, पत्रकार वर्ग ही येतात. यातून एक चांगला अनुभव आम्हाला येतो

आज खेड्यापर्यंत ही योजना पोहचणे आवश्यक आहे. कारण, शेतकऱ्यांना आपल्या मुला-मुलींना शहरात शिक्षणासाठी पाठवणे शक्य नाही. त्यांची हुशार मुले खर्चामुळे घरीच राहून शेतातील काम करतात. अशा लोकांपर्यंत या योजनेचा प्रसार झाला तर, तरुण मुलांचे भविष्य सुधारेल. तसेच विद्यापीठाअंतर्गत ४५० महाविद्यालयात नियमि 'कमवा आणि शिका' योजना प्रामाणिकपणे चालवण्य बंधनकारक केले तर तालुका, जिल्हा पातळीवरील विद्या शालेय शिक्षणानंतर जवळपासच्या महाविद्यालयात योजनेत स्वकष्ट करुन, स्वतःच्या बळावर शिक्षण शकतील. असे जर झाले तर, ''गरिबांची योज गरिबांसाठी'' हा योजनेचा मुख्य उद्देश खऱ्या अर्थाने सफ होईल असे मला वाटते.

''कमवा आणि शिका'' ही योजना म्हणजे ''स्वयं होण्याच्या दृष्टिकोनातून वाटचाल करायला शिकवणा आणि भविष्याचा मार्ग दाखवणारी योजना आहे''. त्या पुरावा म्हणा किंवा चित्र आजं आपणास पाहायला मिळ आज याच योजनेत सहभागी असलेले कित्येक विद्या विद्यापीठात महाराष्ट्रात उच्च पदावर कार्य करत आहे त्यात नाट्यशास्त्र विभागाचे डॉ.अशोक बंडगर, रासे रासियोचे कार्यक्रम समन्वयक डॉ. राजेश करपे, कन्न विनायकराव पाटील महाविद्यालयाचे डॉ. शरद गावंडे प्राध्यापक व जिल्हा समन्वयक आहेत, डॉ. गणेश चंदनशि णे मुंबई विद्यापीठात विद्यार्थी कल्याण विभाग संचालक म्हणू कार्य करतात अशा अनेकांची मते मी जाणून घेतली त्यावेळे माझ्या असे लक्षात आले की, सर्वांचे मत एकच आहे, ते असे ''मला या पदावर कार्य करण्याची संधी मिळाली ती फक्त य योजनेमुळेच, ही योजना नसती तर, कदाचित मी घडलो नसतो.'' हेच योजनेचे फलित आहे.

मित्रांनो, आपल्या समोर एक आव्हान, एक सोन्याचं संधी आहे. स्वकष्ट करुन स्वबळावर शिक्षण घेऊन यश प्रा करणे आणि समाजासाठी, देशासाठी, मनातून अग तळमळीने कार्य करणे आवश्यक आहे. त्यासाठी इतिहासा पहिल्यांदा आपल्याला एका कर्तृत्ववान स्त्रीचा मदतीचा हा मिळालेला आहे. ते व्यक्तिमत्त्व म्हणजे, डॉ.चेतना सोनकांब - विद्यार्थी कल्याण विभाग संचालक. या विद्यार्थ्यांचे खऱ् अर्थाने कल्याण करतील अशी माझी अपेक्षा नाही, त विश्वास आहे.

"कमवा आणि शिका" ही संकल्पना मुळात काय आहे? हे माझ्याच अशा काही मित्र मैत्रिणींना ज्यांना स्वकष्ट म्हणजे कमीपणा वाटतो अशांना आवर्जून सांगू इच्छितो की, मित्रांनो -"आयुष्यात एवढंच लक्षात असू द्या की, स्वतःच्या श्रमाचे मोल हेच यशस्वी जीवनाचा अनमोल पाया आहे. आकाशाला गवसणी घालण्याचे जर का तुम्ही स्वप्न पाहत असाल तर तुम्हाला प्रथम पाया पक्का करावा लागेल आणि तो तुम्ही हाच विद्यार्थी जीवनात कमवा आणि शिका सारख्या योजनेतून सहभागी होऊन म्हणने, स्वकष्ट करुन स्वाभिमानाने जगूण सन्मानाने शिकून करु शकला.

मुळात योजनेचा अर्थ अशा प्रकारे होतो.

(क) कष्ट करुन कमवायला शिकवणारी

(म) मदतीचा हात देणारी

(वा) वागणुकीत परिवर्तन घडवून आणणारी

(शि) शिकवायला व शिकून मोठे बनायला शिकवणारी

(का) कायमस्वरुपी कामयाबी मिळवून देणारी.

अशा अथपूर्ण असलेल्या या आमच्या योजनेत आम्हाला कधी आर्थिक मागासलेपण जाणवले नाही. योजनेतील विद्यार्थी हा फक्त शिकावा आणि चांगले पद मिळवावे हा योजनेचा उद्देश नाही, ना विद्यार्थ्यांचा असावा योजनेतून खरा विद्यार्थी घडावा तो इतरांपेक्षा वेगळा म्हणजे, हा कमवा आणि शिकतील सर्वगुणसंपन्न कर्तृत्ववान विद्यार्थी अशी त्याची ओळख निर्माण व्हायला हवी, असे मला वाटते माझा योजनेसाठी, विद्यापीठासाठी अशी प्रेरणा बनवण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न राहील. शेवटपर्यंत हे सत्य राहील की, विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य योजनेवर आधारीत आहे आणि विद्यापीठाला मिळालेला 'A' दर्जा हा विद्यार्थ्यांवर आधारीत आहे असे मला वाटते.

**- प्रेरणा दिलीप दीक्षित**

**एम.ए. द्वितीय वर्ष समाजशास्त्र विभाग.**

## स्त्रीची व्यथा / जीवनगाथा

आजपर्यंत स्त्रीचा जन्म काही साध्य करण्यासाठी नव्हता. सारे जीवन समर्पण करण्यासाठीच होता. तिचं जीवन म्हणजे अनेक उलथापालथी कधी ती कुणाची मुलगी, बहीण, बायको, आई, सून, सासू, भावजय असते. तिला स्वतःच अस्तित्व नाहीच. असलं तरी दाखविता येत नाही, ती म्हणजे समाजाच्या कोंडवाड्यात सामाजिक बांधिलकीच्या दाव्यांनी बांधलेली गाय !

स्त्रीचा विवाह म्हणजे तिची जीवनशैली एका पुरुषाला मिळते ते अविस्मरणीय वळण. आज ती हुंडापद्धतीच्या आणि पडदापद्धतीच्या साखळीत बंदिस्त आहे. सुशिक्षित समाजामध्ये डॉक्टरांच्या, इंजिनिअरांच्या किंमती विवाहाच्या बाजारात लाख मोलाच्या झाल्या आहेत. कारण विवाहाच्या जाहिरातीतून सुद्धा पुरुषांचा दृष्टिकोन समोर येतो. 'वधू पाहिजे' या संबंधी 'सुंदर स्मार्ट आणि नोकरी करणारी' असे शब्दप्रयोग हमखास असतात. म्हणजे तिच्याविषयी विचार करताना सौंदर्य व पैसा ह्या दोन बाबीच प्रमुख ठरतात.

स्त्रीचं कौटुंबिक जीवन म्हणजे मुलांना जन्म देणे आणि त्यांचे संगोपन करणे. प्रत्येक पुरुषाला आपण आपल्या बायकोचे सम्राटच वाटतो. सकाळी उठल्यापासून चहापासून ऑफीसला जाताना कपडे व बुट देईपर्यंत ते त्यांच्याकडून कसरत करुन घेतात. पुन्हा त्यांच्या मित्र-मंडळीचा पाहुणचार स्त्रीलाच सांभाळावा लागतो. अशा अनेक घरकर्त्यांमुळे ती गुदमरते आहे.

आजच्या सामाजिक आणि राजकीय जीवनात स्त्रीला म्हणावा तेवढा वाव दिला जात नाही. तिची प्रगती म्हणजे आम्हा पुरुषांना आपल्या हक्कावर बाधा वाटते. ती शिकली, सावरली, नोकरी करु लागली, कर्तबगारी गाजवू लागली. म्हणजे तिच्या विवाहाच्या, कुटुंबातील स्थानाचा, समाजातील मानाचा प्रश्न उभा राहतो. ती समाजकारणात, पुढारीपण करु लागली की तिच्या चारित्र्यावर संशय घेणारे आम्हीच! आम्हाला वाटेल ते करण्याची मुभा-सवलत म्हणजे आपल्याला 'गर्ल फ्रेंड' चालू शकते; पण तिला 'बॉय फ्रेंड' चालत नाही असे का? मतदारात स्त्रियांची संख्या निम्मी असताना त्यांना विधीमंडळात, संसदेत, जिल्हा परिषदेत त्या फार कमी आढळतात.

आजच्या काळात स्त्री ही अवकाशात संशोधन करत आहे व भविष्यात पुरुषांबरोबर चंद्रसफरी व विश्वसफरी करण्यासाठी तयारी करत आहे. पुरुषाबरोबरीने, स्वाभिमानाने जगण्यासाठी आपल्या प्रत्येक क्षेत्रात ती येत आहे. आज ती डॉक्टर आहे, शिक्षिका, पोलीस, हवाई सुंदरी, बसचालक, संशोधक आहे. क्रीडाक्षेत्रात, शिक्षणक्षेत्रात, संशोधनक्षेत्रात, सत्ताक्षेत्रात, अभिनयक्षेत्रात ती आपली बरोबरी करत आहे. आपली सर्व क्षेत्रे तिने व्यापून टाकलेली आहेत.

स्त्री आमची बरोबरी करु शकत नाही असे आम्हाला म्हणण्यासारखे काहीही ठेवलेले नाही. तिला केवळ आमच्याशी स्पर्धा व चढाओढ करायची नाही, तर बरोबरी करायची आहे. ती काय आहे आणि काय करु शकते हे दाखवायचे आहे तिला कुणाशी हेवा देवा, द्वेष करायचा नाही तर समानता आणायची आहे.

**- भोसले सचिन लक्ष्मण**

**B.Com IInd year Commerce Dept.**

**S.C.S.C. Omega**

## निर्मळ मैत्री

मैत्री एक विशाल संकल्पना, एक विशाल भावना, जीवनाचा आधार, काळावर मात करण्याची शक्ती, जीवनाची संकलपना ही फार मोठी आहे. विशाल व्यापक आहे. प्रत्येकाच्या जीवनात संकटे येतात; पण त्या संकटांना भिऊन न जाता जो समोर जातो तोच खरा मनुष्य. पण यासाठी आधार देणारा खांब म्हणजे मित्र म्हणजेच मैत्री.

मैत्री हा आपल्या प्रेमाचाही एक भाग आहे. यामध्ये मैत्रीचे प्रेम हे अतिशय निर्मळ असते आणि या मित्र प्रेमामध्ये काहीही स्वार्थ दिसून येत नाही. यासाठी खऱ्या आणि निस्वार्थी मैत्रीची गरज असते; पण सध्याच्या स्पर्धेच्या युगात मैत्री ही निस्वार्थी न राहता प्रत्येक जण आपाआपला स्वार्थ पाहतो आहे. यासाठीची उदा. ही भरपूर आहेत. सुंदर मैत्रीची नेमकी चव काय असते याचे भरपूर उदा. भारतीय संस्कृतीत उपलब्ध आहेत. याचा आदर्श दोन्ही मित्रांसमोर असायला पाहिजे. दुसरी बाजू म्हणजेच मैत्रीसाठी मित्रांना एकमेकांना एकमेकाचे विचार पटावे लागतात. मनात भावना या निर्माण व्हाव्या लागतात. पण स्पर्धेमुळे स्वार्थामुळे मैत्रीच्या मुळावरती काही प्रमाणात गंभीर परिणाम होत आहे.

मैत्री मध्ये जीवनात एका गोष्टीला फार महत्त्व आहे. ती म्हणजे त्याग, त्यांग हा अवलंबला पाहिजे तेव्हा मैत्रीला एक निर्मळ रुप प्राप्त होते. प्रेमाचेही तसेच आहे. सध्याचे प्रेमवीर आणि स्वार्थी मित्र हे फक्त पैसा पाहून जवळीकता वाढवतात आणि धोका स्वीकारतात. पण मैत्रीचे तेच आहे. समोरील व्यकीची आर्थिक परिस्थिती पाहून सध्याचे मित्र हे मैत्री करीत असतात. आणि स्वतः पश्चाताप करुन घेतात. अशी मैत्री कोणत्या कामाची आहे. यातून काहीच साध्य होत नाही. फक्त काम भागवणे यालाच म्हणतात. प्रत्येकाला शुध्द मैत्री करण्यासाठी, निर्मळ मैत्री करण्यासाठी दोघा मित्रांमध्ये भावनिका दृष्टिकोन जपले पाहिजे. म्हणजेच एकमेकांच्या भावनांची कदर करणे, प्रशंसा करणे, समजून घेणे याही बाबी ही एका उत्तम मैत्रीत येतात. मैत्री मध्ये मी नाही पण तू अशी जी भावना असते तिला समजून घेतल्या नंतर मैत्रीला एका प्रकारचे बळ मिळते. या मुळेच मैत्रीचा पाया पक्का होतो.

**- प्रशांत विश्वंभर सोळुंके**
वाणिज्य द्वितीय वर्ष
शिवछत्रपती शिवाजी कॉलेज, उमरगा.

## ' शौकाचे महाग गरजेचे स्वस्त तेच सरकार लोकांसाठी मस्त '

गरज आणि शौक यातील जी दरी आणि दु[illegible] खरंतर सामान्य माणसाना ओळखता येते; पण राजकारण्यांना ओळखता येत नाही. आता नव्यान बनले[illegible] सरकार जर या महत्त्वपूर्ण बाबी समजून गरिबांच्या मर्मा[illegible] ओळखून आपले कर्म सुरु करतील तर खऱ्या आर्थाने 5[illegible] वर्षात जेवढया प्रमाणात गरिबी दूर झालेली नसेल तेवढ[illegible] मोठया प्रमाणात गरिबी दूर होण्यास मदत होईल. मुळा[illegible] गरीबांना सामान्य माणसांना काय हवं याचं भान ठेवू[illegible] सरकारने आपले राज्य चालवायला पाहिजे. प्रजा कशाचं[illegible] मागणी करते याची जाणीव राजाला पाहिजे. जनतेच्या हितासाठी राजकारण करायचे असेल तर तुम्ही ख[illegible] राजकारणी, अन्यथा स्वतः खुर्चीसाठी जनतेची संपत्ती खर्च[illegible] घालण्याचा तुम्हाला अधिकार नाही.

या वेळी सामान्य माणसांना सामना करावा लागतो[illegible] ती गोष्ट म्हणजे महागाई मग या महागाईला रोखण्यासाठ[illegible] सरळ उपाय आहे. दारु, सिगारेट, तंबाखू इ. व्यसनी पदार्थांच[illegible] भाव दहा पटीने वाढवा. कमीत कमी दोन रुपयाला मिळणा[illegible] सिगारेट 20 रुपये का होत नाही? ती का महाग होत नाही[illegible] तीस रुपये मिळणारी दारु 300 रु. का होत नाही. कार[illegible] यांच्या कार्यकर्त्यांना पाटर्या कराव्या लागतात. आणि का[illegible] भ्रष्ट मंत्र्यांच्या दारुच्या कंपन्या आहेत. म्हणून हे भाव वा[illegible] करत नाही. मग गरिबांना मिळणारी 20 रु. किलो तुरीची दा[illegible] एकदम 100 रु किलो का होते? 15 रु. किलोची साखर एकद[illegible] 40 रु. किलो का होते? 250 रु. गॅस 450 का होते? [illegible] वस्तुस्थिती आणि त्या सोबत जुळलेले हे प्रश्न आजपर्य[illegible] मलाच का कोणालाच सोडवता आलेले नाही?

सर्वच असे नाही, काही राजकारणी असतील[illegible] सज्जन यात शंका नाही, पण बरेच राजकारणी खुर्ची[illegible]

गैरफायदा घेतात. हा प्रश्नही छोटा नाही. एक लोकांच्या मताप्रमाणे सरळ आणि सज्जन माणूस राजकारणात येत नाही. आला तरी टिकत नाही आणि टिकला तरी खपत नाही. ही मोठी शोकांतिका आहे. राजकारण की गिधाडकारण ही मोठी समस्या आहे. बरं असो, पण आहे त्या राजकारण्यांनी खरंच राजकारण करुन जनतेच्या हितासाठी काही करायला हव. शौकीन वस्तूचे भाव कमी करायला हवे. अन्न वस्त्र निवारा शिक्षण, आरोग्य इतर बाबी कवडी मोल करायला पाहिजे. राजकारण्यांनी ठरविले तर मोठी गोष्ट छोटी होऊ शकते. आज वाढती महागाई मोठी वाटत असली तरी राजकारणी उद्या छोटी करु शकतात. सुखाचे दोन घास गरिबांच्या पोटात टाकू शकतात.

याच्यासाठी सरकारी यंत्रणेतील भ्रष्टाचार कमी करायला पाहिजे मंत्र्यांची संपत्ती अव्वाच्या सव्वा कशी वाढते याचे मोजमाप व्हायला पाहिजे. साधा सडक छाप पाच वर्षात पैश्याच्या दमदार गोष्टी कोठून करतो. एकदा आमदार झाल्यावर यांना लक्ष्मी का प्रसन्न होते? जे आयुष्य भर कमविले नाही ते पाच वर्षात कमविल्या जाते सामान्य माणूस मरेपर्यंत जेवढी कमाई करतो तेवढा यांच्या कुत्र्याचा एका महिण्याचा खर्च असतो. जनतेचा पैसा जी जनता कर भरते ती जनता ह्यांना मतदान करते ती खरी यांच्या संपत्तीचे वारस. असे असून मात्र खरे वारस भिकारीचा आगे बढो म्हणणारे अजून मागेच चालले त्याचे काय? त्यामुळे तुम्ही थोड माणूसकीने वागा हाच होईल गरीब श्रीमंतीचा जोडणारा धागा

**- आकाश एस.गायकवाड**
जेईएस महाविद्यालय, जालना

## भरकटलेल्या माणसाला सांस्कृतिक विचारांची नितांत गरज !

15-2-2014 संध्याकाळी 5.30 ची वेळ सूर्य आपणास नमस्कार घालुनी त्याच्यागावी परत चालला होता. पाखरांचा किलकिला ऐवजी गाडयांचा आवाज किरकळत होता. की जो ऐकून असे वाटले की, लगेचच माझे कान फुटतात की काय! मी या वेळी आमच्या हॉस्टेल च्या गच्ची वरती उभा होतो प्रत्येक माणूस मला घाई गरबडीतच दिसत होता. गाडयामधून निघणारा तो काळा पांढरा धुर उंच उंच इमारतीला लावलेला तो पांढरा शुभ्र रंग मला शांततेचा प्रतिक न वाटता एका शांत पडलेल्या माणसाचे प्रतिक वाटत होते. की जो फक्त स्वतः चाच विचार करतो जसे की म्हणतात ना "मै और मेरी बायको बाकी सब कायको" प्रत्येक माणूस स्वतःच्या परिवाराचा विचार करतांना दिसत होता. आणि दुसऱ्यासाठी काही करण्याची वेळ आली की अचानक त्या निर्जीव इमारतीसारखा स्तब्ध उभा राहून सर्व नाटक बघतो. बिचारी इमारत तरी दुसऱ्यांना राहण्याचा सहारा व एक आधार बनते; परंतु आजच्या माणसामध्ये दुसऱ्यासाठी काही करण्याचा विचारच राहिला नाही.

अशा वेळी आठवण आली त्या संस्कृतीची, त्या सांस्कृतिक विचारांची की ज्या विचारांच्या बळावर स्वामी विवेकानंदांनी All my american borthers & sisters म्हणुनी पुर्ण अमेरीका वासीयांची मने जिंकून घेतले. की ज्या विचारांच्या बळावर की गांधीजीनी अहिंसेचा सिध्दांत मांडुनी पूर्ण भारताला स्वातंत्र्य मिळवुन दिले आणि एवढेच नाही तर संत एकनाथांनी गाढवाला पाणी पाजवुन भूतदया धर्म दर्शविला हे सर्व घडले त्याच विचारांच्या बळावरती की ज्यामुळे श्रीकृष्ण सर्व श्रेष्ठ धनुर्धारी हताश निराश झालेल्या अर्जुनास धर्माकडून लढण्यास प्रवृत्त केले. खरंच आज प्रत्येकजन मनुष्यालाच विचारांची गरज आहे की ज्यामुळे परत एकदा आपणास बघायला भेटेल ते राम युग की ज्यामुळे बापाची आज्ञा ही सर्व श्रेष्ठ मानली जात होती. की ज्यामध्ये प्रजेचा राजा हाच सर्वश्रेष्ठ मानला जात होता.

आजच्या माणसाची व मागील माणसाची जर तुलना केली तर त्यातील जसे कडु कारले व गोड गूळ एवढे अंतर बघायला मिळेल. आजचा मनुष्य आपली पाश्चात्य संस्कृती विसरत चालला आहे त्या संस्कृतीचे आचार विचार धर्म निरपेक्ष भावना हे सर्व काही आज माणूस विसरत चालला आहे. मागील संस्कृती येईल की

साधु संत येती घरा।
तोची दिवाळी दसरा।।
परंतु आजचे लोक म्हणतात की
साधु संत येती घरा।
पुढचे दार बंद करा।।

मागील शिक्षकांना (गुरुजींना) आचार्य देवोभव म्हणत असे. परंतु आजच्या शिक्षकांसाठी हा पवित्र शब्द तोंडामधुनी बाहेरच पडत नाही. मागील शिक्षण पध्दती पाहिली तर मनाला पाझर फुटेल या प्रकारची होती; परंतु आजची शिक्षण पध्दती जर पाहिली तर झोपेचे दुसरे कारण बनली आहे.

आजच्या माणसाच्या मनामध्ये जर काही विचार येत असतील तर ते फक्त त्या खेकड्याच्या वृत्ती सारखेच येत आहे. की दुसरा जर यशाचे शिखर गाठीत असेल तर त्याचा अपमान करुन त्याला परत कधीच न उठू शकेल असे आपटायचे प्रत्येक माणुस "दुसरोके जेबका पैसा अपणे खिशे मे कैसा" ह्याच विचारात गुरफटून गेला आहे.

आज माणसाच्या मनामध्ये जी करुणा ती दया शोधुनही सापडत नाही. प्रत्येकाला फक्त मीच आणि माझाच परिवार हाच एकमेव ध्यास उरला आहे.

आज माणसाची मदत सुध्दा लोभी बनत चाचली आहे. उदा. समजा एका मनुष्याचा अपघात झाला त्याची गाडी, त्याचा मोबाईल व त्याचे पॉकेट हे सर्व एकीकडे आणि तो

माणुस एकीकडे तर अशा वेळी त्याच्या अगोदर त्याच्या वस्तुंना उचलली जाते आणि नंतर त्याला कारण मदतीमुळे यामधील मला काही मिळेल की काय ही अशी झाली आजची मदत.

आज दुसऱ्याच्या जीवावर जगुन खाण्याचा विचार माणसाच्या मनात निर्माण होत आहे. "की येईल कुणी येईल बुवा आणि देईल मना दुआ" व "देरे हरी पलंगावरी" की यावर उत्तर म्हणुनी श्रीमद भगवत गिता सांगते की, उठ आणि कामाला लाग काम करण्याची शक्ती तुझ्यात आहे काम करीत जा हाक मारीत जा मदत तयार आहे.

आजचा माणुस धर्मनिरपेक्षता सोडुन धर्मपेक्षता मध्ये हरवला गेला आहे की ज्यामुळे आज जातीवाद होतात. स्वतः स्वतःच्या जातीच्या कमानी उभ्या करतात. आज सर्व विसरुन गेले आहेत की, आपण सर्व एकाच चटई वरेच आहोत जमीन आपले चटई व आकाश आपलं पांघरुन आहे. आपण सर्व मानव जाती पशु प्राणी सर्व देवाचीच लेकरे आहोत आपल्या सर्वांची माता पितांकडुन फक्त एकच दाता आहे.आपण एकाच माळी मधील मनी आहोत आपण सर्व एकाच सुत्रामध्ये बांधले गेलेले आहोत आपली वाणी एकच आपला चमडा एकच सर्व शरीराच्या व्यथा एकच तरीसुध्दा आज या पृथ्वीवरती जातीवादी धर्मवादी काळा गोरा भेद गरीब श्रीमंत या सारखे आनेक भेद करणारे मुर्ख लोक दिसुन येतात.

आज माणुस गावाला जाते वेळेस परत येतो म्हणुन कधी न येणारा असा बाय-बाय असा शब्द वापरतो. आणि या मातृ देवो वडिलांना पित्रु देऊ असे म्हणण्या ऐवजी त्यांना वृध्द आश्रमात पाठवले जाते

आजचे युग भोमिक वादी बनत चाचले आहे. की मातृप्रेम दुर करुन सख्खा भाऊ पक्का वैरी बनत चाचला आहे. आजच्या या बोगस विचारांनी माणसाच्या चेहऱ्यावरचे तेज जसे हिसकावुन घेतले आहे. माणसाचे उसळते रक्त जसे थंड बर्फा सारखे झाले या बर्फाला पघळायचे असेल तर त्याला सांस्कृतिच्या सांस्कृतिक विचारांचा नितांत गरज आहे.

हाच विचार मिळाला त्या शिवरायांना त्यांच्या माता आमच्या राजमाता जिजाऊ कडुन, त्या झाशीची राणी मनुबाई, ते सिहांचा छावा संभाजी कि ज्यांनी त्याचा अर्थ समजावला

याच प्रकारचा सांस्कृतिक विचार आपण सर्वांमध्ये सुध्दा भरावा आपण सर्वांचे सुध्दा या प्रकारे शुध्द व ऊसऊसते व्हावे व आपण सुध्दा या संस्कृतिचे वारस म्हणुन आपले आपल्या संस्कृतिचे नांव लौकिक करावे हिच आशा सर्व संस्कृति प्रेमियांकडुनी बाळगता.

|| जय मानवता ||

**- गणेश केशव हनवते**
पी.ई.एस. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,
औरंगाबाद.

## आधुनिकतेची लहर अन संस्कृतिचा विस

खरचं विसावे शतक आधुनिकतेचे तंत्रज्ञानाचे भरभरा टीचे मानले जात आहे. मानव आपल्या बुध्दी जोरावर नवीन तंत्रज्ञान विकसीत करत आहे. आधुनिकीकरणामुळे श्रम तर कमी आहे. आणि माणुस सम झाला आहे. हे खरं पण माणुस आयुष्यभर झगडतो ते के स्वतःचे जीवन सुखी, समृध्दी व आनंदी बनवण्यासाठी कुणास ठाऊक या सुखी, समृध्दी आणि आनंदी जीवनाचे त्रिकुट या आधुनिक जीवनात प्राप्त करणे अशक्य झाले आ कारण आम्ही विसरत चाललो आहोत आपली संस्कृ आपल्या संस्कृतिच्या मानमर्यादा आणि त्याची शिकवण अगदी रसातळाला मिळाली आहे. आपली संस्कृती ज पैलुंमुळे जगविण्यात आहे. जगावर तिचा प्रभाव आहे. ते पैलु आम्ही आज नामशेष करण्याच्या मार्गावर आहोत.

आधुनिकीकरण एवढे पुढे निघुन गेले की संस्कृ कुठे तरी मागे पडली आहे. आधुनिक तंत्रज्ञानावर आम आपली भरभराटी करुन समृध्द झालो पण सुखी आ आनंदी जीवन ही गोष्ट प्राप्त करु शकत आज संस्कृ बदलली, प्रवाह बदलले, समाज जीवन वेगळया वळणाव जाऊन पोचले आहे. नात्याची कदर राहिली नाही माणुसकीची भावनाच निर्माण होत नाही.

आपली संस्कृतीशी निगडीत आपला इतिहास आहे आणि जर संस्कृतिशी निगडीत वर्तमान असेल तर भविष काळ जरुर उज्ज्वल असेल.

आपली संस्कृति प्रेमस्वरुपतेने सतत सांगत आहे मातृ देवो भवः पितृ देवो भवः आचर्य दवो भवः अशी शिकवणी आहेत. पण आज जे काही दिसत नाही. आई-वडिलांना दे मानण्याची प्रथा कुठे अन त्यांना दिलेली वृध्दाश्रमाची व्यथा कुठे याचा विचार करत असतांना असेच आढळुन येते की माणुस आधुनिक प्रगती करु लागला पण संस्कृतीच्या शिकवणी विसरु लागला आणि ही बाब सुशिक्षीतात जास्त

आहेत. कारण आपल्याकडील वृध्दाश्रमाची वाढती संख्या गुरुचा अनादर या आपल्याकडील क्रांती नसून आपल्या मर्यादा संपन्न संस्कृतीला लाभलेला कलंक आहे. म्हणूनच आज लोक थोर, आई-वडील, गुरु इतरांशी उदधट वागताना दिसून येतात. त्यामुळे सर्व जीवनच दुःखी, कष्ठी व निरागस होत आहे. आज माणसाला माणूसकी जपण्याचा संदेश देणाऱ्या संस्कृतीला बंधने समजतात तर जीवन जगण्याच्या स्वैराचाराला खीळ घालणाऱ्या गोष्टीमध्ये समावेश होत आहे.

असं का होत आहे कारण आम्ही आमचं विसरलं आणि परकीय स्वीकारलं आम्ही आधुनिक प्रगती करताना इतर राष्ट्रासोबत तफावत करत आहोत. आपली संस्कृती सोडून अर्थात पाश्चमात्य संस्कृती स्वीकारत आहोत. आज या आधुनिक लोकांना चांगलि वाईट यांचा विवेक नाहीसा झाला आहे. आज आई 'मॉम' झाली तर 'बाबा' डॅडी झाले आहेत. मान्य आहे की तुमचे बोलण्याचे उच्चार बदलले तरी चालेल पण भावनेची संस्काराची परिभाषा बदलू देऊ नका, कुटूंबातून संस्कृतीची जाण करुन घ्यावी. माणूस माणूस असावा कारण चारित्र्य ही गुणवत्ते पेक्षा महत्वाचे असते तशा प्रकारेच प्रयत्न केले पाहिजेत आणि आधुनिकतेला आपल्या संस्कृतीची सांगड घालून दिली पाहिजे जेणे करुन पुन्हा माणसांत जिव्हाळा, प्रेम, आपुलकी व आदर हे गुण अंगीकृत होतील आणि ही आपली भारतीय संस्कृती तेजस्वीपणे सतत चमकत राहील.

**- ठाकुर आमरसिंग नरसिंग**
पी.ई.एस.कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,
औरंगाबाद.

## आजची प्रसारमाध्यमे

मानवी जीवनामध्ये प्रसारमाध्यमांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. या तंत्राचा सहा शतकांपूर्वी शोध लागला. त्यावेळेपासून प्रसारमाध्यमांनी समाजाला माहिती, शिक्षण देण्याचे आणि मनोरंजन करण्याचे काम केले. प्रसारमाध्यमांत काळानुरुप बदल होत आहेत. छपाई यंत्राचा शोध लागल्यानंतर मुद्रित माध्यम आले. यानंतर संवादाचा शोध लागला काही दिवसानंतर इलेक्ट्रॉनिक माध्यामांचे युग आले. या माध्यमाने तर जगाला एक खेडे बनवले. माहिती-तंत्रज्ञानाचे जाळे घरोघरी पोहोचले. मोबाईल क्रांती झाली. प्रत्येकाचा पाकिटात इंटरनेट आले. सोशल साइटचे युग अवतरले. त्याने संपूर्ण जग झपाटले आहे. समाजसेवक अण्णा हजारे यांचे आंदोलन असो की आम आदमी पार्टीचा उदय त्यांचा प्रचार प्रसार यामुळेच झाला आहे.सध्या सर्वच पक्ष प्रचारासाठी सोशल साइटसचा वापर करीत आहेत. सिटीझन्स हे आता नेटीझन्स बनले आहेत. त्यामुळे ज्या प्रमाणे इतिहास बदलत असतो त्या प्रमाणे प्रसारमाध्यमांनीही स्वतःमध्ये तंत्रज्ञानावर आधारित बदल केला तर त्यांना कधीच मरण येणार नाही.

हजारो वर्षांचा इतिहास असलेल्या मानवी जीवनामध्ये सहा शतकांपूर्वी आलेल्या छपाई यंत्राने शोध लागला. तेव्हा त्यादवारे माहिती,शिक्षण,संवाद साधत मनोरंजनही करण्यात येऊ लागले. त्यामुळे मानवी विकासाला हातभार लागत होता यातच टेलिफोनचा शोध 1876 साली लागला तेव्हापासून मुद्रित माध्यमांबरोबरच संवाद माध्यमासंही सुरुवात झाली. यातील पुढचा टप्पा हा 1906साली गावण्यात आला. या वर्षी रेडिओच्या माध्यमातुन सुरूवात झाली. त्याचा वापर अनेक गरीब देशांमध्ये करण्यात येऊ लागला. या माध्यमातून एकाचवेळी अनेकांशी संवाद साधण्यात येऊ लागले होते. यामुळे हिंदुस्थानही पाठीमागे नव्हता. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर 1960 साली झालेल्या हरितक्रांती मध्ये या रेडिओ माध्यमाने महत्त्वाची भुमिका निभावली. त्यामुळे ही हरितक्रांती यशस्वी होण्यास मदत झाली.त्यावेळी उत्तम बियाणे,कीटकनाशके आणि शेतीतील नवनवीन शोधांची माहिती रेडिओच्या माध्यमाने शेतक-यार्पंत पोहोचविण्यात येत होती.यानंतरच्या प्रसारमाध्यमातील टेलिव्हिजनने तर जगात क्रांतीच केली. प्रत्येकाच्या घराच्या आतमध्ये एक जग सामावले गेले. वृत्तपत्रांतील बातम्यांसाठी सकाळपर्यंतची वाट पाहण्याची गरज संपुष्टात आलेली होती. त्याचवेळी 1960 साली आलेल्या इंटरनेट माध्यमानेही पायाभूत सेवा सुविधांमध्ये मोठया प्रमाणात निर्मिती करण्यास सुरुवात केली होती.या सुरुवातीमुळे आज प्रत्येक सिटीझन्सचे रुपातंर नेटीझन्समध्ये झाले आहे. हे सर्व तांत्रिक क्षेत्रामध्ये होत असलेल्या बदलामुळे घडले आहे.

समाज पहिल्यांदा लिखाणाद्वारे संवाद साधत होता. त्यानंतर लॅण्डलाईन, टेलिफोन, रेडिओ, टेलिव्हिजन, इंटरनेट आणि आता सोशल साइटसद्वारे संवाद साधत आहे. या सर्व संवादामध्ये अफाट शक्ती आहे. दर्जेदारपणे संवाद साधण्यासाठी देशोदेशीच्या सीमा ओलांडण्यात आल्या आहेत. मोठ्या प्रमाणात डिजिटल नेटवर्क विकसित होत आहेत. या प्रसारमाध्यमांचा पाया असलेल्या वृत्तपत्रानी समाजाला माहिती देण्यास सुरु केली होती. परंतु Ùeebveer फक्त आपली पारंपरिक भूमिकाच जोपासली नाही तर समाज जागृतीचे कामसुध्दा केलेले आहे. अनेक समाजांना आणि वंचितांना संघटित करण्याचे कामसुध्दा केले आहे. हल्ली सोशल मीडीयानेदेखील सुरुवातीच्या काळात वृत्तपत्रांनी ज्याप्रमाणे समाजाला एकत्रित करण्याचे काम केले होते. ते तसेच काम सुरु केले आहे. त्यामुळेच अनेक चळवळीचा प्रचार आणि प्रसार काही मिनिटांतच जगभर होत आहे. समाजसेवक अण्णा हजारे यांचे आंदोलन असेल किंवा आम आदमी पक्षाचा उदय यामध्ये सोशल मीडीयाने महत्त्वाची भूमिका निभावली आहे.

पूर्वी इंटरनेट फक्त संगणकावर वापरता येत असे. त्यामुळे गोरगरीब जनतेच्या आवाक्याबाहेरचे होते, परंतु तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे संगणक, लॅपटॉपनंतर आता टॅबलेट आले आहेत. त्याची किंमतही गोरगरिबांच्या आवाक्यात आहे. आकाश टॅबलेटसह इतर टॅबलेट 2 हजार ते 1 हजार रुपयांपर्यंत मिळत आहेत. त्यामुळे प्रत्येक हिंदुस्थानी विद्यार्थ्याची स्पष्ट झालेली आहे. सामान्य जनतेच्या हिताकरिता आणि सुखाकरिता आकाशवाणीला कार्य करायचं आहे आणि त्यातच आकाशवाणीची भुमिका स्पष्ट झालेली आहे. आकाशवाणीच्या गेल्या पंचावन्न वर्षाच्या इतिहासात हे व्रत घेऊन तिचं प्रसारण कार्य चालू असल्याचं आपल्या लक्षात येईल. 1930 मध्ये कलकत्ता आणि मुंबई येथे खाजगीरीत्या प्रसारणाचं काम करणाऱ्या कंपन्या त्या वेळच्या सरकारनं ताब्यात घेतल्या आणि 1936 मध्ये केंद्र सरकारच्या माहिती नि प्रसारण खात्याच्या अंतर्गत त्यांचा कारभार आणण्यात येऊन ऑल इंडिया रेडिओ ची सुरुवात झाली. 1957 मध्ये आकाशवाणी हे सार्थ अभिधान स्वीकारण्यात आलं. सरदार वल्लभभाई पटेल हे पहिले माहिती नभोवाणी मंत्री होते. त्यांनी आकाशवाणी च्या कार्याचा पाया घातला नि त्यानंतर बाळकृष्ण केसकर यांनी या पायावर विस्ताराची इमारत उभारली. स्वातंत्र्यापूर्वी युध्दाच्या प्रचार कार्यासाठी जन्मलेल्या रेडिओला स्वातंत्र्यानंतर मात्र आपला चेहरा मोहरा आणि हेतू पूर्णपणे बदलावा लागला.

नव्या राष्ट्राच्या उभारणीसाठी, विकासासाठी जनतेला प्रेरित करणं आणि विकासाची वार्ता घरोघरी पोचविणं हे मुख्य उद्दिष्ट रेडिओला ठेवावे लागेले. प्रसिध्दीची सर्व माध्यमे, लोकशिक्षण, मनोरंजन आणि माहिती प्रसार या त्रिसूत्रीच्या आधारे कार्य करीत असतात. रेडिओ त्यास अपवाद नाही. परंतु प्रत्येक प्रसिध्द माध्यमांचं स्वतंत्र पृथक वैशिष्ट्य असतं. वाचनीयता हा मुद्रीत माध्यमाचा प्राण असतो. तर दृश्यमयता हा दूरदर्शनचा श्रवणीयता हा आकाशवाणीचा केंद्रबिंदू असतो. प्रत्येक माध्यमाची शक्ती त्याच्या त्याच्या या वैशिष्ट्यांत असते. त्यामुळेच जगात सर्वत्र ही सर्व माध्यम आपापलं कार्य करीत असताना दिसत आहेत. वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट अशी विविध प्रकारची माध्यम असल्यामुळं जनतेलाही अनेक प्रकारची माहिती सुलभतेने मिळते. संगणक वापराचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

**- मोबाईल :-**

मोबाईलच्या क्षेत्रात तर अविश्वसनीय प्रगती होत असून प्रत्येकाच्या पॉकिटमध्ये इंटरनेट कैद झाले आहे. जगभरातील अनेक देशांमधील सरकारे जनकल्याणाच्या योजना इंटनेटच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचवत आहेत. यासाठीची माहिती आणि सूचना तर मोबाईलवरच पाठविण्यात येत आहेत. त्यामुळे माहितीची देवाण-घेवाण अतिजलद आणि सुलभ झाली आहे.

या सर्व बदलांमुळे इंटरनेट हे नवीन इलेक्टॉनिक लोकशाहीचा पाळणा बनला असल्याचे म्हणणे ही अतिशयोक्ती ठरणार नाही. आज परिवर्तनाचे साधन म्हणुनच इंटरनेटचा वापर होत असून या साधनाव्दारेच सरकारच्या योजनांची माहिती,कोट्यवधी रुपयांचा करसुदधा गोळा करण्यात येत आहे. त्यामुळे स्वच्छ प्रशासन निर्मितीसाठी याचा उपयोग होत आहे. पूर्वी वृत्तपत्रांनी लेखणीच्या माध्यमातून आपली ताकद सिद्ध केली होती परंतु पंत्रज्ञानातील प्रगतीमुळे यात बदल झाला छापलेल्या शब्दांच्या ताकदीची जागा आवाजातील व्हिडीओंनी घेतली आहे. ही सर्वकिमया वृत्तपत्रा पासुनसूरु झालेली होती. वृत्तपत्रातून 24 तासांत माहिती जनतेपर्यंत पोहोचत आहे. त्यामुळे शासकीय अजेंडा,धोरण,निर्णय यासाठी हे माध्यम अतिजलद पदधतीने समाजापर्यंत बातम्या पोहोचत आहेत.

या इंटरनेटच्या भावविश्वावर नियंत्रण मिळवणे किंवा सेन्सॉरशिप लादणे सुदधा आता सरकारच्या आवाक्याबाहेर गेले आहे. त्यातुळे छपाई यंत्रापासुन सुरुवात झालेली लढाई आता इंटरनेटवर येऊन ठेपली आहे. ती लोकशाहीच्या मजबुतीकरणास पोषकच ठरलेली आहे.

सध्या सर्वत्र प्रसारमाध्यमांचे भविष्य काय,वृत्तपत्रे संपणार का, असे प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. त्यावर एकमेव उत्तर नाही हे आहे. परंतु वृत्तपत्रांना जिवंत राहण्यासाठी तंत्रज्ञानामध्ये ज्या गतीने बदल होत आहे. त्याच गतीने आपल्यात बदल करावा लागणार आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमातील रेडिओ मागे पडला असताना टेलिव्हिजन पुढे आले आहे.

'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे आकाशवाणीचे ब्रीदवाक्य आहे. आणि त्यातच 'आकाशवाणी' ची भूमिका माहितीच्या या प्रस्फोट युगात ही साधनं वरदानच ठरली आहेत. माध्यमांच्या स्पर्धेचा आणखीही एका दृष्टीन विचार करता येतो. ज्याप्रमाणे या माध्यमांचं स्वतःचं वैशिष्ट्ये असते, त्याप्रमाणे त्यांच्या स्वतःच्या मर्यादा असतात आणि या मर्यादामुळेच त्यांची स्पर्धा टिकून राहू शकते . टी.व्ही. कितीही आवडला तरी शेतावर काम करणा-या डोंगराळ आडरानात सायकलवर भटकणा-यास ट्रॅन्झीस्टर गळयात अडकवून फिरण्याची जी सुविधा आहे ती टी.व्ही.ला नाही रेडिओच्या श्रोत्याला एक प्रकारे मानसिक कल्पना शक्ती वापरण्याचा आनंद मिळतो टी.व्ही. वर सर्वच दृश्य डोळयां पुढे दिसत असतात, कल्पना शक्तीला वाव नसतो आणि लागण्याचा रंगून जाण्याचा अनुभव फार क्वचित वाटयास येतो.

बोलले गेलेले शब्द किंवा उच्चारलेले स्वर हेच आकाशवाणीचे प्रमुख साधन होय. या साधनाचा कौशल्यानं वापर करुन वेगवेगळया श्रोत्यांना आकाशवाणी खिळवून ठेवू शकते आकाशवाणी आपल्या दैनंदिन जीवनाचा एक अपरिहार्य भाग बनवू शकते. आजारी माणसाला रेडिओ एकांतातला आपला मित्र सखा वाटतो तर वर्गात शालेय कार्यक्रम पाहणा-या मुलांना रेडिओ आपला शिक्षक वाटतो.

समाजाची वैचारिक जडणघडण अनेक घटकांचा प्रभाव पडन होत असते. त्यातील काही घटक दृश्य असतात तर काही अदृश्य असतात. काहींचा प्रत्यक्ष प्रभाव असतो त

काहीचा अप्रत्यक्ष प्रत्यक्ष होत असतो. जनसंवाद साधने त्यात महत्वाची भूमिका बजावत असतात स्वातंत्र्यपूर्व काळात वृत्तपत्रे हे एकच जनसंवाद साधन प्रामुख्याने उपलब्ध होते, परंतु स्वातंत्र्योत्तर काळात चित्रपट आकाशवाणी,दूरदर्शन अशा दृकश्राव्य संवाद साधनांचा प्रसार अधिक झाला आणि वैचारिक जडणघडणीच्या कार्यात वृत्तपत्रांना त्याच्याशी स्पर्धा करीत आपले कार्य चालू ठेवावे लागले. त्यामुळेच वृत्तपत्रांनी निश्चित वैचारिक भर कोणती घातली याचे उत्तर शोधताना बदललेल्या या परिस्थितीचा विसर पडता कामा नये.

**कु. विणा कुलकर्णी**
**बी. ए.**

## पर्यावरण संवर्धन

सध्या पावसाळा सुरु आहे. पावसाचे दिवस म्हणजे पाऊस येणारच पण अवेळी पडणारा पाऊस गर्जे पेक्षा खूपच धो-धो कोसळणारा पाऊस ज्यामुळे सर्व जनजीवन विस्कळीत होते. नदी नाल्यांना आलेल्या पुरामुळे होणारे शेतीचे गावाचे नुकसान थोडक्यात अनिश्चित असंतुलित येणाऱ्या पावसा मुळे सर्वांच्या तोंडून एकच शब्द निघतो काय हो पाऊस? पुर्वी ज्या पावसात खेळण्याचा, भिजण्याचा आनंद घ्यायचा त्याला आज कंटाळलाय? बरे असो इतका पाऊस येऊनही वातावरणातील उष्णता मात्र कमी झाली नाही. या सर्व बदलांना सर्वस्वी आपणच जवाबदार आहोत असे म्हणणे चुकीचे होणार नाही.

आज पर्यावरण ग्लोबल वार्मिंग हे सध्या परवलिचे शब्द झाले आहे.पर्यावरण म्हणजे पृथ्वी भोवतीचे वातावरण ह्या वातावरणातील तापमानात झालेली वाढ म्हणजे ग्लोबल वार्मिंग: बरेचदा झाडांची मोठया प्रमाणात तोड झाली म्हणुन पाऊस येत नाही असे म्हटले तर उत्तर मिळेल मागच्या वर्षी झाडे कमी होती म्हणून पाऊस कमी पडला. पण एका वर्षातच इतकी झाडे वाढली काय? ज्यामुळे इतका पाऊस पडतो. हे जरी वर वर खरे असले तरी झाडे कमी जास्त हे फक्त दिसणारी बाब झाली पण झाडांपासून निघणारे किंवा झाडांनी शोषुन घेतलेले वायू मात्र उघडया डोळयांनी न दिसणारी बाब आहे. यावर जर विचार केला तर पर्यावरणातील बदलांचा प्रमुख घटक झाडे आहेत. असे जाणवेल वातावरणात कार्बंडायऑक्साईड, कार्बनमोनाऑक्साईड, क्लोरोफ्लोरो कार्बन, सल्फरडाय ऑक्साईड या सारखे इतर वायु सोडणाऱ्या गाड्या, मोटारी, विमाने अशी वाहतुकीचे साधने, शीतकरण यंत्रे, कारखाने खूप जास्त प्रमाणात आहेत व रोज नवीन हाते आहेत. परंतु हे सर्व प्रदूषण रोखण्यासाठी पर्यावरणातील जपवणूक होण्यासाठी झाडे जे हवेतील विषारी वायू ज्यामुळे वातावरणाचे तापमान वाढते. ज्यामुळे आपल्या आपल्या आरोग्यास बाधा होत असे वायू शोषण्याचे काम वायू करतात.

ही 1979 च्या दुष्काळी वातावरणातील गोष्ट आहे. लोक म्हणाले अरे हे पाणी साठवून राहतय ही बरी गोष्ट आहे. तेव्हा मिश्राजींनी लोकांना समजावले की आता हे पावसाचे पाणी शेतीच्या उपयोगी पडल ते ठिक आहे. पण हे लक्षात ठेवा की तुमच्या डोक्यावरच्या उघड्या बोडक्या डोंगराची तुम्ही चिंता केली नाही. तर त्यांचे सारखे तुम्ही उघडे बोडखे व्हाल हा जो बांध घातलाय तो दोन तीन वर्ष चार वर्षात निकामी होईल कारण त्यात गाळ साठेल म्हणून फक्त बांधाची आणि पाण्याची चिंता करुन भागणार नाही तर ज्या डोंगरामधून पाणी वाहून येतंय त्याची चिंता तुम्ही करायची ते काय म्हणतात हे लोकांना कळलं जंगल उगवावं म्हणून लोकांनी धडपड केली. जनावरांना चराई बंद केली हळु-हळु परत आल जंगल वाढु लागलं. चारा निर्माण झाला तसा दुधाचा धंदा उभा राहिला. इतका चारा झाला की लोक म्हशी ठेवायला लागले आणि ते आज लाखो रुपयांचं दूध विकतात.

जगभरात पाण्याचा सर्वात जास्त वापर औद्योगीक क्षेत्रात होतो त्याला आधुनिक जल अर्थकारण म्हणतात. उद्योग क्षेत्र पाण्याचा वापर करत आणि वाया जाणारे पाणी शहर वापरतात. पण भारताच जल अर्थ कारण वेगळ आहे. शेती 70% पाणी वापरते परिणामी शहरी भारत जलस्त्रोत्रावर मागणीचा प्रचंड दबाव टाकत आहे. पुन्हा प्रश्न तोच असं करणं आपल्याला परवडणार आहे का ? अलीकडच्या काळात दोन घटना घडल्या. शेतकरी निषेधाच्या मोर्चात सामिल झाले ते घोषणा देत असतांना पोलीसांच्या बंदुकीच्या गोळया खाऊन मेले बेपर्वा सरकारने पोलीसांना ही पाऊलं उचलू दिली ह्या निषेधाचे कारण पाणी. त्यांच पाणी जयपुर शहरासाठी खेचल जात होत त्याचा निषेध करीत होते. आपण शहरवासी वाढत्या गरजा घेऊन ग्रामीण भागातील पाण्यावरच त्यांच ओझ टाकत चाललो आहोत. शहरासाठी लागणार पाणी

अधिकाधिक लांब वरुन येत आहे. आणि त्याही पेक्षा गंभीर गोष्ट म्हणजे आपण चांगल पाणी वापरतो. आणि दुषित सायनाईड सारखे रासायनिक पदार्थ तसेच विशिष्ट जीवाणुंचे बोटुलिझम विष हे मूलतः अत्यंत घातकपदार्थ काही इतर प्रदूषके मात्र इतकी घातक नसतात. सावकाश विघटन होणाऱ्या किंवा अविघटनशील प्रदूषकांचे उदाः (डि.डि.टी,सि.एफ.सी) परिणाम दीर्घकाळ टिकणारे आणि दूरगामी असतात.

उच्च संहती असतांना प्रदूषकाचे परिणाम बहुदा अधिक तिव्र असतात. प्रदुषणाचे दुषपरिणाम मानव आणि मानवांनी निर्माण कलेले पर्यावरण यांच्यावर जसे दिसून येतात तसेच ते इतर सजीवांवर आणि परिसंस्थावर म्हणजे नैसर्गिक पर्यावरणावरही दिसुन येतात.

प्रदुषणामुळे हवामानामुळे होणाऱ्या बदलांचा परिणाम मोठया लोकसंख्येवर होत असल्याने हे बदल महत्त्वपुर्ण ठरतात. पूर्वीच्याकाळी हवामानातील सर्व बदल नैसर्गिकपणे घडत. औद्योगिक क्रांती नंतर यंत्रे चालवण्यासाठी लागणाऱ्या ऊर्जेची गरज सतत वाढत चालली आहे. वाहन धावण्यासाठी लागणारी ऊर्जा किंवा निर्मितीसाठी लागणारी ऊर्जा ही बहुतांशी कोळसा व इंधन तेल यांच्या ज्वलनावरुन मिळवली जाते. या ज्वलन प्रक्रियेतन फार मोठ्या प्रमाणावर तयार होणारा कार्बनडाय ऑक्साईड व इतर वायू हे वातावरणातून पसरत राहतात. हे वायू वातावरणात पसरविणे आणि अशाच इतर मानवी कृती मधून हवामानामध्ये जाणवण्याजोगे फरक पडत चाचले आहे.

प्रदूषणामुळे हवामानात घडून येणाऱ्या प्रमुख बदलांमध्ये धुरके (धूर व धुके यांचे मिश्रण) हरितगृह परिणाम आणि जागतिक तापमान वाढ ओझोनक्षय आणि पर्जण्य यांचा समावेश होतो.

सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी क्षितिजावर आकाशामध्ये पुष्कळदा धूरकट थर दिसतो हे धुरके असते ह्यात कोळशा सारख्या जिवाश्य इंधनाच्या अपूर्ण ज्वलनातन निर्माण होणारा कार्बनमोनाऑक्साईड वायू आणि यातील इतर पदार्थांपासून निर्माण होणारा सर्ल्फलडायऑक्साईड आणि इतर संयुगे असतात.

1952 मध्ये लंडन मध्ये अत्यंत दाट धुके निर्माण होऊन त्यामधून लोकांना श्वसनाचे इतर आजार जडले आणि त्यात शेवटी चार हजार माणसांचा बळी गेला. धुक्या मुळे स्पष्ट दिसत नाही. तसेच श्वसन रोग होतात. विशेषः थंड हवामानात सभोवतालचे स्पष्ट न दिसल्यामुळे रस्ते, रेल्वे व हवाई वाहतुकीवर विपरित परिणाम होतो. अपघात घडतात.

हरित गृहात प्लॅस्टीक किंवा काचे सारख्या पारदर्शक आवरणाच्या आत झाडे ठेवली जातात. विशेषः थंड हवामानात झाडे ठेवण्यासाठी, वाढविण्यासाठी हरितगृहे उपयोगी पडतात. विशिष्ट रचनेमुळे हरित गृहांमध्ये सुर्याची ऊर्जा पकडून ठेवणे शक्य होते. स्थितांबर ह्या वातावरणाच्या थरामध्ये ओझोन वायू निसर्गतः आढळून येतो. इथे ओझोन वायू सूर्य प्रकाशातील अतिशील किरणांचा U.V.B - घातक घटक शोषून घेतो.

सी.एफ.सी. या हरितगृह पदार्थांची जेव्हा स्थितांबरातील ओझोन वायूशी अभिक्रिया घडते तेव्हा मोठा वाईट परिणाम घडतो. वर्षानुवर्षे स्थितांबरात असे पदार्थ पोहचत राहिल्यामुळे तेथील ओझोनमध्ये घट झालेली आढळते. दरवर्षी अंटार्टिका खंडाच्या वरील वातावरणात ओझोनमध्ये होणारी घट अनेक आठवडे टिकून राहते. त्यालाच ओझोनचे भगदाड (Ozone Hole)म्हटले जाते. हया विरळ ओझोन थरातून म्हणजेच भगदाडातून पृथ्वीवर सहज पोचणाऱ्या अतिनील किरणांमुळे जमिनीवरील आणि पाण्याखालील सजीव सृष्टीची हानी झाली आहे. ओझोन भगदाडाच्या खालील प्रदेशात राहणाऱ्या लोकांमध्ये त्वचेच्या कर्करोगाचे प्रमाण वाढलेले आढळून आलेले आहे.

पाऊस,हिम,धुके, दव यामुळे हवेमधील बहुतेक प्रदूषके निघून जातात. पृथ्वीच्या पृष्ठभागावर आणि एका खंडातून दूसऱ्या खंडात ही प्रदूषके वाहून जातात. वातावरणातील सल्फर आणि नायट्रोजन यांचे ऑक्साइ पावसात मिसळल्यावर त्यापासून आम्ले तयार होतात. अश आम्लयुक्त पावसामुळे फक्त मासे, वनस्पतीच मरतात असे नाही तर संपूर्ण परिसंस्थेचीच हानी होते. शेवटी अशी खराब.पावसाचे पाणी साठवण्याची जमिनीची क्षमता खडकांच्या जडणघडणीनुसार बदलते त्यामुळे देशाच्या विविध भागात पाण्याची उपलब्धता वेगवेगळया प्रमाणात असते. वन संपत्तीत सतत होणारी घट जमिनीच्या जलधारण क्षमतेवर परिणाम करते.

**- पाण्याचा दुरुपयोग व उधळपटटी कमी करणे:-**

पाणीसाठा टिकवण्याच्या दृष्टीने वेगवेगळया कारणांस्तव पाण्याची नेमकी गरज किती ते ओळखणे ही पहिली पायरी आहे. उदा:-पिण्यासाठी पाण्याची जेवढी गरज आहे तेवढेच पाणी भांडयात भरुन घेणे,दात घासताना गरज असेल तरच नळ सोडणे इ.असाच विचार पाण्याच्या इतर उपयोगांसाठी व औद्योगिक कारणांसाठीही करावा उद्योग धंद्यांनीदेखील निर्मितीचा खर्च आटोक्यात ठेवण्यासाठी पाण्याचा काळजीपूर्वक वापर शेतीमध्ये ठिबक सिंचन,उघडया शेतजमिनीवर शेतातील कच-याचेच आच्छादन घालणे ही तंत्रे वापरुन पाण्याचा वापर अधिक कार्यक्षमतेने करुन अपव्यय टाळावा.

**- सांडपाण्याच्या पुनर्वापरासाठी उपाययोजना :-**

सांडपाण्याचा पुनर्वापर हा देखील पाणी वाचवण्याचा एक उपाय आहे. उद्योगसमूहांनी पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया करुन त्या पाण्याचा अन्य कामांसाठी पुनवापर करावा. अनेक उद्योगसमूह अशा योजनर आखून त्या पाण्याचा वारवार उपयोग करतात व गरजेएवढेच पाणी विकत घेतात.परिणामी त्यांची निर्मिती खर्च कमी होतो. घरगुती पाण्याच्या वापरासाठीचे दर हे औद्योगिक क्षेत्रासाठी असलेल्या पाण्याच्या दरापेक्षा खूपच कमी असतात. सांडपाण्यावर देखील अशीच प्रक्रिया करुन मगच ते नद्यांमध्ये सोडले जाते अशा पिण्यायोग्य नसलेल्या पाण्याचा वापर शेतीकामासाठी केला जातो.

जमिनीमध्ये पाण्याची साठवणूक करण्यासाठी व पातळी वाढवण्याकरता वाहून जाणारे पावसाचे पाणी विविध पदधतींनी जमिनीमध्ये साठविणे महत्त्वाचे आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या चळवळींचा विचार केला तर चिपको आंदोलन डोळ्यासमोर येते. राजस्थानातील बिश्नोई जातीने आपली खेजडीची वने वाचवण्यासाठी सर्वप्रथम हे आंदोलन् केले. झाड तोडण्यास रोखण्यासाठी त्याला मिठी मारुन बसणे हे सोपे सूत्र यामध्ये वापरले गेले याच सूत्राचा उपयोग 1970च्या दशकात स्थानिक समुदायांनी हिमालयातील जंगले वाचविण्यासाठी केला.

तेथील जंगले ठेकेदारांना भाडे करारांनी दिल्याने तुटत होती. पूर व कडे कोसळण्याचे प्रमाण वाढत होते हे थांबवण्यासाठी जंगल वाचणे गरजेचे आहे हे लोकांनी ओळखले त्यामुळे मजूर झाडे तोडायला आले की ते झाडांना मिठी मारुन बसत. यामुळे बराच संघर्षही झाला; पण शेवटी सरकारला भाडेकरार रदद करावे लागले.फक्त आंदोलन करुन लोक थांबले नाहीत ही चळवळ जिवंत राहण्यासाठी स्थानिक रोजगार निर्माण केला. जंगलावर आधारित स्थानिक उद्योग उभारताना जंगलाची अमर्याद तोड किंवा वापर होणार नाही हे लक्षात घेतले गेले.याबरोबर वनीकरण,स्थानिक वीजनिर्मिती,स्वयंरोजगारावर भर देऊन संवर्धनाचे कार्य सुरुच राहिले.

चिपको आंदोलन भारतभरातील विविध चळवळीचे प्रेरणास्त्रोत बनले. अनेक चळवळी उभ्या राहिल्या. सह्याद्री बचाव मोहीम,नर्मदा बचाव आंदोलन,भारत जोडो आंदोलन इत्यादी या चळवळींनीच पर्यावरण संवर्धनाच्या कार्याला बळकट केले आहे.

पर्यावरणाचा प्रश्न आपल्यासमोर 'आ' वासून उभा असताना पर्यावरण संवर्धन ही एक काळाची गरज बनली आहे. म्हणून मानवाने सतत पर्यावरण संवधर्नाचा प्रयत्न करत जगत राहिले पाहिजे.

वीजनिर्मिती, खनिजोत्पादन आदी अनेक कारणांमुळे भारतातील वनसंपदेचा -हास झाला आहे. वाढत्या लोक संख्येच्या वाढीव गरजा,अतिजलद औद्योगिकरण व धरणांच्या निर्मितीमुळे धरणक्षेत्राखाली तसेच सिंचनक्षेत्राखाली जमीन आल्याने तेथील वनसंपदेचा -हास ही वनांच्या -हासांची महत्त्वाची कारणे आहेत.

वनसंवर्धनाचे काम खरेतर प्राचीन काळापासुन होत आहे. वनसंवर्धनाची सुरुवात जेव्हा आदिम शिकारी व भटक्या जमातींनी देवरायांची परंपरा सुरु केली तेव्हाच आली. सम्राट अशोकापासून ते छत्रपती शिवाजीमहाराजापर्यंत अनेक राजे महाराजांनी वनसंवर्धनाच्या कामात हातभार लावला अलीकडील काळातील कित्येक राजांनी खास शिकारवने राखली होती. ब्रिटिश काळात जंगलाची मालकी सरकारी झाली व वनांच्या व्यवस्थापनाकरिता व वापराकरिता स्वतंत्र वनखाते निर्माण करण्यात आले.

वनसंरक्षणासाठी स्थानिक जनतेचा सहवास असणे आवश्यक आहे हे जाणवल्याने तसेच वनसंरक्षणासाठी व व्यवस्थापनासाठी फक्त सरकारी प्रयत्न अपुरे असल्याचे भारत सरकारला 1980 च्या दशकाच्या सुरुवातीला जाणवले. त्यामुळे भारत सरकारने संयुक्त वन व्यवस्थापनाची सुरुवात केली. पाणलोट क्षेत्र विकास व सामाजिक वनीकरणासारख्या वनसंरक्षणावर जोर दिला जातो.

तेंदूची पाने, औषधी वनस्पती, आवळा, रिठयासारखी फळे, मोहाची फुले आदी कित्येक लघुवन उत्पादने वनातून गोळा केली जातात. ह्या उत्पादनांचे सुयोग्य नियोजन हासुध्दा वनसंवर्धनातील महत्त्वाचा टप्पा आहे. काही वनस्पतींच्या वापरावर निर्बंध आणणे, हंगामात विशिष्ट कालावधीनंतरच उत्पादन घेणे आदी नियमांमुळेही वनसंवर्धनास मदत होते.

वनसंवर्धनाची जबाबदारी भारत सरकारने पर्यावरण व वन मंत्रालयावर सोपविलेली आहे. तसेच प्रत्येक राज्यात एक स्वतंत्र वनखाते असून त्याचे नियंत्रण पर्यावरण व वन मंत्रालयाकडेच असते. (1980)चा कायदा ह्या दोन महत्त्वाच्या कायद्याअंतर्गत वनसंरक्षणविषयक अनेक तरतुदी आहेत.

मानवी कृत्यांमुळे मातीची धूप होण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. जंगलतोड झाल्यामुळे उघडी पडलेली माती वाहत्या पाण्यामुळे वाहून नेली जाते. जमिनीवरचे जंगलाचे अथवा गवताळ कुरणांचे आच्छादन काढले गेले की मातीची सुपीकता कमी होते. अती सिंचनामुळे पाणी जमिनीत तुंबते ज्या प्रदेशात शेतीसाठी मूळ नैसर्गिक वनस्पतीचे उच्चाटन केले जाते त्या प्रदेशात सिंचनाच्या पाण्याचे जलद गतीने बाष्पीभवन झाल्यामुळे जमिनीतील क्षारांचे प्रमाण वाढू शकते. वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्य पुरवठयाच्या वाढत्या मागण्यांमुळे जमिनीचा सतत वापर होतो. त्यामुळे,तसेच रासायनिक खताच्या अतिवापरामुळे व अयोग्य पीकपालट पदधतींमुळे मातीचा दर्जा घसरु शकतो.

समोच्च रेषेवर सलगपणे चर खणून त्या जोडीला झाडे व गवताची लागवड करणे हा उजाड डोंगराळ भागात मातीचे क्षपण थांबविण्यासाठी एक प्रभावी उपाय आहे. ओहोळांना लहान दगडधोंडयांचे बंधारे घातल्याने माती वाहून जाण्याला अडथळा येतो व वक्षलागवडीमुळे उतारावरुन वाहणारे पाणी व जोराचे वारे यांमुळे होणारी जमिनीची धूप रोखली जाते.

शेतातील माती धुपून जाऊ नये म्हणून शेतांभोवताली बांध बांधले जातात. उतार तयार करुन जादा झालेले पाणी बाहेर सोडले जाते. मातीची प्रत कमी होऊ नये म्हणून वेगवेगळया पिकांची योजना केली जाते. उदाः- नत्राचे प्रमाण कायम राखण्यासाठी दोन मुख्य पिकांमध्ये शेंगवर्गीय पीक घेतले जाते. अलीकडच्या काळात खतांचा व जतुनाशकांचा बेसुमार वापर हा जमिनीची कस बिघडण्याचे

प्रमुख कारण आहे. रासायनिक खंतांचा बेसुमार वापर टाळून सेंद्रीय द्रव्यांचा पोषक पुरवठा वाढविणे ही जमिनीची कस राखण्याची प्रमुख पायरी आहे.

पाणी व जमीन यांच्या समस्या एकमेकांशी संबंधित असल्याचे अनेकदा दिसून येते. पाण्याच्या अतिवापराने व अयोग्य पदधतीने केलेल्या शेतीमुळे जमिनीची होणारी झीज यामुळे आजुबाजूच्या पाणी साठयांतील गाळाचे प्रमाण वाढते म्हणून आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी पाणी व मृदा यांच्या संवर्धनाचा एकत्रित विचार झाला पाहिजे. पाणलोट क्षेत्र विकास जल व मृदसंधारणाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त पदधती आहे.

नद्यांमध्ये किंवा प्रवाहांमध्ये पाणी जिथून गोळा होते ती जागा म्हणजे पाणलोट क्षेत्र असे वर्णन करता येईल. या प्रदेशात कोठेही पडणारे पावसाचे पाणी त्या ठिकाणी त्या ठरावीक नाले वा नद्यांतूनच वाहू शकते या संपुर्ण क्षेत्राचा पाणी व मृदा संवर्धनासाठी एकत्रित विचार करुन योजना तयार केली जाते.

जल व मृदा यांच्या रक्षणात वनांचा फार मोठा वाटा आहे. वनांमुळे वारा व पाऊस यांपासून जमिनीचे रक्षण होऊन तिची धूप होण्यास प्रतिबंध होतो. झाडांमुळे पडणा-या पावसाच्या थेबांचे हळूहळू वितरण होऊन फांद्या व खोडांवरुन पाणी हळूहळू निथळत येते. झाडे व इतर वनस्पतींची मुळे माती धरुन धरुन ठेवतात. त्यामुळे ओढे व नद्यांमध्ये गाळ न साचल्यामुळे पूर येत नाही.

झाडांमुळे पाणी साठविण्याच्या जमिनीच्या क्षमवेत वाढ होते. झांडांची पाने,फांद्या,खोड,मुळे व जमिनीचा पृष्ठभाग यात पाणी साठून राहते. वने,नद्या व नाल्यांमधले प्रवाह रोखून अतिवृष्टी अथवा दुष्काळी स्थितीपासून बचाव करतात.

वनांच्या आधारावर केवळ वन्यजीवच नव्हे तर खेडी व शहरेही उभी असतात. इमारती लाकडापासून ते फळांपर्यंत,मानवापासून ते वन्यजीवापर्यंत प्रत्येकाच्या गरजा वने पुरवितात. जमीन व पाण्याच्या संधारणात वनांचा फार मोठा वाटा आहे. तसेच निसर्गातील कार्बन डायऑक्साईड, ऑक्सिजन व जलचक्रात वने महत्त्वाची भूमिका बजावतात.

इमारती लाकडासाठी होणारी बेसुमार वृक्षतोड, लाकूड व इतर वन नैसर्गिक साधनसंपत्तीसाठी होणारी वनांची तोड,मूलभूत सुविधा प्राप्त करणे,

स्थानिक पर्यावरणास धोका न पोहोचवता पाणी साठविण्याची उपाययोजना केल्याने भूजल पातळीत वाढ होऊन त्याची उपलब्धता कायम राहील.

भारतातील विविध भागांतील पाण्याचे दुर्भिक्ष्य अनुभवणा-या जातीजमातींनी काही तंत्रे शोधून काढली आहेत. अरुंद नाल्यांवरती छोटे छोटे बंधारे बांधून पाणी साठे वाढविले आहेत. उदाः- राजस्थानीतील जोहड पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्यासाठी इतर मार्गांचाही अवलंब केला आहे. काही समुदाय घरांच्या छपरांवरुन वाहून जाणारे पाणी जमा करुन टाक्यांत साठवितात व पाणी टंचाईवर मात करतात . दक्षिण भारतात व विदर्भात सिंचनासाठी तळी बांधण्याचे तंत्रज्ञान विकसित झाले आहे. उतारावरुन वाहणारे पाणी मातीच्या बंध-यांनी अडवून जमिजीवरील उतार व उंचवटे यांचा फायदा घेत पाणी जिरवतात. या पारंपरिक पद्धती स्थानिक पर्जन्यमानाचा विचार करुन शेतीकरिता पाणी पुरविण्यासाठी उत्कृष्ट आहेत.

चेन्नई,बंगलोर,दिल्ली येथे मोठया प्रमाणावर व काही प्रमाणात मुंबईत छपरांवर पडणारे पावसाचे पाणी अडवून ते साठविणे हे त्या राज्यांचे धोरण आहे.

ज्या ठिकाणी जमिनीतील पाण्याची पातळी कमी आहे किंवा पाण्याचे स्त्रोत कमी आहेत अथवा लुप्त झाले आहेत त्या ठिकाणी पावसाचे पाणी साठविणे हे आदर्श उपाय आहे.

घरांच्या छपरांवरील पावसाचे पाणी नाल्यातून वाहून जाण्याऐवजी त्याचा टाक्यांमध्ये साठा करुन ठेवला जातो.नंतर रिचार्ज पिटच्या साहाय्याने पाणी जमिनीत जिरवले जाते. ह्यामुळे भूजलाच्या पातळीत व दर्जात व होते. अशा त-हेने जास्तीचे पाणी अडवून ठेवल्यामु शहरातील पुराचे प्रमाण ब-याच प्रमाणात कमी होते.

मृदा वा माती हा पर्यावरणाचा आणखी एक महत्त्वाचा घट आहे. जंगले व पिकांची प्रत ही मोठया प्रमाणात मातीच्य कसदारपणावर अवलंबून असते. मातीची धूप वेगवेगळ्य कारणांनी घडून येते. मातीची प्रतही वेगवेगळया कारणां खालावते. मातीची धूप होण्याची क्रिया,वारा वाह पाणी,लाटा इ. कारणामुळे नैसर्गिक झालेली तळी आणि जंग सजीवविरहित म्हणजेच मृत होतात. युरोप,पूर्व अमेरि कॅनडा हा परिसर मुख्यतः आम्ल पर्जन्याने ग्रस्त झाले आढळतो हे आम्लधर्मी पाणी जेव्हा जमिनीवरुन आ जमिनीतून वाहते,तेव्हा नाना प्रकारच्या वनस्पती व प्राण्यांव त्याचे दुष्परिणाम घडतात.

कोणत्याही प्रकारच्या प्रदूषणाच्या दीर्घकाली संपर्काचा आरोग्यावर विपरित परिणाम होतो स्वयंपाकघरातील लाकूड व कोळशाच्या ज्वलनातून बाह पडणा-या कणांमुळे टी.बी.आणि इतर श्वसनरोंगाना ब पडलेल्या स्त्रिया व लहान मुले यांचे प्रमाणे आपल्या देशा फार जास्त आहे. शहरी भागात वाहनांच्या धुरांच्य प्रदूषणामुळे अधिकाधिक लोकांना श्वसनाच आजार,वेगवेगळया प्रकारच्या ॲलर्जी,डोळयांच जळजळ,मळमळ इ त्रास सहन करावे लागतात.

शेतीमधून वाहून आलेले पाणी,घरगु सांडपाणी,मैलापाणी,अपमार्जके व कारखान्यांतील उत्सर्जि यांमधील पोषक द्रव्यामुळे पाणीसाठयात शेवाळाची वा अमाप होते. या वाढीव वनस्पती पाण्यातील विरघळलेल ऑक्सिजन वापरुन टाकतात. परिणामी पाण्या विरघळलेला ऑक्सिजनची मागणी वाढते.त्यामुळे इत जलचर गुदमरुन जातात विनॉक्सीकारी जीवांचे प्रमा वाढते. हे मृत वनस्पती व प्राण्याचे विघटन करतात त्यातु मिथेन वायू बाहेर पडतो. त्याची विशिष्ट दुर्गंधी अश

पाणीसाठ्याजवळ गेल्यास येते. त्याशिवाय असे अतिजैविकरण झालेले पाणीसाठे डासांच्या वाढीसाठी उत्तम असल्यामुळे अशा ठिकाणी मलेरियाचा प्रादुर्भाव वाढण्याचा मोठाच धोका असतो. भारताचा खूप मोठा भाग ब-याच अंशी पाणीसाठा पावसावर अवलंबून आहे. पावसाचे पाणी सगळीकडे सारख्याच प्रमाणात मिळत नाही. काही ठिकाणी अतिवृष्टी होते तर काही ठिकाणी अवर्षणाची स्थिती असते. पावसाळी ऋतूंत अंतर्गत चढउतारही आहेत. काही मान्सून महिन्यात जास्त पाऊस,तर काही महिन्यांत कमी पाऊस पडतो.

पाणी सोडून नद्या खराब करतो संपूर्ण देशावर आपण पाणीसंकट आणत आहोत यातून वाचायचं तर पुन्हा एक आमूलाग्र वैचारिक बदल-पैराडाइम शिफ्ट -करावा लागणार शहरातील पाणीवापर आणि सांडपाणी याबद्दल विचार करावा लागणार आहे. पाणी आणा, साठवा,पंपाने उचला,पाइपातून खेळवा, त्यावर प्रक्रिया करा आणि वापरा मग पुन्हा तेच गटारात सोडा,पंपाने खेचा,प्रक्रिया करा आणि नदीत अधिकाधिक दूरवर सोडा या प्रारुपावर आपले काम चालते. कुणी म्हणेल यात चूक काय आहे? त्यात चूक काही नाही. त्यातील तर्क आणि विज्ञान निर्दोष आहे. सगळ्या प्रगत जगात हेच चालू आहे.मग आपण तरी का मागे राहावे? पुन्हा वस्तुस्थिती अशी आहे की,प्रारुप प्रचंड भांडवली गुंतवणुकीचे आहे. आपल्या शहरांमध्ये त्यामुळे दुफळी पडते गरीब वेगळे आणि श्रींमत वेगळे आपल्या शहरांमधील आणि संपूर्ण देशातील गरीब जनतेच्या प्रश्नांची जाण वाढणं महत्त्वाचं आहे.

आज भारतातील नद्यांमध्ये काहीही सामावून घेण्याची ताकद उरलेली नाही त्यांना जलस्त्रोत म्हणताही येणार नाही अशी स्थिती आहे. कुठेतरी कोणतं तरी शहर नदीचं पाणी खेचतच असतं आणि शहर त्याच्या स्वभावाप्रमाणे परत करताना फक्त सांडपाणीच टाकतं घाण जिरवायला पाणीच उरलेलं नाही, त्यामुळे काही टक्के शुद्धीकरण याचा अर्थ प्रदूषण असाच आहे. आवाक्याबाहेरची गुंतवणुकीची गरजू व्यवस्था मुळातच सर्वासाठी सुविधा पुरवण्यासाठी तयार केलेली नाही आणि ती पुनर्वापरासाठी नाही. या व्यवस्थेमागचा विचार असा की,फ्लश करा,प्रक्रिया करा आणि सोडून दया. प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या पुनर्वापराचा प्रस्तावच नाही ही पुन्हा भारतीय समाजवादाची कथा आहे.

वाहनाच्या धुराचा लोट किंवा दुर्गंधाचा भपकारा नाकात शिरल्यामुळे श्वास रोखून धरण्याचा आटोकाट प्रयत्न जेव्हा मानवी मनुष्य करतो आणि जेव्हा अशा प्रकारच्या प्रदूषणाला नेहमी ज्यांना तोंड दयावे लागते,त्यांचे काय होत असेल? प्रदूषणामुळे आपले आपले आरोग्य आणि आपला सभोवताल यावर विपरित परिणाम होतो. प्रदूषणाचे विविध परिणाम घडतात हे परिणाम वेगवेगळया घटकांवर अवलंबून असतात.

सोबतच हवेतील आर्द्रता टिकवण्याचे काम झाडे करतात अशा झाडांचे प्रमाण प्रदूषणाच्या तुलनेत फारच कमी आहे,दिवसेंदिवस ते कमी होत आहे. सूर्याच्या उष्णतेने पृथ्वी वरील पाण्याची वाफ होऊन त्याचे ढग बनतात व पाऊस पडतो आता मात्र वातावरणाचे तापमाण वाढले त्यामुळे हे अनिश्चित वेळेस जलचक्र सुरु राहणार,ज्यामुळे ही जीवसृष्टी हवालदिल होणारच,पर्यावरणाच्या समस्या नि त्यास कारणीभूत ठरणा-या बाबीसंबंधी जनजागृती हा तर एक सोपा उपाय आहेच विविध ठिकाणी पर्यावरणासंबंधी जागृती करण्यासाठी निरनिराळे दिन,सप्ताह,महिने वापरतात. कारण पर्यावरणाचा -हास हा जगभर कळीचा मुद्दा बनला आहे.

पर्यावरण विरुदध विकास हा भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये वादाचा आणि चर्चेचा एक महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या स्पर्धेचं आव्हान पेलण्यासाठी एकीकडे आर्थिक विकासाला चालना देणे महत्त्वाचे आहे. दुसरीकडे या विकासाच्या प्रक्रियेत,पर्यावरण आणि नैसर्गिक साधन संपत्ती तसेच त्यावर अवलंबून असलेल्या मोठ्या जनसमुदायाच्या ऱ्हासाची चिंता भेडसावत आहे. या दोन परस्पर विरुदध बाजूमध्ये समन्वय साधयचा कसा, हा प्रश्न विकसनशील जगासमोर उभा आहे.

भारतातील शहरांची अवस्था अतिशय वाईट बनत आहे. हवेत पाण्याचं, घाणीचं प्रदूषण वाढत आहे. औद्योगिकीरण, शहरीकरण, मोटारीकरण यामुळे प्रदूषणाची समस्या हाताबाहेर जाऊ पाहत आहे. नद्यांच प्रदूषण होत आहे आणि पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत प्रदूषित होत आहेत. सर्व थरांवर होणा-या या पर्यावरण प्रदूषणाशी झगडा केला नाही,तर मोठा गंभीर प्रश्न उभा राहणार आहे. पर्यावरणाचा प्रश्न निर्णायकपणे अर्थव्यवस्थेशी जोडला गेलेला आहे. ही बाब आपण स्वीकारली तर या प्रश्नावर मात करण्याचा मार्ग आपल्याला सापडू शकतो. निसर्ग आणि आर्थिक व्यवस्था एकमेकांत गुंतलेल्या आहेत,आपण जी अर्थव्यवस्था स्वीकारु त्याचं प्रतिबिंब पर्यावरणात उमटलेल असेल म्हणून पर्यावरण रक्षणार्थ काही करायचं असेल तर आर्थिक धोरणात लोकानुवर्ती बदल करावे लागतील .

पर्यावरणाचा जो प्रश्न आहे तो नेहमीच आर्थिक प्रश्नांशी गुंतलेला आहे. अशी कुठलीच अर्थव्यवस्था नाही जिचा पर्यावरणावर आघात होत नाही कारण पर्यावरणातूनच आपण अर्थव्यवस्था निर्माण करतो. त्याच मातीतून आपण धान्य पिकवतो. त्याच पाण्यातून, हवेतून,निसर्गाच्या हजारो गोष्टींमधून आपण आपले उद्योग उभे करतो. त्यातल्याच खनिजाचा वापर करुन आपण गाडया चालवतो,गाडया बनवतो म्हणजे निसर्ग आणि आर्थिक व्यवस्था या दोन गोष्टी इतक्या काही एकमेकींशी जोडलेल्या आहेत की, जी अर्थव्यवस्था असेल,त्याच पद्धतीने निसर्गावर आघात होईल.

1970 च्याच दशकात दोन जागी खुप चांगल्या कामांची सुरुवात झाली. एक राळेगण सिध्दीला अण्णा हजारे यांचे काम त्याबद्दल महाराष्ट्रात बोलण्याचं कारण नाही

त्याच सुमारास चंडीगडजवळच्या सुखमाजरी या गावत काम सुरु झालं.या छोट्या गावात एक मिश्राजी होते वैज्ञानिक म्हणून सरकारी नोकरीत होते. त्यांनी या गावात जे काम केलं त्यातून गावात आमूलाग्र परिवर्तन झाल. वीस वर्षानंतर त्या गावात आता उत्तम शेती होते ज्या गावाला अन्नधान्य बाहेरुन आणावं लागत होतं ते गाव आता धान्याची निर्यात करु लागलंय शिवाय तेथे लाखो रुपयांचा दुधाचा धंदा उभा राहिलाय हे सगळं कसं झाल? हा भाग खूप डोंगराळ आहे. शिवालीवच्या पर्वतराजीत हे गाव वसलंय. आपल्या देशातल्या मान्सुनचं पाणी त्यांच्या डोक्यावरुन कोसळतं आणि टनावारी माती वाहून जाते.

मिश्राजींनी तिथे लोकांना एकत्र आणायला सुरुवात केली, बाबानो, माती बघा कशी वाहून जाते. लोक बघतच होते हळूहळू आपली शेतजमीनही कशी ढासळतेय ते पण दैवाला दोष देत गप्प होते. कोणीच काय होतंय त्याचा शोध घेतला नाही. मिश्राजींनी मात्र त्यावर उपाय शोधला सगळयात पहिली गोष्ट मिश्रांजींनी केली की, ज्या पाणलोट क्षेत्रातून पाणी जातंय,त्यावर त्यांनी छोटे छोटे बंधारे घालायला प्रयत्न केला. छोट्या छोटया बांधाची भिंत उभी राहिली.

**- वीना पी. कुळकर्णी**
बी.ए. प्रथम वर्ष
शंब्दांकन गणेशोत्सव २०१३

## MY JOURNEY OF "AVISHKAR"

AVISHKAR or Innovation is something which makes us think out of the purview of traditional thinking and make a change. Avishkar - a Research Convention has given me the platform to think and innovate. The frontiers of education are changing every day. We are moving from the knowledge society to a society of innovation and thus research becomes one of the most important components of higher education. Today, one of the indices for the measurement of the potential of education is its research activity.

I was introduced to Avishkar a year back, where I was selected in top five category but unfortunately I could not win it. The reason behind it was I somewhere lacked in being innovative. So this time when preparing for the competition, we primarily focused in innovation. This time I prepared in team though eventually I alone went for the presentation.

The topic for my research was Equal Water Distribution- A Legal Solution to it in the form of JALPAL. This issue came to mind, when we realized that water is life, it is a right but still why is there an inequality to its distribution??? In India there is no formal basis to determine water allocation between different segments of a river bas in the Constitutional Directives in respect inter-state or intra-state rivers or th Central or State legislations. The study about unequal distribution of water in inte state and intra-state river basin, failure the existing legal framework and it implementation in regard to water, and thu a solution in the form of JALPAL, a nationa authority, with the objective of allocation water in an equitable manner.

It all began with the study unequal distribution of water in Godava River in the Jayakwadi Dam to Marathwada region. This was just one issue, many such national conflicts existed in distribution of water in between states. Laws existed for it, but they were no strong implementation to it. It was a mere toothless tiger. Thus, the need for a National Regulatory Authority for this equitable, judicious and sustainable allocation of water, which is named Jalpal.

Jalpal as name suggests is caretaker of water. It is to curb this corruption of water.

This innovation was highly welcomed at Avishkar and the fruit was given in the form of first prize to this topic in the Under-Graduate category in Law, Commerce and Management stream among top 30 projects from all over

Maharashtra. And the cherry on the cake is that it was even awarded a fellowship of Rs. 30,000 to continue the research.

Even though I won, but it was not possible without few people. Firstly my teammates Vaibhav Kulkarni and Prasad Jarare, my guides Dr. Aparna Kotapalle and Patil Maam, my college and university, and all those who directly or indirectly helped me in some or the other way. Avishkar has helped me to develop skill to review new dimensions of explored areas of knowledge as well as the unexplored areas of enquiry. Do participate next year in Avishkar and create your own journey on the unexplored path. ALL THE BEST!!

**- Ms. Neha Bhimsen Kamble**

(NLC- IV)

Manikchand Pahade Law College

## "FRIENDSHIP"

Friendship is a large ship is which the friends sail together and face all the problems together. Friendship is like a blow of wind which spreads the happiness among all the persons who better understand each other are called friends the only one relation, which noon is bounded by birth, but we ourselves select our friend. The importance of a friendship changes in various ages and various walks of life. Its means changes too. In different ages we have seen various examples of friendship. In modern age, friendship is just a fun. One friend makes a friend such that in need he should give him money. He should also give him treat excasionally. But this cannot be said a real friendship. A real Friendship is the one in which one friend should sacrifice for other while other should be ready to surrender all of his need for his friend.

In the old ethics, like 'Mahabharata' we also see such an examples of good and real friendship. Suchas 'Duryodhan and Karna' were the friends when karna was not condition to face Arjun as he was belonging to lower caste. Duryodhan make him a king of one of his ferritory andhe then fall of Arjun. Thereafter karna thought for Duryodhan until his last breathe in the war of Mahabharat. The another example in a same story was lord krishna & Sudama. Krishna was rich & Sudama was poor but their friendship was superb example.

The difference between a friend and a real friend can be noticed by their words because a friend says, "I am with you in all of your troubles" But a real friend says, "When I am with you, you would not be in any trouble.

**- Hemraj K. Kaldiya**

## "A piece of paper...!!!"

Being a part of Central Youth Festival, Indradhanushya and then west zonal was really amazing. these youth festivals thought me many things. It taught me how to swallow defeat and perform well for the next time. Here I learnt how to manage time and perform good or best during that particular moment.

Pasting pieces of coloured magazine papers according to ones own creations and imaginations and that too with different-different shades of magazine pages is interesting. As I am a student of Fine Art I really enjoyed playing with it.

This college teaches how a small piece of paper can change a whole creation. with that small piece of paper a whole work of art can be named as good, great or less good etc. so how important that small piece of paper is or a small piece of paper can make such a big difference. At the same time in our life one should take a lesson from that small piece of paper. its not important that how small that piece of paper is but one think that such a small piece of paper can play a very important role in that whole creation.

In the same way I have lernts to look at life in a positive way from collage. One should not think that what I alone can do and then become sad Instead of becoming sad one should do ones own work sincerely and regularly without any kind of expectation then it really makes a big difference in you life.

In collage I stick different pieces of paper together one by one, it doesn't matter how. small or big those piece of paper are, and a wonderful work is created It becomes a lovely creations.

In the same way in our life it doesn't matter whether you are able to do or not. One should believe in ones own self and always keep on tying and practicing for your betterment. That little struggle or practice everyday can make you strong enough powerful and confident.

Well during all these youth festivals I really practiced sincerely and therefore I believe that Central Youth Festival 2013-14 and again first prize in collage activity for Indradhanushya that is state level inter University youth festival 2013-14 as such. Further after performing well in these again I got chance to perform at west zonal collage. but here I dit not get any pri but a priceless lesson I have learnt, tha how one should lok back and think wh you lacked behind and where you c correct your self and do better in it aga by more practice.

After winning and getting happ very easy but after losing and becomi happy is not that easy. It require stro gutts. So here I learnt this quality whic think is necessary in our life.

Losing plays a very important ro inorder to make you more strong an egoless. But at the same time it does no mean taht one should keep on losing. Th either is not good as such. It means on should keep on trying no matter if you los or win.

Winning and losing are two side or on coin but keep on trying is the thir side of the coin in which I believe strongly.

In all these youth festivals I hav enjoyed a lot, many of them became new friends of mine and I met new people and places as well. A part from all these I now have wonderful and unforgettabl memories of it.

Ashok Bandgar sir who was ou team leader during all these youth festiva

told me, "always keep on practicing and practice makes man perfect bacchu" so this is the key point behind my all achievements in various youth festivals. Mr. Ambekar sir Head of Fine Art Department always helped me to build up my confidence level high and my best friend Daniyal Gavit and my only classmate and my department friends always encouraged me during all these youth festivals as I never wanted to be a part of all these youth festivals as I just wanted to focus only on my studies because I am so far from my hom Goa only for my post graduation that is master of Fine Art in Portraitive. Nevertheless, whatever happens, it happens for our wellbeing only. As I am an open minded girl I like to fce challanges and I am ever ready to do hardwork or struggle for interesting things.

**- Miss. Bhagyajyoti Arjun Naik**
**MFA in portrature (painting)**
**First Year (2013-14)**
**Department of Fine Arts.**

## "महोत्सवमय जीवन"

भारतीय संस्कृती ही सर्वच बाबतीत सर्वश्रेष्ठ संस्कृती मानली जाते. या संस्कृतीमध्ये मातीच्या सुगंधापासून ते हृदयाच्या स्पंदनापर्यंत सर्वच बाबींचा विचार भावनिक स्तरावर केला जातो. कदाचित यामुळेच या देशाला धर्मनिरपेक्ष देश म्हणून ख्याती प्राप्त झालेली दिसून येते. कारण येथे विविध जाती धर्माबरोबरच त्या-त्या जातीचे विविध गुणधर्म, सण, उत्सव हे सर्वांना आकृष्ठ करतात. येथे ऋतुचक्राबरोबरच सर्व कलागुणांना वाव मिळत जाताना दिसून येते. प्रत्येक जातीधर्म ऋतुचक्राच्या फेऱ्यामध्ये आपापले सण, उत्सवाचे आयोजन करुन सर्वांना हर्षोल्लासाचे क्षण प्रदान करताना दिसून येतात.

लोकमान्य टिळकांनी काही महोत्सवांची, उत्सवांची निर्मिती जाणून बुजून केल्याचे सर्वांना विदीत आहेच

मुंबई विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर शिक्षणाचा प्रचार प्रसार होवून समाजात नवनवीन गोष्टींना चालना मिळू लागली 'शिका आणि संघटीत व्हा' चा नारा सर्वदूर पसरला. स्वातंत्र्याची बीजे पेरली गेली.

हे सर्व शिक्षणाच्या जोरावरच सहज शक्य झाले. आणि अशा शिक्षितांच्या समाजात विविध कलागुणांचा विकास व्हावा या हेतूने भारत सरकारने काही धोरणे आखली. सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या मदतीने भारतातील सर्वच भागात कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न सुरु झाले.

शाळा महाविद्यालयाच्या स्तरांवर मुलांच्या शारीरिक खेळांवर भर देण्यात येऊन त्यांना सुदृढ शरीर यष्टीचे नागरिक बनविण्याची पराकाष्ठा येथे दिसून येते आणि बाल्यावस्थेपासून थोडेसे वरती मान करु लागले की बौध्दिक विकासासाठीचे प्रयोजन करण्यात येऊ लागते. आजच्या काळात तर अगदी बालपणापासूनच सर्व प्रकारचे प्रयत्न पालक आणि पाल्य अशा दोन्ही स्तरावर होत असताना दिसून येत आहे.

महाविद्यालयामध्ये प्रवेशल्यानंतर युवकांना "युवक महोत्सवाची" ओळख होते.

"युवक महोत्सव" म्हणजे युवकांनी युवकांसाठी युवकांच्या कलागुणांचा विकास करण्यासाठी केलेला जल्लोषमय आविष्कार होय.

युवक महोत्सव म्हणजे
तरुणाची लाट,
प्रगल्भतेची वाट,
सकसतेची पहाट आणि
भीतीचा नायनाट
युवक महोत्सव म्हणजे
रंगांची उधळण, तुफानाची सांत्वण होय.

युवक महोत्सव म्हणजे सुप्तगुणांना वाव देण्यासाठीचे व्यासपीठ, आणि अशा व्यासपीठावर तरुणांचे साम्राज्य पसरलेले दिसून येते.

आज स्पर्धेचे जग आहे. इथे प्रत्येकाशी स्पर्धा आहे. या स्पर्धेच्या जगात स्वतःचे अस्तित्व सिद्ध करायचे असेल तर केवळ एका अंगाने तरबेज असून चालणार नाही, तर अष्टपैलू व्यक्तिमत्त्व अवगत असणे अत्यंत महत्त्वाचे असते. म्हणून महाविद्यालये, विद्यापीठ वेगवेगळ्या प्रकारच्या महोत्सवांचे आयोजन करताना दिसून येतात.

साहित्याच्या क्षेत्रात प्रगती झाली तरच समाजाची प्रगती होऊ शकते. आणि साहित्याचे जेवढेही अंग-उपांग आहेत त्या सर्वाचा समावेश युवक महोत्सवात होताना दिसून येतो. कवितेतील शब्द युवकांच्या मनाची स्पंदने मांडतात. नव्या दिशा दर्शवण्याचे प्रभावीपणे कार्य

कवितेच्या माध्यमातून होताना दिसून येते तर स्वतःमध्ये दडलेला नट व त्याची सात्त्विकभाव युवकांना नाटकामधून मिळतो. संगीताच्या सुरांनी जीवनाच्या गर्भीत अर्थाला समोर युवकांसमोर मांडून धमण्यातून वाहणाऱ्या रक्ताला जराशी उसंत मिळते तर नृत्याच्या चारी, मंडलाने युवक प्रभावीत होवून अकांडतांडव करुन जीवनाच्या भीतीमय भस्मासुराला व आयुष्यातील निराशेला काही काळ का होईना पण दूर लाटतो. यात तो कधी गोंधळी बनून पूजेचे प्रतिष्ठाण मांडतो तर कधी वासूदेव बनून समाजाला धान मागतो. कधी पोवाड्यातून विरांचे गुणगान करतो. तर कधी वादविवाद करुन शंकेचे निरसन करतो. महोत्सवात युवकाचे रुप अनेक पण त्यातील युवक हा एकच असतो.

अशा व्यासपीठावर युवक स्वतःला सिद्ध करुन स्पर्धकावर मात करतो आणि बक्षिसाच्या रुपाने आपल्या महाविद्यालयाची मान ताठ करतो...

ज्याला स्वतःची ऊर्मी दाखवायचे असेल अशा सर्वांनी युवक महोत्सवात सहभाग घेणे महत्त्वाचे आहे. कारण या व्यासपीठावर जो टिकला तो जीवनाच्या पटलावर नक्की टिकू शकेल. कारण युवक महोत्सव किती जगायचे हे शिकवत नाही तर कसे जगावे हे मात्र निश्चित शिकवतो.

युवक महोत्सवातून खूप काही घेण्यासारखं असतं. कधीही न थांबण्याची कला येथे अवगत होते. जीवनात समाधानी बनून श्वास घेतला की प्रगती खुंटते, सदैव अस्वस्थ कसे राहावे हे या युवक महोत्सवामधून शिकायला मिळते. संघटनाची कला यातून अवगत होते. जिंकण्यासाठी संघर्षाच्या गळयात माळ घालण्याची कला या युवक महोत्सवामधून शिकता येते. एकाग्रता शक्ती, निरीक्षण शक्ती, कल्पनाशक्ती या अशा अतिशय महत्त्वाच्या शक्तींना या युवक महोत्सवात वाव मिळतो. आणि जेव्हा या तिन्ही शक्तींचा विकास होतो तेव्हाच विद्यार्थी हा स्वयंपूर्ण आणि सक्षम बनू शकतो. या तिन्ही शक्तींसोबतच त्याची ओळख सामाजिक, राजकीय, आर्थिक, बौद्धिक, वैचारिक, मानसिक अशा सर्व परिस्थितींशी परिचित होवून युवकामध्ये वेळ पाळण्याची, प्रामाणिकपणाची आणि काम करण्याची तयारी अशा सर्व गुण संपन्नतेच्या दृष्टीने वाटचाल सुरु होते.

मी गेल्या सतरा वर्षांपासून युवक महोत्सवात सहभागी आहे. पूर्वी विद्यार्थी म्हणून तर आता प्राध्यापक म्हणून मी यातून घडलो याचा खूप अभिमान वाटतो मला. आणि शेवटचा श्वास असेपर्यंत यातून सेवा करण्याची शक्ती आणि संधी मिळावी हीच प्रार्थना करतो.

**- प्रा.डॉ.अशोक गुराप्पा बंडगर**

**नाट्यशास्त्र विभाग**



## "वसतिगृह नव्हे दुसरे घरच"

"(शिक्षणाचे महत्त्व ओळखुन उच्च शिक्षण घेण्यास मराठवाडा, विदर्भ आणि खान्देश येथून डॉ.बाबासा आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मुली येतात. आपले घर आपली प्रियजन सोडून स्वप्नांचा वेध घेण्यास सावित्रीच्या लेकी एकट्याच येथे राहतात. त्यांची स्व सत्यात उतरवण्याचे मानसिक बळ त्यांना मिळते ते, मातो जिजाऊ वसतिगृहात. या वसतिगृहाबद्दल सांगताहेत याच्य अधिक्षिका डॉ. भारती गवळी-रोकडे.")"

मराठवाडा म्हटले की, मागासलेपण असे एकूण चि आपल्यासमोर येते. पण मराठवाडा बदलतोय. मला अत्यं अभिमानाने सांगायचे आहे की, "माझ्या वसतिगृहात विद्यार्थीनींची संख्या प्रत्येक वर्षी वाढत आहे. ग्रामीण भागातील मुली उच्च शिक्षणात आता कुणाच्याही मागे नाहीत. आपले घर, आई-वडील, भाऊ-बहीण यांना सोडून औरंगाबादला डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात आपली स्वप्न सत्यात उतरवण्यास येत आहेत. मी ज्या वसतिगृहाची अधिक्षिका आहे यात प्रामुख्याने प्रथम वर्षांच्या मुलीच राहतात. बऱ्याच जणी पहिल्यांदाच घराच्या बाहेर राहत असल्याने त्यांना घराची अधिक ओढ असते. बऱ्याच जणी एकदमच औरंगाबाद सारख्या मोठ्या शहरात आणि विद्यापीठासारख्या विस्तीर्ण शैक्षणिक आवारात पहिल्यांदाच आलेल्या असतात. त्यामुळे त्या थोड्या बुजलेल्या असतात. त्यांच्या चेहऱ्याची कळी खुलवण्याचे कार्य मी आणि माझा संपूर्ण संघ सदैव करत असतो.

वसतिगृहात तशी पाहता १०० मुलींसाठीच व्यवस्था आहे; पण विद्यापीठ मागेल तिला वसतिगृह या प्रमाणे सर्वच विद्यार्थीनींच्या राहण्याचा प्रश्न सोडवते. यामध्ये या मुलींचे

## वसतिगृह संस्कार केंद्र

''डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत विद्यार्थीनींची एकूण चार वसतिगृहे आहेत. या वसतिगृहांत मराठवाड्यातील वेगवेगळया गावातून ग्रामीण भागातून विद्यार्थीनी शिक्षणासाठी येतात. या सर्व मुलींना प्राथमिक गरजेच्या शैक्षणिक, आरोग्यविषयक तसेच सांस्कृतिक सुविधा पुरवण्याचे काम विद्यापीठ प्रशासन करते. या मुलीचे वस्तीगृहांविषयी सांगत आहेत, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले / वसतिगृह आणि ''रिसर्च हॉस्टेल'' च्या अधिक्षिका सोनाली क्षीरसागर.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शिक्षणासाठी येणाऱ्या बाहेरगावच्या विद्यार्थीनींसाठी वसतिगृहे आहेत. यापैकी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले वसतिगृहे आणि संशोधक विद्यार्थीनींसाठी असलेल्या वसतिगहाची अधिक्षिका मी आहे. या दोन्ही वसतिगृहात सर्व विद्यार्थीनींना शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक तसेच क्रीडा यासंबंधातील सर्व सुविधा प्राप्त होतील याची काळजी मी घेते. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विद्यार्थीनी वसतिगृह हे ८ ऑगस्ट१९७४ मध्ये सुरु करण्यात आले. यामध्ये २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात१६३ विद्यार्थीनी राहतात. वसतिगृह क्र. ३ मध्ये एम.फील. आणि पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थीनी राहतात. या वसतिगृहाचे विस्तारीकरण या वर्षी करण्यात आले आहे.

वसतिगृहामध्ये सर्व प्राथमिक सुविधा विद्यार्थीनींना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. ज्यामध्ये प्रत्येक खोलीत टेबल व खुर्च्या, ट्युबलाईट पंखे तसेच स्वतंत्र पलंग व्यवस्था आहे. विद्यार्थीनींना थंड व शुद्ध पाण्यासाठी ॲक्वागार्ड आणि कुलरची सोय आहे. स्नानासाठी गरम पाण्याची सोय सौरऊर्जा आणि इलेक्ट्रीक गिझर यामार्फत केली आहे. वसतिगृहांमध्ये अग्निशमन सेवा सिलिंडरची सोय आहे.

एम.फील. आणि पीएच.डी.संशोधक विद्यार्थीनींसाठी असणाऱ्या वसतिगृहात इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. जेणेकरुन त्यांना विविध परीक्षांच्या पूर्वतयारी साठी सहाय्यता मिळेल. स्पर्धा परीक्षांच्या मार्गदर्शनासाठी तसेच वर्तमान स्थितीचे अद्ययावत ज्ञान मिळावे म्हणून वर्तमानपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच विद्यार्थीनींच्या मागणीनुसार विविध साप्ताहिके, मासिके आवर्जून मागवली जातात.

प्रत्येक वसतिगृहात दैनंदिन कार्यालयीन काम आणि स्वच्छता यासाठी महिलांची नेमणूक करण्यात आली आहे. वसतिगृहातील विद्यार्थीनी सुरक्षा व्यवस्थेसाठी प्रत्येक वसतिगृहास पहारेकरी आणि सुरक्षा कर्मचारी यांची नेमणूक केली आहे.

विद्यार्थीनी वसतिगृहापासुन हाकेच्या अंतरावर आरोग्य केंद्र, बँक ऑफ महाराष्ट्र तसेच परिसरातच पोस्ट ऑफिस सेवा उपलब्ध आहे. विद्यार्थी कल्याण विभागातर्फे ''हॉस्टेल डे'' चे आयोजन केले जाते. या हॉस्टेल डे निमित्त वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. या सर्व उपक्रमात विद्यार्थीनींना सहभागी होण्याची संधी असते. विद्यार्थीनीमध्ये असलेल्या अभ्यासाव्यतिरिक्त इतर गुणांना या माध्यमातून वाव मिळतो. जीवनात श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व शिकवले जाते ते ''कमवा आणि शिका'' या योजनेमधून. यामधून विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबनाचे धडेदेखील दिले जातात.

प्रत्येक विद्यार्थीनीला उच्च शिक्षण मिळायलाच हवे या उदात्त हेतूने प्रत्येक गरजू आणि होतकरु विद्यार्थीनीला वसतिगृह प्रवेश उपलब्ध करुन देणे हे विद्यापीठाचे ध्येय आहे. विद्यार्थीनींच्या मागण्यांनुसार त्यांना आवश्यक सुविधा पुरवण्यावर विद्यापीठ प्रशासनाचा भर असतो. शिक्षणाची गंगा सर्वत्र वाहावी याच उदात्त हेतूने अनेक शहरातल्या विद्यार्थीनींची सोय वसतिगृहात करण्यात येते.

आगामी काही वर्षात वसतिगृहांमध्ये अनेक सकारात्मक बदल घडवून आणण्याचा विद्यापीठ प्रशासनाचा प्रयत्न आहे. याच दृष्टीने पावले टाकण्यास आमही सुरुवातदेखील केली आहे. सर्व वसतिगृहांसाठी खानावळीची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विद्यापीठ प्रशासनाने ठरवुन दिलेल्या आकारणीनुसारच याचे दर आहेत. वसतिगृहात भोजन समिती बनवण्यात आली असून त्यांच्यामार्फत खानावळी संबंधातील निर्णय घेण्यात येतात. विद्यार्थीनींच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी सर्व वसतिगृहांसाठी एका विद्यार्थीनीची निवड लिगल ॲडव्हायझर म्हणून करण्यात येते.

विद्यार्थीनींच्या क्रीडागुणांसाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून विद्यापीठ प्रशासन विशेष प्रयत्न करते. नुकतेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने ज्युडो / कराटे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामधून मुलींना स्व-संरक्षणाचे धडे देण्यात आले. योगासने शिबिरे आयोजित करुन विद्यार्थीनींना योगासनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाते. याचबरोबर विद्यार्थीनींसाठी ऍरोबिक्स शिबिरदेखील घेतले गेले. प्रत्येक वसतिगृहात मुलींना सतत दिसेल अशा ठिकाणी...... लावले आहेत. जेणेकरुन अभ्यासाचा ताण हलका होऊ शकेल. विद्यार्थीनींसाठी संपूर्ण आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात येते. ज्यात दंतरोगतज्ञ, अस्थिरोगतज्ञ, नेत्ररोगतज्ञ आदी येऊन विद्यार्थीनींची तपासणी करतात. या तपासणीमध्ये हिमोग्लोबिन, वजन, उंची आदींची तपासणी होते. विद्यार्थीनींच्या सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीसाठी उपक्रम राबवण्यावर वसतिगृह प्रशासनाचा भर असतो.

विद्यार्थीनींच्या सामाजिक व शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाच्या दृष्टकोनातून अनेक उपक्रम व कृतियुक्त कार्यक्रम राबविले जातात.

**प्रा. सोनाली क्षीरसागर**
**अधिक्षिका**
**सावित्रीबाई फुले वसतिगृह**
**शब्दांकन - क्षितिजा हनुमंत भूमकर**

सुद्धा इतर मुलींना सामावून घेतानाचे योगदान मोठे आहे. आलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी एकमेकींना समजून घेताघेता कधी जिवलग मैत्रीणी होतात हे त्यांना सुद्धा कळत नाही. वसतिगृहाच्या सुरवातीच्या दिवसात आम्ही सर्व विद्यार्थीनींची ओळख करुन देतो आणि त्यासोबत आमचीही ओळख त्यांना करुन देतो. वसतिगृहात असलेल्या सोयी-सुविधा आणि त्याचा उपभोग घेताना घ्यावयाची काळजी याची सूचना पहिल्याच दिवशी सर्वांना देण्यात येते. यामुळे नंतर वर्षभर कोणासही शिस्तभंग झाला म्हणून ताकीद देण्याची वेळ येत नाही.

सर्वच वसतिगृहात असताना तशा पायाभूत सुविधा आम्ही विद्यार्थीनींसाठी पुरवल्या आहेत. प्रत्येक खोल्यांमध्ये खुर्च्या-टेबले, पलंग, कपाटे तसेच गरम पाण्यासाठी सोलार, वॉटर हिटर सुद्धा आहे. पिण्याच्या पाण्यासाठी ॲक्वागार्डसह वॉटर कुलरची व्यवस्था आहे. वसतिगृहाच्या मेसमध्ये सकस आहार देण्यावर आमचा भर असतो आणि विशेष बाब म्हणजे विद्यार्थीनींची ''किचन कमिटी'' यावर लक्ष ठेवून असते. महिन्यातून दोन वेळेस मेजवानीचा मेनू सुद्धा ही किचन कमिटीच सर्वानुमते ठरवत असते संपूर्ण वसतिगृहाच्या स्वच्छतेसाठी सुद्धा आम्ही अशीच स्वच्छता कमिटी बनवली आहे. प्रत्येक खोली आणि वसतिगृहातील व बाहेरील पार शेजारच्या स्वच्छतेवर यांची नजर असते.

वसतिगृहात सर्वसोयींनीयुक्त ग्रंथालय सुद्धा आहे तेथे रोजची मराठी-हिंदी-इंग्रजी वर्तमानपत्रे तसेच काही मासिके सुद्धा नियमित येतात आणि विद्यार्थीसुद्धा नियमित याचा उपयोग करताना दिसतात. या वर्षापासून आम्ही ''बुक रिव्ह्युव ''हा उपक्रम राबवणार आहोत. यानुसार विद्यार्थीनींना आपल्या अभ्यासक्रमा व्यतिरिक्त अवांतर वाचनात बहुपयोगी पुस्तकांचा खजिनाच उपलब्ध होणार आहे. प्रत्येकीने एक पुस्तक वाचून झाले की, त्यावर आपले मत इतर विद्यार्थीन समोर मांडायचे यामुळे विद्यार्थांना अभ्यासाशिवाय इतर विषयांची सुद्धा माहिती भेटेल आणि त्यांच्या ज्ञानात भर पडेल.

ज्ञानसाधना करताना मानसिक आणि शारीरिक स्वास्थ सुद्धा चांगले राहावे म्हणून वसतिगृहात योगा, एरोबिक्स, ज्युडोचेही प्रशिक्षण दिले जाते. सर्व विद्यार्थीनींची संपूर्ण वैद्यकीय तपासणी सुद्धा येथे केली जाते यात सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश असतो. विद्यार्थीनींची रक्त तपासणी करुन त्यातील एच बी, प्लेटलेटस अशा आवश्यक बाबींची माहिती घेतली जाते गरज भासल्यास त्यावर तात्काळ उपचार केले जातात. तसेच वैद्यकीय सल्ल्यानुसार मुलींच्या आहारात सकारात्मक सात्त्विक बदल केले जातात. वसतिगृहाच्या शेजारीच ''स्वास्थ्य केंद्र'' असल्याने इतर वेळीही काही स्वास्थ्यासंबंधी समस्या आली तर ती तात्काळ दूर केली जाते. फार गंभीर आजारपणात वसतिगृहाचे कर्मचारी विद्यार्थीनीसोबत शासकीय वैद्यकिय केंद्रात जाताना आणि त्यांची सुश्रूषा सुद्धा फार .... करतात.

रोज दिवसाची सुरुवात प्रेरणादायी विचाराने व्हावी म्हणून हॅप्पी थॉटस् अशी संकल्पना येथे आहे. यात महापुरुषांच्या विचारांची ओळख विद्यार्थीनीला करुन दिली जाते. तसेच आजच्या स्पर्धेच्या युगात कायदा, स्वसंरक्षण, महिला हक्क आणि अधिकार, स्पर्धा परीक्षा या विषयांवर मान्यवरांच्या व्याख्यानाचे आयोजनही नियमित होत असते. विद्यार्थीनींच्या इंग्लिश बोलण्याची गरज लक्षात घेऊन येथे स्पोकन इंग्लीशचे वर्ग सुद्धा घेतले जातात. या अशा सतत सुरु असणाऱ्या उपक्रमांमुळे विद्यार्थीनींचा आत्मविश्वास चांगलाच दुणावला आहे.

महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी इत्यादी विशेष कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थीनी स्वतः पुढाकार होवून करीत असतात. यात सूत्रसंचालन ते आभार प्रदर्शन या सर्व जबाबदाऱ्या त्या स्वतः पार पाडत असतात. युवक महोत्सव, हॉस्टेल डे यात विविध मनोरंजनात्मक कलाप्रकारांत त्यांचा सहभाग असतो. त्यांच्या सरावासाठी आम्ही जागेसह नामवंत शिक्षकांची सुद्धा नेमणूक करीत असतो. यामुळे आमच्या मुली सामाजिक-सांस्कृतिक-शारिरीक -मानसिक अशा कुठल्याच क्षेत्रात कमी पडत नाहीत यांचा सर्वांगीण विकास होत असल्याने त्या देदीप्यमान यश संपादन करतात.

विविध उपक्रम, दैनंदिन व्यवस्था, अभ्यास आणि मनोरंजन सुद्धा हे सर्व चालू असताना कधीही शिस्तभंग होत नाही ही मला अत्यंत अभिमानाची गोष्ट वाटते. तरीही काळजी म्हणून रोज संध्याकाळी आठ वाजता विद्यार्थीनींची उपस्थिती घेतली जाते. हे काम सुद्धा विद्यार्थीनीच शिस्तपालन समिती मार्फत करीत असतात. महिन्यात दोन वेळेस आम्ही बैठक घेऊन नकार आणि सुधारणा या संबंधी चर्चा होते. विद्यार्थीनी त्यांची मते ''सजेशन बॉक्स'' मध्ये पत्र टाकून सुद्धा मांडु शकतात.

भविष्यातील योजनेनुसार आम्ही वसतिगृहाची सर्व माहिती पोर्टलवर छायाचित्रासह देणार आहोत. नियम व अटी तसेच महत्त्वाच्या सूचना विद्यार्थीनींना यामार्फत प्रवेशाआधीच मिळतील. मोबाईल संदेशाचा सुद्धा प्रभावी वापर आम्ही करणार आहोत. या सर्वच गोष्टी करताना आम्हाला विद्यार्थी कल्याण विभागाच्या डॉ. चेतना सोनकांबळे यांचे विशेष मार्गदर्शन लाभते.

मराठवाड्यासह - विदर्भ - खान्देश तसेच विविध राज्यातून येणाऱ्या विविध घटकातील विद्यार्थीनी त्या वसतिगृहात प्रेमाने, आपुलकीने एकाच छताखाली राहत असतात. त्यांची सुख-दुःखे आम्ही वाटून घेतो त्यामुळे माझ्यासह या विद्यार्थीनीना हे वसतिगृह वाटत नसून दुसरे घरच वाटते.

**प्रा. डॉ. भारती गवळी.**
**अधिक्षिका माता जिजाऊ वसतिगृह**
**शब्दांकनः सुमेध राधाभागवत उघडे**

## "आविष्कार" च्या निमित्ताने

"विद्यार्थ्यांच्या संशोधक वृत्तीला संधी देण्यासाठी आविष्काराचे व्यासपीठ आहे. आविष्काराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी प्रयोगशीलता वाढावी तसेच त्यांच्यामध्ये असणाऱ्या वैज्ञानिक दृष्टिकोनास माध्यम मिळावे हेच "आविष्कार" चे मुख्य उद्दिष्ट आहे. या आविष्कार विषयी आणि एकूणच सध्याच्या विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाबद्दल सांगत आहेत पदार्थविज्ञान विषयाचे प्रा.डॉ.प्रकाश खिराडे."

भारतात अनेक मोठमोठे शास्त्रज्ञ होऊन गेले. आजही डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम, डॉ. विजय भटकर, डॉ.रघुनाथ माशेलकर आदी शास्त्रज्ञ अहोरात्र वैज्ञानिक प्रगतीसाठी काम करत आहेत; पण या पिढीनंतर आजची तरुण पिढी मात्र वैज्ञानिक गोष्टींबाबत निरुत्साही दिसून येते. मला असं आढळून येतं की, महाविद्यालयीन पातळीवर जी विज्ञान प्रदर्शनं भरवली जातात त्यात सहभागी होण्यास विद्यार्थी नसतात. बऱ्याचदा त्यांना प्रयोगासाठी लागणारे साहित्य उपलब्ध नसते. माझ्या मते, साहित्याची अनुपलब्धता ही दुय्यम गोष्ट आहे. मुळात त्याची ओढ ... असायला हवी.

आपल्या दैनंदिन गरजेच्या वस्तू जसे की, विद्युत उपकरणे, पाणी आणि इतर बऱ्याच गोष्टींमध्ये आपण सकारात्मक बदल घडवू शकतो. उदा. पूर्वीच्या अनेक विद्युत उपकरणांमुळे जास्त प्रमाणात विजेचा अपव्यय व्हायचा. पण आता सी.एफ.एल.बल्ब असो किंवा रेफ्रिजरेटर मध्ये वापरण्यात येणारी आधुनिक यंत्रे यामुळे विजेची बचत होते. ही सर्व साधने वैज्ञानिकांनी विशेष प्रयत्न करुन बनवली आहेत. हेच प्रयत्न करण्याचे गुण विद्यार्थ्यांच्या अंगी रुजवण्यासाठी आविष्कार हे एक उत्तम व्यासपीठ आहे.

"आविष्कार" मध्ये सहभागी होण्याने विचारशक्तीला चालना मिळते. रोजच्या जगण्यातल्या समस्या सहजरीत्या कशा सोडविता येतील? याचा विद्यार्थी विचार करु लागतात. स्पर्धेमध्ये बक्षिस मिळो अथवा न मिळो पण विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी "आविष्कार" सहाय्य करते. विद्यार्थी विज्ञान शाखेची निवड करतात मात्र त्यांचा भर हा लेखी परीक्षेवरच जास्त असतो. "आविष्कार" च्या निमित्ताने प्रात्याक्षिकावर विद्यार्थी भर देतात. फक्त विज्ञान शाखेच्याच नव्हे तर कला आणि वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनीसुद्धा वेगवेगळया समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

"आविष्कार" च्या निमित्ताने वैज्ञानिक शोध लावले जातात त्याचा फायदा स्वतःबरोबरच समाजालादेखील होईल. "आविष्कार" मुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे बघण्याची दृष्टी मिळते. विज्ञानातील प्राथमिक गोष्टी समजण्यासाठी अशा प्रकारच्या स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. महाविद्यालयांनी देखील केवळ लेखी परीक्षेवर भर देण्यापेक्षा प्रात्यक्षिकावर भर द्यायला हवा. एकूणच "आविष्कार" च्या निमित्ताने संशोधकवृत्ती वाढून याच विद्यार्थ्यांमधून भविष्यात जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक घडतील यात मला शंका वाटत नाही.

**प्रा.डॉ.प्रकाश खिराडे**
**पदार्थशास्त्र विभाग**

## अहवाल
### डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
### विद्यापीठ उद्यान

विद्यापीठात घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमानिमित्त शोभेच्या झाडांच्या कुंडया पुरविणे, 26 जानेवारी, 15 ऑगस्ट, विद्यापीठ वर्धापन दिन, मराठवाडा मुक्ती संग्राम दिन इत्यादी ध्वजवंदन कार्यक्रमासाठी उद्यानाची तयारी करणे, वृक्षरोपणा करिता विविध विभागांना रोपांचा पुरवठा करणे इत्यादी कामे विद्यापीठ उद्याना अंतर्गत केली जातात.

विद्यापीठ उद्याना अंतर्गत विद्यापीठातील एकूण 15 उद्यानांची देखभाल व सांभाळ करण्यात येतो. ती उद्याने पुढील प्रमाणे.

1. प्रशासकीय इमारत उद्यान 2. इतिहास वस्तु संग्राहालय उद्यान, 3. परीक्षा भवन उद्यान 4. नवीन नाट्यगृह उद्यान 4. व्ह्युम्यानिटीज इमारत उद्यान 6. विश्राम गृह उद्यान 7. कुलगुरु निवास उद्यान 8. कुलसचिव निवास उद्यान 9. भौतिक शास्त्र उद्यान 10. संगणक शास्त्र विभाग उद्यान 11. रसायनशास्त्र विभाग उद्यान 12. पर्यटन व प्रशासन विभाग उद्यान 13. वृत्तपत्रविद्या विभाग उद्यान 14. मध्यवर्ती सुविधा केंद्र उद्यान व 15. स्थावर विभाग उद्यान इ.

**विद्यापीठ उद्यान अंतर्गत कर्मचारी**

| | |
|---|---|
| 1. डॉ.जी.के.हुंबे | - कक्ष अधिकारी (उद्यान) |
| 2. श्री.के.आर.निर्मळ | - उद्यान विद्या वेत्ता |
| 3. श्री.आर.बी.मोरे | - फिल्डमन |
| 4. श्री.डी.एम.मगरे | - फिल्ड सुपरवायझर |
| 5. श्री.जी.पी.बनकर | - ट्रॅक्ट्रर चालक |
| 6. श्री.डी.एस.जाधव | - प्रमुख माळी |

व 6 माळी (5 पुरुष 1 महिला)

### औद्योगिक फळबाग प्रकल्प

राष्ट्रीय फळबाग मंडळ यांच्या सहयोगाने विद्यापीठ परिसरातील 142 एकरवर औद्योगिक फळबाग उभारण्यात आला आहे. विद्यापीठातील पडिक जमिनीवर प्रथमच हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यात आला आहे. या मध्ये

**1. आंबा -** या फळझाडाच्या केशर, हूर, लंगडा, बेनेशान इ. जाती लावण्यात आल्या. आंब्याची एकूण 1325 झाडे लावण्यात आली आहेत.

**2. सीताफळ -** या फळझाडांची लागवड करण्यात आली. या मध्ये बाला नगर व ॲनोना - 2 या जाती लावण्यात आल्या. सीताफळाची बालानगर 2000 झाडे व ॲनोना - 2 - 1000 झाडे अशी एकूण 3000 सीताफळ फळझाडे आहेत. यामध्ये ॲनोना 2- या जातीला विशेष महत्त्व आहे.

**3.चिंच -** या फळझाडांची लागवड करण्यात आली. यामध्ये पी.के.एम. 1. प्रतिष्ठान या चिंचेच्या जाती आहेत. चिंचेची एकूण 1530 फळझाडे आहेत.

**4. आवळा -** या फळझाडांची लागवड करण्यात आली. यामध्ये एन-7, एन10, या आवळ्याच्या जाती आहेत. आवळा या फळझांची एकूण संख्या 945 इतकी आहे.

**5.चिकू -** या फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. चिकू या फळझाडांची कालापत्ती ही जात आहे. या जातीची एकूण 415 झाडे आहेत.

अशी एकूण 142 एकर विद्यापीठ परिसरामध्ये 7215 फळझाडे लावण्यात आली. वरील फळझाडांपासून उत्पन्न सुरु झाले आहे.

औद्योगिक फळबागेतील झाडे जस जसी मोठी होतील त्याप्रमाणे अंदाजे रु 25 लाख प्रति वर्ष उत्पन्न अपेक्षित आहे. या फळबागेतूनच विद्यापीठातील विद्यार्थी तसेच 'कमवा व शिका' या मधील विद्यार्थ्यांसाठी फळबाग नर्सरी उभारण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना ज्ञान मिळेल तसेच विद्यापीठाचा उत्पान्नाचा भक्कम स्त्रोत निर्माण होईल

औद्योगिक फळबागेसाठी राष्ट्रीय फळबाग मंडळ (NHB) कडून रु. 10 लाख अनुदान प्राप्त झाले आहेत. परिसर विकास अंतर्गत उच्च तंत्रज्ञान पुष्पउद्योग प्रकल्प (Hi-Tech Floriculture Project) उभारण्यात आला आहे. 23 ऑगस्ट 2009 रोजी उच्च तंत्रज्ञान पुष्पउद्योग प्रकल्पाचे उद्घाटन झाले. अध्यक्ष डॉ.नागनाथ कोत्तापल्लेसर, प्रमुख पाहुणे डॉ.विजय खोले सर (कुलगुरु, मुंबई विद्यापीठ) डॉ.मानवेंद्र काचोळे यांच्या शुभहस्ते व सर्व माननीय व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या उपस्थितीमध्ये उदघाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

या उच्च तंत्रज्ञान पुष्पोद्योग प्रकल्पामध्ये ॲरोडायनॅमिक पॉलीहाऊस उभारण्यात आले आहे. या पॉलीहाऊस मुळे वातावरण नियंत्रित करता येते. तसेच झाडांच्या वाढीसाठी लागणार फोटा पिरीयर व कार्बडाऑक्साईड साठवला जातो. यामुळे पॉलीहाऊस मध्ये वाढणाऱ्या झाडांच्या दर्जा व उत्पन्न हे उघडया जमिनीवर येणाऱ्या झाडांच्य उत्पन्न व दर्जा या पेक्षा चौपट असतो. या पॉलीहाऊस मध्ये तापमान, आर्द्रता, कार्बनडायऑक्साईड नियंत्रित ठेवले जाते. नियंत्रित शेती या सदराखाली पॉलीहाऊस शेती ही संकलपना येते. यामुळे नैसर्गिक आपत्ती पासून स्वरक्षण व पिकांची हमी यासाठी पॉलीहाऊस शेती ही अत्यंत उपयुक्त आहे. या पॉलीहाऊस मध्ये परदेशातील गुलाब लागवड करण्यात आलेली आहे.जेणेकरुन पॉलीहाऊस मध्ये आलेले गुलाब हे स्थानिक बाजारामध्ये विकेले जातात, त्याच प्रमाणे आंतर राष्ट्रीय बाजार पेठेत (परदेशात) या फुलांना चांगला भाव मिळतो. विद्यापीठातील 500चौ.मि. पॉलीहाऊस मध्ये 5000 फुलांची लागवड करण्यात आली आहे. पॉलीहाऊस मध्ये पाणी व खत देण्यासाठी अत्याधुनिक अंतर्गत ठिबक सिंचन करण्यात आले आहे. तसेच वातावरण नियंत्रित करण्यासाठी फॉगर्स व शेड नेटची व्यवस्था आहे. अशा अत्यंत अत्याधुनिक तंत्रज्ञानाने गुलाब वाढविले जात आहेत. गुलाबांच्या जाती मध्ये 1. गुलाब (लाल) हा फ्रान्सचा आहे 2. गुलाब (पिवळा) फ्रान्सचा आहे. 3. गुलाब (गुलाबी) हा इंग्लंडचा आहे. 4. गुलाब (केशरी) हा केनिया, साऊथ आफ्रिकेचा आहे. या पासुन विद्यापीठास उत्पन्न प्राप्त होत आहे.

**औद्योगिक फळबागेतून निघालेल्या उत्पन्नाचा वर्षनिहाय तपशील**

| अ. क्र. | उत्पादक | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 2008-09 | 2009-10 | 2010-11 | 2011-12 | 2012-13 |
| 1 | आंबा | 3000.00 | 22500.00 | 85000.00 | ------ | 6182.00 |
| 2 | आवळा | ------ | 6635.00 | 53650.00 | 20501.00 | 25033.00 |
| 3 | सिताफळ | ------ | 5205.00 | 11819.00 | 10508.00 | 15820=00 |
| 4 | पॉलीहाऊस गुलाब | ------ | 26000.00 | 30881.00 | 29152.00 | 12233=00 |
| 5 | चिंच | ------ | ------ | ------ | 22500.00 | ------ |
| 6 | चिकु | ------ | ------ | ------ | 980.00 | 4590.00 |
| | एकुण | **3000.00** | **60340.00** | **181350.00** | **83641.00** | **63858.00** |

औद्योगिक फळबाग प्रकल्प विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ.विजय पांढरी पांडे, कुलसचिव डॉ.धनराज माने व परिसर विकास समिती अध्यक्ष डॉ.गणेश शेटकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ उद्याना अंतर्गत राबविण्यात येत आहे.

## स्व. वसंतराव काळे ''कमवा आणि शिका''

### स्वाभिमान शिक्षण योजना : एक शैक्षणिक उपक्रम

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला स्वतःची अशी अनेक वैशिष्ट्ये आहेत. हे विद्यापीठ ज्या कार्यक्षेत्रात वसलेले आहे त्या कार्यक्षेत्रात भारतीय इतिहासात दखलपत्र ठरलेल्या अनेक ऐतिहासिक घटना घडलेल्या आहेत. भारताला कलात्मक व नैतिक वारशाने समृध्द करणारे आणि जागतिक आकर्षण ठरलेले अजिंठा आणि वेरुळ या कार्यक्षेत्रात आहे. या वारशाने भारताला कोट्यावधींचे परकीय चलन प्राप्त होत असते. भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाला पुर्णविराम देणारा शेवटचा लढा ''हैद्राबाद मुक्तीसंग्राम'' च्या रुपाने याच कार्यक्षेत्रात झाला. भारताला सामाजिक विचाराचे आणि महाराष्ट्राच्या १६.८४% एवढ्या मनुष्यबळाला सामावून घेणारे असे अनेक अंगाने महत्वपूर्ण ठरणारे कार्यक्षेत्र या विद्यापीठाला लाभले आहे. त्यामुळे साहजिकच या क्षेत्राला भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिकदृष्ट्या विकसित करण्याची जबाबदारी या विद्यापीठाची आहे. तसे पाहिले तर सातत्याने अवर्षणग्रस्त अवस्थेत रहात असल्याने काहीशी नैराश्याची भावना जोपासणारे, निजाम राजवटीच्या प्रभावाणे निर्माण झालेले सरंजामशाहीचे शेवटचे संस्कार घेऊन जगणारे, याच निजामशाहीच्या सरंजामशाहीच्या प्रतिक्रियात्मक प्रभावाने अस्तित्व व अस्मितेसाठी संघर्षस्त असणारे, या संघर्षाला विकासाचे स्वरुप देऊ पाहणारे, पर्यायाने विकासासाठी शर्थीची पावनखिंड लढविणारे असे इथले मनुष्यबळ आहे. या कार्यक्षेत्रातील मनुष्यबळ या स्वरुपाचे असल्याने या मनुष्यबळाला विकासासाठी आवश्यक ते ज्ञान, तंत्रज्ञान, कसब व कौशल्ये शिकवून त्याला सामर्थ्यवान मनुष्यबळामध्ये परावर्तीत करण्याची नैतिक जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने स्वीकारली आहे. त्यासाठी हे विद्यापीठ अनेक योजना राबवत आहे. 'स्व. वसंतराव काळे कमवा आणि शिका स्वाभिमान शिक्षण योजना' ही अश्याच योजनापैकी एक आहे.

या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र काहीसे मागास असल्याने साहजिकच या कार्यक्षेत्रातील तरुणांना, बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे व त्याला या प्रवाहात टिकवून ठवणे ही अतिशय जिकिरीची बाब होऊन बसते. एखाद्या कुटुंबातील तरुण हा त्या त्या कुटुंबाच्या आर्थिकतेचे साधनच असते. त्याच्या मजुरीच्या रुपाने येणारा पैसा हा कुटुंबाच्या एकुण मिळकतीचा महत्वाचा भाग असतो. अशा कुटुंबातील मुलगा शिक्षणाच्या प्रवाहात आणणे व टिकवून ठेवणे हे प्रथमदर्शनी त्या कुटुंबाचे आर्थिक नुकसान तर ठरतेच पण त्यासोबतच त्याच्या शिक्षणावर खर्च करणे हे दुहेरी नुकसान ठरते. याचा परिणाम असा होतो की, शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी झालेल्या एकुण विद्यार्थिंपैकी जर फक्त १२% विद्यार्थिच उच्च शिक्षणासाठी पोचत असेल तर मराठवाड्याच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण त्यात किती असणार. मराठवाडा हा भारताच्या सर्वसाधारण भूभागाचेच प्रातिनिधिक उदाहरण ठरते. ही एकुणच वस्तुस्थिती विचारात घेऊन स्व. वसंतराव काळे यांनी ते कार्यकारीणीचे सदस्य असताना १९७९-८० दरम्यान या प्रकारच्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहकार्य करणाऱ्या योजनेचा प्रस्ताव कार्यकारिणी पुढे ठेवला. तत्पुर्वी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्यांच्या रयत शिक्षण संस्थेमध्ये याच पध्दतीने 'कमवा आणि शिका' ही योजना कार्यान्वीत केली होती त्याच धरतीवर ही योजना ठेवण्यात आली. या योजनेवर चर्चा करतांना तत्कालीन कुलगुरु डॉ. बाबासाहेब भोसले यांनी हे विद्यार्थी कोणत्या प्रकारचे काम करतील? असा प्रश्न विचारला. त्यावर स्व. वसंतराव काळे यांनी ही सर्व मुले ग्रामीण भागातील आहेत, त्यांची ग्रामीण पार्श्वभूमी विचारात घेऊन विद्यापाठ त्यांच्याकडून परिसर विकास व साफसफाई, वृक्ष लागवड व संवर्धन या प्रकारचे काम घेऊ शकते असे उत्तर दिले. स्व. सवंतराव काळे यांच्या मागणीनुसार पुढील काळात १९७९-८० पासून ही योजना 'कमवा आणि शिका' या नावाने सुरु करण्यात आली.

### ''कमवा आणि शिका'' योजनेचे स्वरुप

सुरुवातीच्या काळात या योजनेमध्ये केवळ सर्वसाधारण वर्गातील विद्यार्थाच सहभागी व्हावे या प्रकारचा संकेत असावा. कारण १९७९-८० ते १९८२-८३ पर्यंत या योजनेमध्ये केवळ सर्वसाधारण गटातील विद्यार्थीच सहभागी झालेले दिसतात. या तीन वर्षामध्ये सहभागी झालेले विद्यार्थी व त्यांची संख्या पुढील प्रकारची.

| अ.क्र. | वर्ष | सहभागी विद्यार्थी (सर्वसाधारण गट) | राखीव |
|---|---|---|---|
| १ | १९७९-८० | १५ | - |
| २ | १९८०-८१ | ४० | - |
| ३ | १९८१-८२ | ३९ | - |
| ४ | १९८२-८३ | ७० | - |

यापुढे या योजनेत राखीव वर्गातील विद्यार्थीही सहभागी होताना दिसतात. या योजनेत कामाचे तास प्रति दिन २ तास असे ठरविण्यात आले आणि त्यांचा मोबदला १ रु. असे ठरविण्याम आले. पुढे हा मोबदला सतत वाढताना दिसतो १९७९-८० ते २००९-१० या दरम्यान हा मोबदला १ रु. ते १२ रु. असा वाढत्या प्रमाणात राहिला आहे.

**मोबदल्याचे सूत्र :**

'कमावा आणि शिका' या योजनेमध्ये काम करणाऱ्या विद्याथर्यांना मोबदला देताना काही सूंत्र पाळल्याचे दिसते. यातले पहिले सूत्र हे होते की, खेड्यापाड्यातील, गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना काही आर्थिक मदत व्हावी व त्यांना शिक्षण घेणे सुलभ व्हावे. राखीव वर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळत असल्याने सुंरुवातीला त्यांचा या योजनेत सहभाग नसावा. मात्र पुढे जेव्हा राखीव वर्गातील विद्यार्थ्यांचा यात सहभाग झाला तेव्हा त्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती म्हणून जी शिष्यवृत्ती रक्कम प्राप्त होत होती ती वजा करुन उर्वरीत रक्कम राखीव वर्गातील विद्यार्थ्यांना दिली गेली. उदा.

| अ.क्र. | वर्ष | एका महिन्याचे मानधन | |
|---|---|---|---|
| | | खुला | राखीव |
| १ | १९८३-८४ | ३६९० | १९९० |
| २ | १९८४-८५ | ४८०० | ३१२० |
| ३ | १९८५-८६ | ८१६० | ३६०० |
| ४ | १९८६-८७ | ७५०० | ५१६० |
| ५ | १९८७-८८ | ६३६० | ३३६० |
| ६ | १९८८-८९ | ६००० | ४४४० |
| ७ | १९८९-९० | ११५२० | ६५४० |

या पध्दतीने मोबदला निर्धारित करण्यात आला. मोबदला वितरणाची ही पध्दत १९९७-९८ पर्यंत आणण्यात आली.

**कामाचे स्परुप :**

या प्रकारच्या मोबदल्यामध्ये विद्यापीठ सर्वसाधानरणपणे या विद्यार्थ्यांकडून परिसराची निगा. स्वच्छता, फळबाग विकसित करणे, झाडे लावणे व काळजी घेणे, बंधारे बांधणे, काही कार्यालयीन कामे करणे उदा. ग्रंथलय, विविध शैक्षणिक विभाग, व्यवस्थापकीय, परीक्षा विभागामध्ये काम करणे या प्रकारची कामे करुन घेण्यात येतात. बरेचदा फाईल्स व लिफाफे बनवणे, खडू, मेणबत्ती, फिनेल या सारख्या शैक्षणिक साधनांच्या उत्पादनामध्येही या विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेतले जाते. याच योजनेच्या वतीने एस.टी.डी., झेरॉक्स, स्टेशनरी विक्री, झूनका भाकर केंद्र इत्यादी कामेही केली गेली. तसेच पिठाची गिरणी चालवणे, विहीरींची स्वच्छता, शैक्षणिक साधनांची ना नफा ना तोटा या तत्वावर विक्री करणे अशा प्रकारच्या संभाव्य कामाची योजनांही आखण्यात आली होती. त्यामुळे या विविध प्रकरच्या कामाचा समावेश 'कमवा आणि शिका' या योजनेमध्ये होत असतो व झालेला आहे.

**१९९७ नंतरचे महत्वपूर्ण बदल :**

१९७९-८० पासून सुरु झालेली 'कमवा आणि शिका' ही योजना अनेक वळणे घेत १९७९-८० पर्यंत आली. दरम्यानच्या काळामध्ये विद्यार्थ्यांना उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये काम मिळावे, ही सुध्दा एक महत्वाची मागणी म्हणून पुढे आली. पण ही मागणी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले कुलगुरु झाल्यानुतरच अमलात आली. सर्व विद्यार्थ्यांना सारख्याच पध्दतीने मोबदला देण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला व त्याची अंमलबजावणी करण्यात आली. दुसरा महत्वाचा बदल असा झाला की, यापूर्वी मिळणारा मोबदला हा प्रति दिन एक तासाकरिता होता तो प्रति १ तास असा झाला. याचा परिणाम झाला की, विद्यार्थ्याचा त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला वाढला. तीसरा अतिशय महत्वाचा बदला झाला तो कामाच्या स्वरुपामध्ये यापुर्वी विद्यार्थी साफ-सफाई शेती, फळबाग विकसित करणे या प्रकारची कामे करत होता. १९९७ मध्ये या विद्यार्थ्यांमध्ये विशिष्ट स्वरुपाची कौशल्ये विकासित केली गेली. मेणबत्ती, खडु, स्क्रिन प्रिंटींग करुन फाईल इत्यादी वस्तु तयार करण्याचे प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून या वस्तूचे उत्पादन करुन घेण्यात आले. उत्पादन ते विक्री हे सर्वच व्यवहार विद्यार्थ्याकडून करुन घेतले जात असल्याने त्याना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा आत्मविश्वास मिळाला.

'कमवा आणि शिका' या योजनेमध्ये या प्रकारचा अतिशय महत्वाचा, आत्मविश्वास निर्माण करणारा बदल होण्यामागे काही ऐतिहासिक कारणे होती. या ऐतिहासिक कारणाचा परिणाम म्हणूनही या बदलाकडे पाहता येईल. १४ जानेवारी १९९४ ला विद्यापीठाचा नामविस्तार झाला. नामविस्तारासोबतच विद्यापीठाला १८,००,०००/- रु. देणगी म्हणून मिळाले. मात्र या देणगीचा वापर कशासाठी करावा या बाबतचा निर्णय होत नव्हता. १९९७ ला डॉ. सुधीर गव्हाणे यांनी विद्यार्थी कल्याण विभागाच्या संचालक पदाचा पदभार स्वीकारला आणि हा निधी 'कमवा आणि शिका' योजनेकरिता उपयोगात आणण्याचा निर्णय घेण्यात आला. याच कारणाने वरील अतिशय महत्वापूर्ण बदल या योजनेमध्ये झालेत. याच काळात 'कमवा आणि शिका' मधील सहभागी विद्यार्थी मजूर पदापासून 'दत्पादक घटक' या पदापर्यंत उत्तीर्ण झाला.

विद्यापीठाची हिरवाई : कमवा आणि शिका च योगदान :

'कमवा आणि शिका' या योजनेमुळे खरे म्हणजे विद्यापीठाचा अधीच प्रेक्षणिय असणारा प्रदेश अधिकच रमणिय झाला. आज विद्यापीठाकडे निर्यात करण्यायोग्य गुलाब, आंबा, आवळा हे पीक आहे. आंबा, पर्पी, नारळ, चिंच फुलझाडे, इत्यादी वनराईनी विद्यापीठातील सौंदर्यामध्ये विलक्षाभर टाकली आहे. औरंगाबाद शहरातील सर्वाधिक ऑक्सीजनचे प्रमाण असणारे ठिकाण म्हणून विद्यापीठाच्या परिसराची नोंद शासकीय दरबारी आहे. संपूर्ण शहरामधून सकाळी आणि संध्याकाळी विद्यापीठामध्ये फिरायला येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. विद्यापीठाच्या 'हिरवाई' ची ख्याती महाराष्ट्र आणि भारतालाही माहिती आहे. विद्यापीठाच्या या 'हिरवाई' मध्ये साग, सुबाभूळ, शेवगा पासून तर पपई, सूर्यफुल, केळी, कापूस, मका, ज्वारी, सोयाबीनप, जांभूळ, आंबा, चिंच, भाजीपाल, फुले औषधी वनस्पती इत्यादीचा समावेश असून या वनस्पतींनी विद्यापीठामध्ये विलक्षण वैविध्य निर्माण केले आहे. विद्यापीठाचा या दिशेने नाव लौकिक वाढवण्यात 'कमावा आणि शिका' या योजनेंचे खूप मोठे योगदान आहे.

**कमावा आणि शिका : खर्च आणि उत्पन्न**

विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना आर्थिक स्वावलंबन देण्यासाठी सुरु केलेल्या 'कमावा आणि शिका' योजनेत विद्यार्थ्यांचे श्रमिक' योगदान प्राप्त होत असल्याने साहजिकच ही योजना कालांतराने उत्पादक अशीही ठरु लागली. विद्यापीठाच्या आकडेवारीनुसार १९८९-९० पासून या योजनेमार्फत होणारे उत्पादन नोदवले जाऊ लागले. अर्थात हे उत्पादन फारसे नसले तरी दखलपात्र मात्र नक्कीच होते. यात लक्षात घेण्यासारखी बाब ही की, ही योजना स्वावलंबी करण्यासाठी आर्थिक मदत करण्याच्या ध्येयाने सुरु करण्यात आली होती. त्यामुळे उत्पादन हे या योजनेचे प्राधन्य नव्हते. तरीसुध्दा येथे सातत्याने श्रम खर्च होतात तेथे कालांतराने काहीतरी उत्पादक गोष्टी घडतच असतात. त्यामुळे उत्पादन हे या योजनेचे बायप्रॉडक्ट ठरले. पण बायप्रॉडक्ट म्हणून का होईना ही योजना उत्पादक ठरली. उत्पादन हे ध्येय नसतानाही या योजनेचे बायप्रॉडक्ट म्हणून झालेले उत्पादन हे या योजनेचे यश समजले पाहिजे. मात्र उत्पादनाची तमा न बाळगता विद्यापीठाने या योजनेला आधिक सशक्त करण्यासाठी सातत्याने या योजनेवरीनल गुंतवणूक ही वाढवतच नेली, ती पुढीलप्रमाणे आहे.

## कमावा आणि शिका योजना खर्च आणि उत्पादन

| वर्ष | विद्यार्थी संख्या | खर्च (रु.) | उत्पादन (रु.) |
|---|---|---|---|
| १९७९-८० | १५ | ५४०० | - |
| १९८०-८१ | ४० | १४४०० | - |
| १९८१-८२ | ३९ | ४२,१२० | - |
| १९८२-८३ | ७० | ७५,६०० | - |
| १९८३-८४ | ७८ | ५०,२२० | - |
| १९८४-८५ | ८५ | ७९,२०० | - |
| १९८५-८६ | १०० | १,४१,१२० | - |
| १९८६-८७ | २०० | १,५५,५२० | - |
| १९८७-८८ | १०० | १,१६,६४० | - |
| १९८८-८९ | १८० | ९३९६० | ५१७ |
| १९८९-९० | २१५ | १,६५,२४० | २७६११ |
| १९९०-९१ | २१० | २,१०,६०० | १६६६५ |
| १९९१-९२ | २७५ | १,९४,०४० | १३००९ |
| १९९२-९३ | २७५ | २,५९,२०० | ११७९१ |
| १९९३-९४ | २६० | १,२७,९८० | १५४४२ |
| १९९४-९५ | २५० | ३,३४,८०० | १७१७५ |
| १९९५-९६ | २४० | ३,५७,६०० | ३६००० |
| १९९६-९७ | २४० | ९,५०,४०० | २,११,७७८ |
| १९९७-९८ | २६२ | १४,१६,०० | ३,१७,७४८ |
| १९९८-९९ | २७५ | १७,९१,३६० | ३,१७,४७८ |
| १९९९-२००० | २६० | १६,०७,०४० | २२६,५९२ |
| २०००-०१ | २७५ | ७,३१,६०५ | २१५,३६२ |
| २००१-०२ | २५० | ७,९९,८४५ | १,७९,७९२ |
| २००२-०३ | ३०० | १०,६०,३१८ | २३०,१८७ |
| २००३-०४ | ३५० | १२,८०७०६ | ३,२९,०१० |
| २००४-०५ | ३०० | ८,८१,३८४ | ५,०१,६७७ |
| २००५-०६ | ४०० | १४,४५,४९८ | ४,६०,६९४ |
| २००६-०७ | ३५० | १९,६६,६७३ | १,५०,००० |
| २००७-०८ | ३२५ | १०,७४,३२६ | १,९६,००० |
| २००८-०९ | ४८५ | १७,६८,४९२ | ४,२५,००० |
| २००९-१० | ४५० | १७,५०,९९३ | ५,१८,४०० |
| २०१०-११ | ४३५ | १४,५४,५१९ | ५,३८,५७५ |
| २०११-१२ | ४५० | १४,५०,५२० | ६,४८,५७५ |
| २०१२-१३ | ४५० | -//- | -//- |
| २०१३-१४ | ४९० | ३८,०८,९८३ | ६,२६,९८७ |

वरील आकडेवारीत 'कमावा आणि शिका' या योजनेवर विद्यापीठाने केलेली गुंतवणूक व झालेले उत्पादन याची कल्पना येते. या आकडेवारीवरुन आणखे एक बोध घ्यायला हरकत नाही की, या आकडयांमध्ये म्हणजे गुंतवणूक व उत्पादन यामध्ये थोड्या फार कल्पकतेने व महत्वपूर्ण निर्णणने सुतुलन साधले जाऊ शकते. आणि ज्या क्षणी हे सुतुलन साधले जाईल तो क्षण 'कमावा आणि शिका' या योजनेसाठी आणि विद्यापीठासाठी क्रांतीकारक क्षण ठरेल. हे सुतुलन साधण्यासाठी या योजनेचा शस्त्रशुध्द अभ्यास केला जाणे आवश्यक आहे. विशेष्ज्ञ म्हणजे हे संतूलन साधले गेले पाहिजे हे भान आले पाहिजे. या आकडेवारीतील वर्ष १९९८-९९श १९९९-२०००, २००३-०४, २००५-०६ या काळातील उत्पादनाचे आकडे आश्चर्यकारक आहेत. ज्यांच्या आधाराने हा अभ्यास केला जाऊ शकतो व सुतुलन साधण्याच्या दिशेने पाऊल टाकले जाऊ शकते.

**विद्यार्थ्यांचा सहभाग, खर्च व उत्पन्न :**

विद्यार्थी कल्याण विभाग अंतर्गत कार्यान्वीत असणाऱ्या या योजनेमध्ये त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार १९७९-८० ते २०१० पर्यंत या योजनेचा लाभ मिळालेल्या विद्यार्थ्याची संख्या ही जवळपास ६३१२ आहे. या विद्यार्थ्यांवर विद्यापीठाने या कालावधीमध्ये सर्वसाधारणपणे २७,२१,१३,७२०/- निधी खर्च केला आहे. तसेच या योजनेमधून झालेले उत्पादन ३९,२७,९५३/- आहे.

**कमावा आणि शिका योजनेचे नामकरण :**

विद्यार्थी स्वावलंबी वहावा या हेतुन विद्यापीठाने ही योजना सुरु केली असली तर, ही योजना सुरु करण्यामध्ये मराठवाडा शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार, मराठवाड्याचे सुपुत्र स्व. वसंतरावजी काळे यांचे मोलाचे योगदान होते व आहे. गोरगरीब शेतकरी, कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यां विषयी विलक्षण तळमळ असल्यानेच प्रसंगी संघर्ष करुन त्यांनी ही योजना सुरु करण्यासाठी विद्यापीठाला सहकार्य केले व एका जीवनदायी योजनेचा जन्म या विद्यापीठामध्ये झाला. त्यांच्या सहकार्याने व पाठपुराव्याने ही योजना केवळ सुंरुच झाली नाही तर ती कार्यान्वित होऊन यशस्वीही झाली. त्यांच्या या सहकार्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच विद्यापीठाने त्यांच्या निधनानंतर २००६ मध्ये या योजनेला त्यांचे नाव दिले. गोरगरीब, कष्टकरी विद्यार्थ्यांप्रती असणाऱ्या त्यांच्या जिव्हाळयाला विद्यापीठाने या पध्दतीने कायमस्वरुपी अजरामर केले. आज ही 'कमावा आणि शिका' योजना 'स्व. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना' या नावाने सुरु आहे.

**शैक्षणिक उद्दिष्ट :**

'कमावा आणि शिका' ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये १९७९-८० पासून योजना सुरु झाली असली तर, या योजनेचे स्परुप हे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्यांच्या शैक्षणिक विचारामधून निर्माण केलेले असल्याने या योजनेला एक तर्कशुध्द तत्वज्ञान व भूमिका प्राप्त झाली आहे. भारतीय पातळीवर शिक्षणाची संकल्पना अनेक विद्वानांनी मांडली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी यांची भूमिका भारतीय शिक्षणाच्या संदर्भात मुलभूत स्वरुपात स्वीकारली गेली. यांच्या विचारात एक मूल्य प्रामुख्याने मांडले गेले होते ते मुख्या म्हणजे 'श्रमप्रतिष्ठा' होय. या शैक्षणिक तत्वज्ञानाचा व त्यांचा वारसा चालवणाऱ्या एकूण शैक्षणिक विचारवंताचा आणि सामाजिक सुधारकांचा वारसा 'स्व. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजनेच्या' रुपाने विद्यापीठ चालवत आहे. कर्मवीर भाऊराव पाटल यांनी सुरु केलेल्या 'कमावा आणि शिका' या योजनेला ही पार्श्वभूमि आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ही योजना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या वारशाचा प्रतिसाद आहे. या योजनेमधून विद्यार्थी हा आर्थिकदृष्ट्या सबल होण्यास मदत झाली. त्याच्यामध्ये 'श्रमाची प्रतिष्ठा' हे मूल्य विकसित झाले. विशेष म्हणजे स्वकष्टावर शिक्षण घेण्याची सवय निर्माण झाली. स्व. सवंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजनेमध्ये 'शिक्षण आणि श्रमप्रतिष्ठा' ही दोन्ही मूल्ये अतिशय समर्पकपणे जोडली गेली आहेत.

**डॉ. चेतना प्र. सोनकांबळे**
**संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग,**
**डॉ.बा.आ.म.विद्यापीठ, औरंगाबाद.**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृहे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या परिसरात एकूण पाच विद्यार्थी वसतिगृहे व एक विद्यार्थी विश्रामगृह आहे. वसतिगृहामध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे गुणवत्तेनुसार व प्रवर्गानुसार वसतिगृहात प्रवेश दिले जातात. सर्व वसतिगृहांची प्रवेश क्षमता ४५० आहे. श्री. छत्रपती शिवाजी महाराज मुलांचे वसतिगृह क्र.१ चे वार्डन म्हणून डॉ. बापुराव शिंगटे, सिध्दार्थ संशोधन छात्र मुलांचे वसतिगृह क्र.२ कर्मवीर भाऊराव पाटील मुलांचे वसतिगृह क्र.३ आणि विद्यार्थी विश्रामगृहाचे वार्डन म्हणून डॉ. नारायण पंडुरे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मुलांचे वसतिगृह क्र.४ व शहिद भगतसिंग मुलांचे वसतिगृह क्र.५ चे वार्डन म्हणून प्रा. डॉ. संजय राठोड व कार्यालयीन पुर्णवेळ कर्मचारी म्हणून श्री. बाळासाहेब जाधव हे काम करतात.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे सुविधा पुरवल्या जातात.

१. पिण्यासाठी वॉटर कुलर व फिल्टरद्वारे पिण्याचे पाणी. २. सोलार व गिजरद्वारे गरम पाणी. ३. भोजनासाठी मेसची सुविधा ४. वर्तमानपत्रे व नियतकालिके. ५. दुरदर्शन सुविधा. ६. खेळाचे साहित्य. ७. प्राथमिक आरोग्य केंद्र सुविधा. ८. कमवा आणि शिका योजनेतील विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात वसतिगृह सुविधा. ९. खोल्यांचध्ये विद्यार्थ्यांना टेबल-खूची, पंखा - ट्युबलाईट, पलंग, कपाट इत्यादी सुविधा. १०. वसतिगृहात दररोज स्वच्छता, सांस्कृतिक, कार्यक्रम, वसतिगृह दिनानिमित्त कार्यक्रम, भोजन, रक्तदान शिबीर, तज्ञांची व्याख्याने, वृक्षारोपन, मान्यवरांच्या भेटी इत्यादी कार्य केली जातात.

वसतिगृहाचे अधिक्षक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या निवासासाङ्गी एकुण ९ वसतिगृहे व १ विश्रामगृह आहे. त्यापैकी मुलांसाठी ५ वसतिगृहे व १ विद्यार्थी विश्रामगृह आहे. वसतिगृहाची व्यवस्था पाहण्यासाठी मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशाने वार्डनची/अधिक्षकांची नियुक्ती केली जाते. विद्यार्थी वसतिगृहे व वार्डनची नावे पुढील प्रमाणे आहेत.

वसतिगृहाचा कारभार व्यवस्था पाहण्यासाठी मा. कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली वसतिगृह नियंत्रण व व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष मा. प्रा. डॉ. रत्नदिप देशमुख, प्रा, डॉ. प्रतिभा पाटील, डॉ. प्रमिला जाधव, डॉ. मेहेर दत्ता पाथ्रीकर व सदस्य सचिव म्हणून प्रा. डॉ. वाल्मिक सरवदे यांची समिती कार्यरत आहे. १५ दिवसाला एक या प्रमाणे या समितीच्या बैठका होतात. वसतिगृहातील नियम, शिस्त, जेवणाचा दर्जा, मुला-मुलींची सुरक्षा व मुलांचे वेगवेगळे कार्यक्रम व उपक्रम यावर समितीमध्ये सविस्तर चर्चा होते. वसतिगृहाचध्ये भोजन व्यवस्थेसाठी तीन कंत्राटदारांची नियुक्ती, निविदा मागवून केली जाते. या सर्व बाबींचे व्यवस्थापन मा. संचालक डॉ. वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ. धनराज माने यांच्या मार्गदर्शनाखाली होते.

वसतिगृह १ ची स्थपना १९७० मध्ये झाली. टप्याटप्याने व विद्यार्थी संख्यानिहाय वसतिगृहे बांधण्यात आली. वसतिगृहातील खोल्यानिहाय व विद्यार्थीनिहाय संख्या प्रमाणे आहे.

केले जाते त्यामध्ये प्रामुख्याने -

१. वृक्षारोपन २. तज्ञांची व्याख्शने ३. रक्तदान शिबीर ४. महामानवांच्या जयंती व पुण्यतिथी ५. सांस्कृतिक कार्यक्रम ६. वसतिगृह दिना निमित्त कार्यक्रम व भोजन ७. मान्यवरांच्या भेटी व व्याख्योने इत्यादी.

### GIRLS HOSTEL AT A GLANCE

| Sr. No | Name of the Hostel | Estb. Year | Total Room | Intake Capacity | Fees Charges | Iron Cots | Wooden tables | Chair | T.V. | Common Hall |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Kranti Jyoti Savitribai Phule Girls Hostel | 8 Aug. 1995 | 52 | 100 | 1969 | 135 | 52 | 89 | LCD 1 | 1 |
| 2 | Matoshri Jijau Girls Hostel | 1986 | 29 | 104 | 1969 | 170 | 95 | 123 | 1 | 1 |
| 3 | Research Hostel Ph.D. / M.Phil. | 27 Oct. 2007 | 57 | 116 | 1969 | 50 | 50 | 50 | - | 2 |
| 4 | Priyadarshini Hostel | 1996 | 25 | 100 | 1969 | 150 | 100 | 261 | 02 | 1 |
| 5 | Minority Girls Hostel | 2014 | 50 | 150 | As per University norms | | | | | |
| | Total | | 180 | 570 | | 200 | 297 | 525 | 4 | 5 |

### BOY'S HOSTEL AT A GLANCE

| Sr. No | Name of the Hostel | Estb. Year | Total Rooms | Intake Capacity | Fees Charges | Iron Cots | Wooden Iron tables | Chairs | LCD (T.V.) | Common Hall |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Shiv chatrapati Shivaji Maharaj Boy's Hostel | 1972 | 100 | 200 | 1969 | 200 | 100 | 100 | LCD. 1 | 1 |
| 2 | Siddharth Sanshodhan Chatra Boy's Hostel No. 2 | - | 57 | 55 | 2481 | 57 | 57 | 57 | LCD.1 | 1 |
| 3 | Karmaveer Bhaurao Patil Boy's Hostel No. 3 (Earn & Learn) | | 11 | 55 | 850 | 55 | 22 | 55 | - | - |
| 4 | Maharshi Vitthal Ramji Shinde Boy's Hostel (Pro.) | 1986 | 13 | 52 | 1969 | 52 | 26 | 52 | LCD.-1 | 1 |
| 5 | Shahid Bhagat Singh Boy's Hostel | 2007 | 20 | 40 | 1969 | 40 | 40 | 40 | - | 1 |
| 6 | Vidharthy Vishram Gruha | 2000 | 13 | 55 Tot. 457 | 1969 | 52 | 26 | 52 | - | - |

# विद्यार्थी कल्याण विभाग (विविध कार्यक्रम व उपक्रम)



**२०वा विद्यापीठ नामविस्तार दिन** प्रमुख पाहुणे डॉ.तात्याराव लहाणे, व्याख्याते डॉ. विवेक कुमार, प्रमुख उपस्थिती मा.गंगाधर गाडे, कुलगुरु मा.डॉ.विजय पांढरीपांडे, कुलसचिव डॉ.धनराज माने, संचालक डॉ.चेतना सोनकांबळे, विद्यापीठ विद्यार्थी सचिव करुणा जाधव



**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती** मिरवणुक व्याख्याते मा. डॉ.एन.सुकुमार, नवी दिल्ली,कुलगुरु मा.डॉ. पंडीत विद्यासागर, डॉ.एस.पी.झांबरे, कुलसचिव डॉ.धनराज माने, विद्यापीठ अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी



**छत्रपती शिवाजी महाराज जयंती** मिरवणुक कुलगुरु मा.डॉ.विजय पांढरीपांडे, कुलसचिव डॉ.धनराज माने, संचालक डॉ.चेतना सोनकांबळे, विद्यापीठ अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी



**५५ वा विद्यापीठ वर्धापन दिन ध्वजारोहन** कुलगुरु मा. डॉ.विजय पांढरीपांडे, प्रमुख पाहुणे मा. डॉ. एन.जे.पवार,शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर , डॉ. एस.पी. झांबरे, कुलसचिव डॉ.धनराज माने.



**६५ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन** पमुख मार्गदर्शक मा. डॉ. व्यंकटेश काब्दे, स्वातत्र्य सैनिक ,नांदेड प्रमुख उपस्थिती मा. ॲड. मनोहर टाकसाळ ,मा. प्रा. डॉ. एन.जी. बापट, कुलगुरु मा. डॉ.विजय पांढरीपांडे, कुलसचिव डॉ.धनराज माने.



**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन** शांती समता रॅली, पदयात्रा, कुलगुरु मा. डॉ.विजय पांढरीपांडे,कुलसचिव डॉ.धनराज माने, संचालक डॉ.चेतना सोनकांबळे, विद्यापीठ अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी

